# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ




**समर्थ महाविद्यालय, लाखनी, जि. भंडारा**

Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळ

## लाखनी चर्चासत्र

## २००८

**स्थान : समर्थ महाविद्यालय, लाखनी, जिल्हा भंडारा**

## स्मरणिका संपादन


सहाय्यक

**दत्तात्रय सोनेगांवकर**

व्ही. एम. व्ही. कॉलेज

नागपूर.

**रमेश हिंमते**

सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्यालय

नागपूर.


Scanned by CamScanner

**नाना पटोले** वि. स. स. तथा
समिती प्रमुख
सार्वजनिक उपक्रम समिती

विधान सभा
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

जा. क्र. स. प. / साउस /
दूरध्वनी क्र. २२०२ ६८ ४३
२२०२ ७३ १९, विस्तार २९०५
विधान भवन
मुंबई ४०० ०३२.

दिनांक :



## संदेश

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाचा द्वारे दर द्वि–वर्षिय आयोजित होणाऱ्या चर्चा सत्राच्या आयोजनाचे ऐकून अत्यंत आनंद झाला. वर्तमान स्थितीत आर्थिक व वाणिज्य विषयाच्या अंतर्गत जो प्रचंड बदल जागतिकीकरणाचा माध्यमातून होत आहे. तो बदल समाज व समाजातील तळागाळा पर्यंत पोहचविण्याचे कार्य आपल्या मंडळा कडून पार पाडले जात आहे. निश्चितच ही बाब वाखानन्या सारखी आहे.

समाज हा भविष्यात शिक्षण घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या द्वारे घडत असतो. अशा सर्व विद्यार्थ्यांना अभ्यास प्रवृत्त करणे, विविध विषयाची अद्यावत माहिती देऊन, देशा करीता सुदृढ आणि सक्षम नागरिक तयार करणे व भविष्यातील आव्हाने पेलण्याकरीता राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रवृत्तीचा विविध अंगाने विकास करण्याचे कार्य समाजातील शिक्षक वर्ग करीत असतो.

आपणांस या पाचव्या द्वी–वार्षिक चर्चासत्र लाखनी २००८ ला माझ्या व माझ्या सहकार्यांच्या उदंड शुभेच्छा.

आपला
**नानाभाऊ पटोले**
आमदार

Scanned by CamScanner

# • मनोगत •



कार्यालय,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.
दिनांक : २१/११/२००८

उपक्रमशीलता शिक्षणाच्या रक्तवाहिन्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही रचनात्मक उपक्रमशीलता नितांत आवश्यक असते. माझ्या शिक्षक असण्याच्या अनुभवाचे हे सार आहे. विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ आणि नागपूर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने **लाखनी चर्चासत्र २००८, समर्थ महाविद्यालय , लाखनी, जि. भंडारा** येथे आयोजित होत आहे. ही माझ्याकरीता आनंदाची बाब आहे.

अर्थशास्त्र आणि वाणिज्य विषयाचे शिक्षक एकत्र येऊन भावी समाज निर्माण करू पाहणाऱ्या आजच्या विद्यार्थ्याला विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अर्थ-वाणिज्य विषयाची केवळ ओळखच नव्हे तर परिपूर्ण ज्ञान देण्याच्या दृष्टीने चर्चासत्रात सहभागी होतात. देशाच्या सामाजिक व आर्थिक समस्यांवर लघू शोध  निबंधाचे वाचन करतात. एखाद्या समस्येच्या मुळाशी जाऊन त्यावर आपला अभ्यास सादर करतात ही निश्चितच कौतुकाची गोष्ट आहे. शिक्षकांची ही सवय वाढीस लागावी व त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ वाणिज्य शिक्षक मंडळ दहा वर्षापासून सातत्याने प्रयत्न करीत आहे. याचा मला सार्थ अभिमान वाटतो.

विदर्भातील सर्व शिक्षक परस्परांच्या सहकार्याने या शैक्षणिक उपक्रमास निश्चितच एक उंची प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करतील अशी माझी खात्री आहे, त्यामुळे लाखणी चर्चासत्र २००८ मधील आपले योगदान नक्कीच सार्थकी लागेल. मी या चर्चासत्रास माझ्या शुभेच्छा देतो.

**गोविंद नांदेडे**
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग, नागपूर.

Scanned by CamScanner



## निसर्ग पर्यटन आणि वनऔषधी उत्पादन, रोजगाराला नवी संधी उपलब्ध करू या झाडे लावा , झाडे जगवा



**मा. एन. डब्लू कावळे**

वनक्षेत्राधिकारी (RFO) लाखनी जि. भंडारा

Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळाची उद्दिष्टे

१. विदर्भातील कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिक्षकांना संघटित करणे.

२. अर्थशास्त्र व वाणिज्य शिक्षकांच्या ज्ञानात भर घालणे.

३. अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील नवीन प्रवाह शिक्षकांव्दारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे.

४. शिक्षकांचे ज्ञान विकसीत करण्यासाठी प्रयत्न करणे.

५. अधिक कार्यक्षमतेसाठी विविध अध्यापकीय साधनांचा उपयोग करणे.

६. अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील विविध शाखांची माहिती करून घेण्यासाठी खुल्या चर्चासत्रांचे आयोजन करणे तसेच विविध विषयांवरील लघुशोध निबंधाचे वाचन करणे.

७. ग्रामीण भागातील शिक्षकांचा मागास दृष्टीकोण बदलविणे.

८. कालबाह्य विचारधारा दूर करून आधुनिक विचारांची जाणीव निर्माण करणे.

९. शिक्षकांच्या कल्पनेला वाव देऊन सन्मान्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

१०. केंद्र सरकार व राज्य सरकार द्वारे जाहीर होणाऱ्या अंदाजपत्रकीय व्यवस्थेचे विश्लेषण करणे व त्या संदर्भात सामान्या पर्यंत त्याचे ज्ञान पोहचविणे.

Scanned by CamScanner

# • संपादकीय •

अर्थशास्त्र आणि वाणिज्याचे स्वरूप सातत्याने विस्तार पावत आहे. काळाच्या ओघात अर्थशास्त्र आणि वाणिज्य शिक्षणाकडून रोजगाराच्या संदर्भात अंतिम उपाययोजना म्हणून अपेक्षेने पाहल्या जात आहे. समाजातील सर्व सामान्य विद्यार्थी वर्ग जो मोठ्याप्रमाणावर रोजगाराच्या प्रतिक्षेत आहे त्यांची समस्या अर्थ–वाणिज्य शिक्षणातून सोडविण्यात यावी अशा एक विचार प्रवाह वेगाने पुढे येत आहे. प्रत्येकाला स्वत:चा रोजगार सहजपणे निवडता येईल व त्याच्या संधी उपलब्ध असतील अशी शिक्षणाकडून जनतेची अपेक्षा आहे. '' मागेल त्याला काम द्यायलाच हवे '' हा विचार मागे पडून '' प्रत्येकाला त्याचे काम शोधता यावे व ते समाजात उपलब्ध असावे'' असा विचार पुढे आला आहे. अर्थ–वाणिज्य शिक्षकाची भूमिका यादृष्टीने महत्वाची आहे. अभ्यासक्रमानुसार देण्यात येणाऱ्या शिक्षणासोबत व्यवहारात उपयोगी असेही शिक्षण मिळावे असा जनमानस दिसून येतो.

आर्थिक विकासाची प्राथमिक गरज म्हणून उर्जेचे स्थान अढळ आहे. विदर्भात वीज निर्मीती विदर्भाच्या आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात होत असूनही मोठ्या प्रमाणावर भारनियमनाचा सामना करावा लागतो. याचा औद्योगिक व शैक्षणिक जगतावर मोठ्याप्रमाणात प्रतिकूल परिणाम झालेला आहे. अनेक उद्योग व्यवसाय डबघाईस आलेले आहे. स्थानिक जनतेच्या आक्रोशाचा उद्रेक होण्यापूर्वीच यावर उपाययोजना होण्याची नितांत गरज आहे. यादृष्टीने अभ्यासकांनी मार्ग सुचवावा अशी अपेक्षा केली जाते.

अर्थव्यवस्थेतील करांचे महत्व कुणीही नाकारू शकत नाही. या करांचे प्रमुख दोन प्रकार आहे. एक प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर. प्रत्यक्ष करात वाढ केल्यास त्यावर समाजाच्या प्रतिक्रीया ताबडतोब दिसून येतात. अप्रत्यक्ष कर मात्र समाजाच्या पटकन लक्षात येत नाही. त्यामळे अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अर्थव्यवस्थेत जास्त प्रमाणात

Scanned by CamScanner

भरतो याची माहिती असणे हा त्यांचा अधिकार मानला जातो. या प्रत्यक्ष कराची अर्थव्यवस्थेतील भूमिका अभ्यासकांनी मांडावी अशी अपेक्षा केली जाते.

अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळ दर दोन वर्षांनी चर्चासत्रांचे आयोजन करते. विशेषत: ग्रामीण भागातील विषय शिक्षकांना आपले विचार मांडण्याकरीता एखादे सन्माननीय व्यासपीठ उपलब्ध असावे म्हणून ग्रामीण भागात चर्चासत्र घेण्यास मंडळाव्दारे प्राधान्य दिले जाते. अशा चर्चासत्रात प्रमूख स्थानिक समस्या चर्चेला घेण्याचा प्रयत्न असतो. लाखनी हे गाव भंडारा जिल्ह्यात असून धान उत्पादन या जिल्ह्यात प्रामुख्याने घेतले जाते. त्यामुळे धान विषयक समस्यांचा अभ्यास सादर व्हावा ही या चर्चासत्राकडून अपेक्षा होती. याद्रृष्टीने उपरोक्त चार विषयांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

वीज समस्या आणि प्रत्यक्ष कराची अर्थव्यवस्थेतील भूमिका या विषयांना चांगला प्रतिसाद मिळाला. याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो. पेपर लिहण्या व पाठविण्या संबंधीच्या विचारणेकरीता पेपर लेखकांशी साधला जाणारा संवाद आणि संपर्क हा एक वेगळा आनंद असतो. जुण्या जाणत्या शिक्षकांसोबतच नवीन शिक्षकांनी कमी परिचीत विषयात लेखनासाठी दाखविलेला उत्साह सुध्दा अभिनंदनीय वाटतो. चांगल्या विषयांवर लेखाचा एक संग्रह या निमित्याने उपलब्ध होतो आहे ही सुध्दा निश्चित आनंदाची बाब आहे.

चर्चासत्राच्या आयोजनाच्या प्रक्रीयेत सहकारी शिक्षकांनी घेतलेले परिश्रम व उत्साह उल्लेखनीय आहे. मंडळाचे अध्यक्ष डॉ. एच. ए. हुद्दा, सचिव राजाभाऊ दुरगकर आणि लाखनी कार्यकारणीचे अध्यक्ष प्रा. अशोक चेट्रूले यांचे विशेष परिश्रम मोलाचे आहे.

चर्चासत्राचे प्रतिनिधी व वाचकांना स्मरणिका उपयुक्त वाटेल असा विश्वास वाटतो.

दि. २०–११–२००८

सेवेशी नम्र
**संपादक मंडळातर्फे**
**दत्तात्रेय सोनेगांवकर**

Scanned by CamScanner



# जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम

**डॉ. अरुणा सोनेगावकर**
अध्यक्षीय भाषण

लाखनीचे भूषण असलेल्या या समर्थ महाविद्यालयाच्या सुशोभित प्रांगणात विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ–वाणिज्य शिक्षक मंडळाच्या पाचव्या द्वि–वार्षिकीय अधिवेशनाचे अध्यक्षपद प्रदान करून आपण माझा जो सम्मान केला याबद्दल मी आपणा सर्वांची ऋणी आहे. या अधिवेशनाच्या निमित्याने भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण आणि परिणाम याकडे आपले लक्ष वेधण्याचा माझा मानस आहे. देशाचे अर्थकारण हा समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जिव्हाळ्याचा आणि कुतुहलाचा विषय असतो. देशाच्या अर्थकारणाची दिशा राष्ट्राच्या आर्थिक विकासाला आणि व्यक्तींच्या जीवनाला स्पर्श करणारी असल्याने सामान्यातील सामान्य व्यक्ती कळत न कळत या विषयावर आपले विचार प्रगट करीत असते.

भारतीय शिक्षणाचा आकृतीबंध, शिक्षणाची गुणवत्ता, शिक्षण क्षेत्रातील वर्तमान व भविष्यकालीन घडामोडी याबाबत आपल्याला आस्था आहे, चिंता आहे. जागतिकीकरण उदारीकरण, निर्गुंतवणुकीकरण या प्रक्रीयेमुळे झालेले बद्दल तसेच या शतकात निर्माण होत असलेली ज्ञानाधिष्ठित समाजरचना व अर्थव्यवस्था हे देखील अत्यंत महत्वाचे विषय आहेत. नव्या शतकाच्या समाजरचनेचा आणि अर्थव्यवस्थेचा ज्ञान हाच आधार आहे. जागतिक पातळीवर ज्ञानाच्या निर्मितीचा जो प्रयत्न चालू आहे त्यात वस्तुनिष्ठ व शास्त्रीय ज्ञानाची भर घालणे आणि त्याला शहाणपणाची जोड देऊन मानवतेच्या कल्याणासाठी ज्ञानाचा उपयोग करून घेणे हेच आपल्या राष्ट्रापुढील खरे आव्हान आहे. गत पंधरा वर्षात भारताच्या अर्थकारणाने एक वेगळीच दिशा स्विकारली आहे. त्याचे काय परिणाम समोर आलेले आहेत याची वेळीच तपासणी करणे भविष्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. माझ्या भाषणातून मी तसा प्रयत्न करीत आहे.

अर्थशास्त्रीय दृष्टीकोनातून जागतिकीरण तीन मार्गांनी अस्तित्वात येते. वस्तु आणि सेवांचा व्यापार, भांडवलाची गतीशीलता आणि वित्तपुरवठ्याचा प्रवाह या तीन्हीवरील बंधने काढून जगाला त्यात मोकळिक देणे यालाच आर्थिक मुक्तता असे म्हणतात. जागतिकीकरणाच्या या प्रक्रीयेत विविध देश अनेक बाबतीत परस्परांवर अवलंबून असतात. त्याच स्वावलंबित्व संपुष्टात येतं. विविध करारांनी हे देश परस्परांशी बांधलेले असतात. तुम्ही आमच्या गरजा पूर्ण करा. आम्ही तुमच्या गरजा पूर्ण करतो. अशी भूमिका जागतिकीकरण स्विकारलेल्या देशांची असते. परस्पर सहकार्याच वातावरण जागतिक स्तरावर निर्माण होतं. व्यापारी संबंधातून मित्र राष्ट्र निर्माण होतात व जागतिक शांतता

Scanned by CamScanner

प्रस्थापित होते. १९९० पर्यंत भारताने स्व-बळावर आपला विकास स्वावलंबनाने घडवून आणण्याचे धोरण स्विकारले होते. यानंतर मात्र १९९१ साली आर्थिक परिस्थितीच्या दबावाखाली भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला. नवीन आर्थिक धोरण ठरविण्यात आले व विदेशातील गुंतवणूकदारांना, व्यापाऱ्यांना, विमासंस्थांना देशात व्यवसाय करण्यास मोकळिक देण्यात आली. यादृष्टीने भारताने जी पाऊले उचलली ती अशी आहेत.

१. बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात व्यवसाय करण्यास उत्तेजन देण्याच्या दृष्टीने पूर्वीच्या धोरणानुसार असलेली सर्व बंधने आणि नियंत्रणे काढून टाकण्यात आली. १९७३ चा विदेशी विनीमय आणि नियमन कायदा (FERA) मोडित काढून त्याजागी विदेशी विनीमय व्यवस्थापन कायदा (FEMA) लागु करण्यात आला त्यामुळे भारतात व्यवसाय करण्यास इच्छुक असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारत प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला.

२. भारतीय कंपन्यांना विदेशी कंपन्यांसोबत भारतात तसेच विदेशात संयुक्तपणे व्यवसाय करण्यास अनुमती प्रदान करण्यात आली.

३. भारताचे आयात धोरण शिथील करण्यात आले. आयात शुल्क सरासरी ७% पर्यंत कमी करण्यात आले आयात परवान्यात त्यानुसार बदल करण्यात आला.

४. कार्यक्षमता, परिमाण, उत्पादन, रचना आणि वितरण यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने १ एप्रिल २००१ पासून ७५० वस्तूवरील परिमाणात्मक नियंत्रणे शिथील करण्यात आली. ज्यामुळे त्यांच्या किंमती कमी झाल्या.

५. निर्यातीवरील सवलती कमी करण्यात आल्या.

६. विदेशी गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने उदार दृष्टीकोण स्विकारण्यात आला. विदेशी गुंतवणूकीला मुक्त परवांगी देण्यात आली.

७. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आणि अनिवासी भारतीयांना भारतात गुंतवणूक करण्याकरीता सवलती देण्यात आल्या.

८. विशिष्ट कालावधीच्या अंतराने विनीमय नियंत्रणे कमी करून रूपयाचे पुर्नमूल्यांकन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि चल खात्यावर रूपयाचे पूर्णत: परिवर्तन स्विकारण्यात आले.

९. सट्टेबाजीला आळा घालणाऱ्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या.

या सर्वांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला याचे विवेचन हा या भाषणाचा प्रमूख उद्देश आहे. सर्वप्रथम भारताची गरज होती ती विदेशी चलनाची गंगाजळी वाढविणे, देशाची निर्यात वाढविणे, परदेशी गुंतवणूकीला आकर्षित करणे, आर्थिक सुदृढता प्राप्त करणे, आर्थिक विकास साध्य करणे. या दृष्टीने सर्वप्रथम भारताच्या विदेशी व्यापाराचा विचार करू.

**भारताची निर्यात वाढ :**

आर्थिक विकासाकरिता निर्यात वाढ करणे हा एक महत्वपूर्ण उपाय समजला जातो. भारताने जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेला अनुरूप अशी जी पाऊले उचलली त्यामुळे १९९१-९२ ते २००७-०८ या कालावधीत भारताच्या निर्यातीत अभूतपूर्व वाढ घडून आली तक्ता क्र. १ वरून ही बाब स्पष्ट होते.

Scanned by CamScanner

तक्ता क्र. १

१९९० नंतरच्या काळातील भारताचे निर्यात मूल्य

| वर्ष | निर्यात राशी (दशलक्ष अ. डॉलर्स) | टक्केवारी |
|---|---|---|
| १९९०-९१ | १८१४३ | १०० |
| १९९१-९२ | १७८६५ | ९८.४७ |
| १९९४-९५ | २७३३० | १४५.१२ |
| १९९९-२००० | ३६८२२ | २०३.२९ |
| २००४-२००५ | ८३५३५ | ४६०.४३ |
| २००७-२००८ | १५५५१२ | ८५७.१५ |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08, AT 7.1 (B) P.A. 81 and Hindustan Times May 2, 2008 P.35

तक्ता क्र. १ नुसार १९९०-९१ साली भारताचे निर्यात मूल्य १८१४३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतके होते १९९१-९२ साली त्यात १.५३ टक्याने घट झालेली आहे परंतू यानंतर मात्र या निर्यातमूल्यात सातत्याने आणि वेगाने वाढ झालेली दिसून येते. १९९४-९५ साली त्यात ४५.१२ टक्यांनी, १९९९-२००० साली १०३.२९ टक्यांनी नंतरच्या ५ वर्षात ३६०.४३ टक्यांनी तर २००७-०८ साली ही निर्यात ७५७.१५ टक्यांनी वाढली होती. या वरून हे स्पष्ट होती की, निर्यात वाढीच्या दृष्टीने जागतिकीकरणाचा स्वीकार सकारात्मक परिणाम देणारा ठरलेला आहे.

**भारताची आयात वाढ :**

निर्यातीसाठी जर आयात होत असेल तर ती आर्थिक विकासाला गती देणारी असते. कच्च्या मालाची

तक्ता क्र. २

१९९० नंतरच्या काळातील भारताचे आयात मूल्य

| वर्ष | आयात राशी (दशलक्ष अ. डॉलर्स) | टक्केवारी |
|---|---|---|
| १९९०-९१ | २४०७५ | १०० |
| १९९१-९२ | १९४११ | ८०.६३ |
| १९९४-९५ | २८६५४ | ११९.०२ |
| १९९९-२००० | ४९६७१ | २०६.३२ |
| २००४-२००५ | १११५१६ | ४६३.२० |
| २००७-२००८ | २३५९११ | ९७९.९० |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08, AT 7.1 (B) P.A. 81 and Hindustan Times May 2, 2008 P.35

Scanned by CamScanner

आयात आणि पक्क्या मालाची निर्यात हे आर्थिक विकासाचे सूत्र आहे. विकसित राष्ट्रांनी या सूत्रानुसारच आपला आर्थिक विकास मुख्यत्वे करून घडवून आणला आहे. जागतिकीकरणाच्या दृष्टीने भारताने जी पाऊले उचलली त्याच्या परिणामस्वरूप भारताची आयातही मोठ्याप्रमाणावर वाढली आहे. पुढील तक्त्यातील आकडेवारी वरून हे स्पष्ट होते.

तक्ता क्र. २ नुसार १९९०-९१ साली भारताची आयात २४,०७५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स येवढी होती त्यात सातत्याने वाढ होत २००७-०८ साली ती २,३५,९११ द.अ. डॉलर्स इतकी झालेली आहे. टक्केवारीचा विचार केला असता १९९०-९१ च्या तुलनेत ही वाढ ९७९.९० टक्के म्हणजेच जवळ जवळ १० पट झालेली आहे. एकत्रित पणे विचार केल्यास हे स्पष्ट होते की, जागतिकीकरणाचा स्विकार करून जी पाऊले उचलली त्याच्या परिणाम स्वरूप भारताच्या आयातीतही निर्यातीपेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाली आहे. एकंदरीत भारताचा विदेशी व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. परंतु आज ही भारताचा व्यापार शेष प्रतिकूल असून त्यात उत्तरोत्तर वेगाने वाढ होत आहे. ही चिंतेची, विचार करण्याची बाब आहे.

भारताचा व्यापार शेष :

प्रत्येक देशाचा प्रयत्न हा त्याचा व्यापार शेष अनुकूल व्हावा व कायम तसाच रहावा येवढेच नव्हे तर तो अधिकाधिक अनुकूल व्हावा असाच असतो. भारतानेही आपल्या सामर्थ्यानुसार हा व्यापार शेष अनुकूल करण्याचा सातत्याने प्रयत्न केला परंतु अद्यापीही त्यात यश मिळालेली नाही. जागतिकीकरणाच्या प्रयत्नामुळे आर्थिक धोरणात जे मूलभूत बदल करण्यात आले त्यामुळे निर्यात वाढ झाली हे जरी खरे असले तरी आपण आयात मर्यादित ठेऊ शकलो नाही हे अपयशच म्हणावे लागेल. भारताचा हा व्यापार शेष आर्थिक सुधारणा नंतरच्या काळात सातत्याने वाढत आहे. तक्ता क्र. ३ वरून ही बाब स्पष्ट होते.

## तक्ता क्र. ३
## १९९० नंतरच्या काळातील भारताचा व्यापार शेष

| वर्ष | निर्यात राशी (दशलक्ष अ. डॉलर्स) | आयात राशी (दशलक्ष अ. डॉलर्स) | व्यापार शेष (द. अ. डॉलर्स) |
|---|---|---|---|
| १९९०-९१ | १८१४३ | २४०७५ | ५९३२ |
| १९९१-९२ | १७८६५ | १९४११ | १५४६ |
| १९९४-९५ | २६३३० | २८६५४ | २३२४ |
| १९९९-२००० | ३६८२२ | ४९६७१ | १२८४९ |
| २००४-२००५ | ८३५३५ | १११५१६ | २७९८२ |
| २००७-२००८ | १५५५१२ | २३५९११ | ८०९३८ |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08, AT 7.1 (B) P.A. 81 and Hindustan Times May 2, 2008 P.35

Scanned by CamScanner

तक्ता क्र. ३ नुसार १९९०-९१ साली भारताचा व्यापारशेष ५९३२ दशलक्ष डॉलर्सने प्रतिकूल होता. १९९१-९२ साली ही प्रतिकूलता १५४६ दशलक्ष डॉलर्स पर्यंत कमी झाली होती. त्यानंतर त्यात सातत्याने वाढच होत गेली आहे. २००७-०८ साली तर हा प्रतिकूल व्यापार शेष ८०,९३८ द.अ. डॉलर्स येवढा प्रचंड होता. अशाप्रकारे १९९०-९१ पासून २००७-०८ पर्यंत असे एकही वर्ष नाही की ज्यावर्षी भारताचा व्यापार शेष अनुकूल होता. जोपर्यंत आयातीपेक्षा निर्यात जास्त होऊन व्यापार शेष अनुकूल होत नाही तोपर्यंत इतर देशातील संपत्ती भारतात येणार नाही. आजपर्यंत भारताची संपत्ती ही देशाबाहेरच गेलेली आहे असा स्पष्ट निष्कर्ष यातून निघतो.

केवळ देशाच्या एकूण आयात निर्यातीची आकडेवारी अभ्यासून देशाच्या आर्थिक विकासाबाबत निष्कर्शाप्रत येणे हे तितकेसे बरोबर नसले तरी आयात जास्त असल्यामुळे देशावरचा आर्थिक बोझा सातत्याने वाढतो हे जितके सत्य आहे तितकेच हेही सत्य आहे की ही आयात निर्यात कोणत्या वस्तुंची होत आहे याचा अभ्यास करुन घेतलेला निष्कर्ष हा नेहमी सत्य परिस्थितीच्या जास्त जवळ जाणारा असतो. त्यामुळे देशाच्या विदेशी व्यापाराची संरचना समजून घेणे महत्वाचे आहे. त्या आधारे भारताने जागतिकीकरणाच्या दृष्टीने जी पाऊले उचलली त्याचा परिणाम लक्षात घेणे सोपे जाईल.

**भारताची आयात संरचना :**

जर एखादा देश अन्नधान्य आणि कच्च्यामालाची आयात करीत असेल व तयारमाल, यंत्रसामग्री आणि भांडवली उपकरणांची निर्यात करीत असेल तर त्या देशाने आर्थिक विकासाची वरची पातळी गाठली असे समजले जाते. भारताची आयात संरचना अभ्यासली असता असे दिसून येते की, भारताच्या आयातीत आर्थिक सुधारणा केल्यानंतरच्या काळात पेट्रोलियम, ऑईल आणि लुब्रीकंटस्च्या आयातीत मोठ्याप्रमाणावर वाढ झालेली आहे. १९९०-९१ मध्ये हे प्रमाण एकूण आयातीच्या २५ टक्के होते जे २००६-०७ साली ३०.८ टक्के झालेले इतके वाढलेले आहे. एकूण ५७१४३ मिलीयन डॉलर्सची ही आयात आहे. भांडवली वस्तुंची आयात ती १९९०-९१ साली २४.२ टक्के होती त्या टक्केवारीत घट होऊन ती १५.४ टक्क्यापर्यंत कमी झाली आहे. सोने-चांदी या सारख्या मौल्यवान धातुंची आयात २.५ टक्क्यावरून ९.३ टक्क्यापर्यंत वाढली आहे. खाद्य तेलांच्या आयातीचे प्रमाण वाढले आहे. खतांची आयात टक्केवारी कमी झालेली आहे. लोखंड व पोलाद या वस्तुंच्या आयातीची टक्केवारी कमी झालेली आहे. वाहतुकीच्या सामग्रीची आयात टक्केवारी वाढली आहे मोती व मौल्यवान रत्नांच्या आयातीची टक्केवारी कमी झालेली आहे.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास भारताचा पेट्रोलियम ऑईल आणि लुब्रीकंटस् आयातीत प्रथम क्रमांक आहे. त्यानंतर सोने-चांदी यावरील आयात खर्चाचा दूसरा नंबर लागतो. अविद्युत यंत्रसामग्रीच्या आयातीतही वाढ झालेली आहे. मोती आणि दागदागिण्यांची ही मागणी वाढल्यामुळे त्यांच्याही आयातीत वाढ झालेली आहे. खाद्य तेलांची देशांतर्गत मागणी वाढल्यामुळे या पदार्थाच्या आयातीतही वाढ नोंदविण्यात आली आहे. लोह व पोलादाचे देशांतर्गत उत्पादन वाढूनही त्यांची मागणी सातत्याने वाढत असल्याने त्यांच्या आयातीतही वाढ झालेली आहे. मात्र एकूण आयातीतील टक्केवारी कमी झालेली आहे. आयात संरचनेतील हा बदल भारत हा प्रगतीच्या दिशेने पुढे जात

Scanned by CamScanner

आहे हे सुचित करतो.

वस्तुंच्या व्यापार वाढीकरीता वाहतुक आणि वित्त पुरवठा या दोन बाबींना विशेष महत्व आहे. आयातीत वस्तु व सेवा या दोन्हीचाही यात समावेश होतो. विदेशातून आयात होणाऱ्या सेवांची स्थिती अशी आहे.

तक्ता क्र. ४

भारतातील सेवांची आयात

| सेवा प्रकार | २०००-२००१ शे. प्रमाण | | २००६-२००१७ शे. प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| १. पर्यटन | १९.२ | ४५.१ | १५.१ | ३४.७ |
| २. वाहतूक | २४.४ | | १८.२ | |
| ३. विमा | १.५ | | १.४ | |
| ४. सॉफ्टवेअर सर्व्हीस | ४.१ | ४.१ | ५.१ | ५.१ |
| ५. नॉन सॉफ्टवेअर सर्व्हीस | ५०.६ | | ६०.२ | |
| अ. व्यावसायिक सेवा | ७.० | ५०.८ | ३८.५ | ६०.२ |
| ब. वित्त सेवा | १३.५ | | ४.७ | |
| क. संदेशवाहन सेवा | ०.९ | | १.५ | |
| ड. इतर सेवा | २९.४ | | १५.५ | |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08 (Delhi, 2008) Table 6.13 P. 121

२००६-०७ साली आयातीत सेवांचे मूल्य ४४,००० दशलक्ष डॉलर्स इतके होते. जे यापूर्वीच्या वर्षापेक्षा २८.७ टक्याने जास्त होते. आयातीत सेवांचा विचार करता असे दिसून येते की वाहतूक, विमा व पर्यटन क्षेत्रातील आयातीत सेवांची टक्केवारी कमी झाली आहे. ४५.१ टक्क्यावरून हे प्रमाण ३४.७ टक्क्यापर्यंत उतरले आहे. सॉफ्टवेअर सेवांमध्ये १ टक्याने वाढ झालेली आहे. नॉन सॉफ्टवेअर सर्व्हीसमध्ये आयातीत व्यावसायिक सेवांची टक्केवारी मोठ्याप्रमाणावर वाढली आहे. ७ टक्यावरून हे प्रमाण ३८.५ टक्यापर्यंत पोहचले आहे. आयातीत वित्तसेवांची टक्केवारी कमी झाली आहे. संदेशवाहन सेवांची टक्केवारी वाढलेली असून इतर सेवांची टक्केवारी कमी झालेली आहे. एकंदरीने व्यावसायिक सेवांच्या आयातीचे मोठ्याप्रमाणावर वाढलेले प्रमाण भविष्यात देशाला कमी करता येईल वस्तु आजमात्र त्याची विकासाच्या दृष्टीने आवश्यकता असल्यामुळे काळजीचे कारण नाही.

**सेवाक्षेत्रातील भारताची निर्यात संरचना :**

सेवा क्षेत्रातील भारताची निर्यात ही अलिकडच्या काळात मोठ्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. २००६-

Scanned by CamScanner

०७ या वर्षी भारताची ही निर्यात ४४००० दशलक्ष डॉलर्स या सेवांच्या आयातीच्या तुलनेत ७६२०० दशलक्ष डॉलर्स इतकी होती. सेवाक्षेत्रातील हा वाढता निर्यात दर भारताचा व्यापार शेष कमी करण्यास मोठ्याप्रमाणावर हातभार लावित आहे. २००१ ते २००६ या कालावधीची आकडेवारी ही स्थिती स्पष्ट करते.

तक्ता क्र. ५

भारताची सेवांची निर्यात

| सेवा प्रकार | २०००-२००१ शे. प्रमाण | | २००६-२००१७ शे. प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| १. पर्यटन | २१.५ | ३५.८ | १२.० | २४.४ |
| २. वाहतूक | १२.६ | | १०.६ | |
| ३. विमा | १.७ | | १.८ | |
| ४. सॉफ्टवेअर सर्व्हीस | | ३९.० | | ४१.१ |
| ५. नॉन सॉफ्टवेअर सर्व्हीस | २५.३ | | ३४.५ | |
| अ. व्यावसायिक सेवा | २.१ | २५.२ | २५.३ | ३४.५ |
| ब. वित्त सेवा | २.१ | | ३.८ | |
| क. संदेशवाहन सेवा | ७.० | | २.८ | |
| ड. इतर सेवा | १४.० | | ०२.६ | |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08 (Delhi, 2008) Table 6.12 P. 120

भारताच्या सेवा निर्यातीत पर्यटन क्षेत्राच्या संदर्भात २०००-०१ च्या तुलनेत २१.५ टक्यावरून २००६-०७ मध्ये १२ टक्यापर्यंत घट झालेली आहे. वाहतूक क्षेत्राच्या संदर्भात १२.६ टक्यावरून १०.६ टक्यापर्यंत घट झालेली आहे. या दोन्ही क्षेत्रातील आयातीचे प्रमाण जास्त असल्यामुळे व्यापारशेष वाढलेला आहे. सॉफ्टवेअर क्षेत्रात आयातीच्या तुलनेत निर्यातीची टक्केवारी खूप जास्त आहे. २००६-०७ साली सॉफ्टवेअरची आयात ५.१ टक्याची असून निर्यात मात्र ४१.१ टक्याची आहे. नॉन सॉफ्टवेअर सर्व्हीसेस मध्ये मात्र भारताची निर्यात ही आयातीच्या तुलनेत टक्केवारीने कमी आहे ती वाढविण्याची गरज आहे.

भारताची २००० ते २००५ पर्यंत सॉफ्टवेअर मध्ये एकाधीकार होता पण २००७ नंतर मात्र तो क्रमांक ७ वर गेला कारण भारत सरकारचे HRD कडे दूर्लक्ष व त्यामध्ये झालेली कमी गूंतवणूक होय.

अशाप्रकारे भारताने जागतिकीकरणाचा स्विकार करून जी पाऊले उचलली त्याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर निश्चितच परिणाम झाला आहे. भारताची निर्यात मोठ्याप्रमाणावर वाढली. मात्र आयातीतही त्यापेक्षा जास्त प्रमाणात वाढ झाल्यामुळे देशाचा व्यापार शेष सतत प्रतिकूलच राहिला आहे. यापुढे वस्तूंच्या निर्यातीत सातत्याने वाढ करण्याची गरज असून आयातीतील वाढीचा वेग कमी करण्याची गरज आहे.

भारतातील विदेशी गुंतवणूकीत वाढ करणे हा ही नविन सुधारित धोरणाचा एक उद्देश होता त्या संदर्भात पुढील परिस्थिती दिसून येते.

Scanned by CamScanner

**भारतातील विदेशी संस्थागत गुंतवणूक :**

विदेशी गुंतवणूकीला भारतात मोकळी वाट करून देण्यात आली. परिणामस्वरुप देशातील विदेशी गुंतवणूक मोठ्याप्रमाणावर वाढली. परंतू ही गुंतवणूक देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करणारी असते. विशेषत: शेअर मार्केटमध्ये जर ही गुंतवणूक झाली असेल तर ती विशेष काळजीची बाब असते. शेअर बाजारात नोंदणीकृत कंपन्यांच्या भागांच्या खरेदी–विक्रीची उलाढाल होते. यातील ३० मोठ्या कंपन्यांचे भाव त्या दिवशीचा निर्देशांक ठरवित असतात त्यामुळे शेअरचे भाव वाढले की, निर्देशांक वाढतो आणि भाव कमी झाले की निर्देशांक घसरतो. अर्थशास्त्राच्या नियमानुसार भागांच्या मागणीवर हे भाव अवलंबून असतात. मागणी वाढली की भाव वाढतो आणि मागणी कमी झाली की भाव कमी होतो. भागांची मागणी ही नेहमीच कंपन्यांच्या प्रगतीवर कमी जास्त होते असे नाही. शेअर बाजारात जी खरेदी–विक्री होते तो पैसा संबंधित कंपन्यांना मिळत नाही. हा खरेदीदार आणि विक्रेता यांच्यातील व्यवहार असतो. शेअर बाजारात खूप पैसा आला म्हणजे तो पैसा कंपन्यांना मिळून त्याचा उपयोग उत्पादन वाढीवर होईल असे समजण्याचे कारण नाही या पैशाचा प्रत्यक्ष कंपन्यांना त्यांच्या व्यवहारात कोणताच उपयोग नसतो. सरकारला मात्र या व्यवहारातून कर मिळत असतो. जेवढे व्यवहार जास्त होतील तेवढे करापासून मिळणारे उत्पन्न जास्त असते. शेअर बाजारात साधारणत: व्यक्तिगत, संस्थागत व विदेशी संस्थागत गुंतवणुकदार, गुंतवणूक करीत असतात. गत ५–६ वर्षात विदेशी संस्थागत गुंतवणूक भारतीय बाजारात वाढलेली आहे. निर्देशांक २१००० वर असतांना ही गुंतवणूक अशी होती.

**तक्ता क्र. ६**

**भारतीय बाजारातील विदेशी संस्थागत गुंतवणूक**

| दिनांक | निर्देशांक | गुंतवणूक राशी (मिलीयन डॉलर) | वाढ/घट |
|---|---|---|---|
| १/६/२००४ | ४८३५ | २४२९२.१० | १०० |
| २७/७/२००६ | १०७४१ | ४३८२१.४० | १७३.२७ |
| ९/१/२००८ | २१११३ | ६७०४८.५० | २६५.१० |
| ८/१०/२००८ | १०७४० | ५६४८५.९० | २३३.३४ |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08 (Delhi, 2008) Table 6.13 P. 121

गत ९ महिन्याच्या कालावधित भारताचा संरचनात्मक विकास कुठेही थांबला नाही तरीही निर्देशांक गडगडला. कारण विदेशी संस्थागत निवेशकांनी आपल्या शेअर्सची विक्री सुरू केली म्हणजेच बाजारातील आपली गुंतवणूक काढून घेतली. गुंतवणूकीतील ही घट १०५६२.६० मिलीयन डॉलर्सची आहे. दोन वर्षात वाढलेल्या गुंतवणूकीच्या ४५% याचे प्रमाण आहे.

याचाच अर्थ असा की शेअर बाजार चढला तोही विदेशी संस्थागत निवेशकांमुळे आणि उतरलाही त्यांच्याच मुळे त्यांनी असे का केले तर अमेरिकेत मंदी आली होती त्यामुळे त्यांनी भारतातील आपली गुंतवणूक विकून तरलता वाढविली हे या घसरणीचे महत्वाचे कारण आहे. परंतु या घसरणीमुळे सर्वात जास्त नुकसान झाले ते व्यक्तीगत गुंतवणूकदाराचे म्हणजेच सामान्य माणसांचे सामान्य माणसांचा तोटा झाला त्यांची बचत संपली. ती काही प्रमाणात

Scanned by CamScanner

विदेशात गेली व तेथिल मंदी कमी करण्यास कारणीभूत ठरली. या विदेशी निवेशकांनी त्यांची गुंतवणूक निश्चितच तोट्यात विकली नाही. त्यांनी नफा कमावला तो भारतात. जागतिकीकरणाचा हा परिणाम यामुळे वेळीच लक्षात आला त्यामुळे यापुढे अशा विदेशी निवेशकांवर कांही नियंत्रणे आणता येतील कां ? या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. आपली अर्थव्यवस्था सुदृढ असतांनाही जागतिक मंदीत आपल्या देशाला सहभागी व्हावे लागते याचा विचार या घटनेतून निश्चितच केला जाईल. या जागतिक मंदीचा फायदा आर्थिक महासत्ता होण्याच्या दृष्टीने कसा घेऊ शकतो याचाही विचार होण्याची शक्यता यामुळे वाढली आहे.

विदेशी कर्जाचा वाढ भार हाही या धोरणाचा महत्त्वाचा भाग आहे. या संदर्भात पुढील स्थिती दिसून येते.

**भारताच्या विदेशी कर्जातील वाढ :**

भारताच्या विदेशी कर्जाचा भार सातत्याने वाढत आहे. आर्थिक सुधारणांच्या परिणामस्वरूप तो आणखी वाढला आहे. व सातत्याने वेगाने वाढतो आहे. तक्ता क्र. ८ वरून ही बाब अधिक स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ७**

**भारताचे विदेशी कर्ज** (यू.एस. बिलीयन डॉलर्स)

| अ.क्र. | कर्जाचे प्रकार | मार्च १९९१ | मार्च २००२ | मार्च २००५ | मार्च २००७ | सप्टें २००७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिर्घकालीन कर्ज | ७५.३ | ९६.१ | ११५.३ | १४३.४ | १५९.७ |
| २. | अल्पकालीन कर्ज | ८.५ | २.७ | १७.७ | २६.२ | ३०.८ |
| अ. | एकूण विदेशी कर्ज | ८३.८ | ९८.८ | १३३.० | १६९.६ | १९०.५ |
| ब. | अल्पकालीन कर्जाचे एकूण कर्जाशी शे. प्रमाण | १०.२ | २.८ | १३.३ | १५.५ | १६.२ |
| क. | सवलतीच्या कर्जाचे एकूण कर्जाची शे. प्रमाण | ४५.८ | ३५.९ | ३०.९ | २३.३ | २१.४ |
| ड. | विदेशी कर्जाचे सकल घरेलू उत्पादनाशी शेकडा प्रमाण (बाजारामूल्यानुसार) | २८.७ | २१.१ | १८.५ | १७.९ | उ.ना. |
| इ. | कर्जाच्या परतफेडीची टक्केवारी चल प्राप्तीशी | ३५.३ | १३.६ | ६.१ | ४.८ | ४.५ |

स्रोत : Govt. of India, Economic Survey, 2007-08 (Delhi, 2008) Table 6.12 P. 158

भारताचे विदेशीकर्ज आर्थिक सुधारणा स्विकारल्यानंतरच्या काळात सातत्याने वाढत गेलेले आहे. १९९१ साली ही कर्जाची राशी ८३.८ बिलीयन यु.एस. डॉलर्स येवढी होती ती सप्टेंबर २००७ पर्यंत १९०.५ पर्यंत वाढलेली आहे. अल्पकालीन कर्जाचे एकूण कर्जाशी असलेले प्रमाण १०.२ टक्यावरून १६.२ टक्यापर्यंत पोहचले

Scanned by CamScanner

आहे. १९९१ साली विदेशी कर्ज घरेलू उत्पादनाच्या २८.७ टक्के होते ते १७.९ पर्यंत कमी झालेले आहे. मात्र प्रत्यक्षात कर्ज राशी कमी झाली नसून घरेलू उत्पादन वाढ झालेली आहे त्यादृष्टीने १९९१ च्या तुलनेत स्थिती बरी आहे. त्याचवेळी कर्जपरतफेडीचे प्रमाण ३५.३ टक्यावरुन ४.५ टक्यापर्यंत घसरलेले आहे ही काळजीची बाब आहे.

एकंदरीत विदेशी कर्जातील ही वाढ नियंत्रित करण्याची गरज आहे अन्यथा विकासाचे फायदे देशाला न मिळता विदेशाला मिळतील. मेहनत आमची व लाभ त्यांचा ही परिस्थिती अनुभवावी लागेल. नवीन आर्थिक धोरणांच्या परिणाम स्वरूप जगातील घडामोडीत भारताची स्थिती काय आहे ते पाहणे महत्वाचे आहे.

**भारत आणि जागतिक आर्थिक घडामोडी :**

जागतिक अर्थकारणाचा इंधन दर, कर्जाची उपलब्धता आणि भाग बाजारातील गुंतवणूक यावर प्रामुख्याने परिणाम होत असतो. आणि त्यांचे परिणाम झिरपत झिरपत अर्थव्यवस्थेच्या मुळाशी पोहचतात. इंधन तेलाचे दर वाढले की महागाई वाढते. मोठ्या कंपनीने दिवाळे काढले की भाग बाजारात भागांचे मूल्य कमी होण्याची प्रवृत्ती वेगाने काम करते. सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण होऊन गुंतवलेला पैसा परत घेण्याची प्रत्येकाची धडपड सुरू होते आणि याचा अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होतो. अमेरिकेतील बड्या कंपन्यांच्या पडझडीमुळे जगभरात निर्माण झालेल्या आर्थिक अस्थैर्याचा परिणाम साऱ्या जगात विशेषत: युरोपात अधिक जाणवतो आहे. भारतात तो त्याप्रमाणात जाणवत नाही हा भारताची अर्थव्यवस्था मजबुत असल्याचा पुरावा समजला जातो. यामागील महत्वाचे कारण म्हणजे भाग बाजार आणि भांडवली बाजारावर मोठ्या कंपन्यांचे अर्थकारण जेवढे अवलंबून असते तेवढे सामान्य माणसांचे अर्थकारण अवलंबून नसते. भारतात अशा सामान्य माणसांची संख्या मोठ्याप्रमाणावर आहे. ही भारतातील सामान्य माणसे पैसा गुंतवितांना लाभ प्राप्तीपेक्षा पैशाच्या सुरक्षिततेचा विचार आधी करतात व आर्थिक जुगारापासून लांब राहण्याचा प्रयत्न करतात. आज भाग बाजारात आणि भांडवल बाजारात भारतीयांची गुंतवणूक वाढली असली तरी ११३ कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाच्या मनाने ती फारच कमी आहे. आजही आपली अर्थव्यवस्था पूर्णपणे अमेरिका आणि जागतिक बाजारच्या दावणीला बांधल्या गेलेली नाही त्यामुळेच ती हा धक्का पचवू शकली आहे. आणि याचे श्रेय देशाच्या मिश्र अर्थव्यवस्थेला दिले पाहिजे.

अर्थमंत्र्यांच्यामते सध्याचा काळ हा अनिश्चिततेचा काळ आहे. अर्थतज्ञांच्यामते अत्यंत सावध राहण्याची ही वेळ आहे. जागतिकीकरणात किती पुढे जावे याचा विचार करण्याची ही वेळ आहे. आज केवळ सुदैवाने देशाच्या दृष्टीने शेअर बाजाराचा निर्देशांक महत्वाचा घटक असला तरी तो एकमेव घटक नाही. आज भारतीयांची गुंतवणूक अपेक्षित लाभ देणारी नसली तरी ती सुरक्षित आहे. अमेरिकेच्या आर्थिक क्षेत्रात तर हाहाकार माजला आहे संपूर्ण गुंतवणुकीवरच प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. ती सर्व बुडते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

अर्थशास्त्रात गुंतवणूक किंवा व्यवसायाच्या क्षेत्रात लिक्वीडीटी किंवा तरलता या संकल्पनेला फार महत्व आहे. संपत्तीच्या मूल्यात लक्षणीय घसरण न होता तिच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार सातत्याने चालत राहणे म्हणजेच बाजार प्रवाही आहे, चालते आहे असे समजले जाते. पैसा असा खेळत राहिला की त्यातून आणखी पैसा निर्माण होतो. आणि तो आणखी गुंतविला की बाजारातील तरलता वाढते. या परिवर्तनीयतेसाठी मुळात बाजारात पुरेसा पैसा उपलब्ध

Scanned by CamScanner

असावा लागतो. नेमकी ही बाब अमेरिकेतील कंपन्याच्या अर्थकारणाआड आली आणि मोठ्या कंपन्या धडाधड कोसळल्या. त्या कोसळल्या बरोबर जगातील बाजारांमध्ये त्या कंपन्यांशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंधित असलेली गुंतवणूक धोक्यात येऊन सर्वत्र हाहाकार माजला. अमेरिकेने यावर उपाययोजना म्हणून इमर्जन्सी इकॉनामिक स्टॅबिलायझेशन ॲक्ट हा कायदा मंजूर करवून सरकारी खजिन्यातील ७०० अब्ज डॉलर्सचा वापर ही आर्थिक पडझड थांबविण्याकरीता करण्यास सुरवात केली आहे. व त्याचे अनुकूल परिणामही हळूहळू पुढे येत आहे.

भारताची अर्थव्यवस्था तुलनेने मजबुत असली तरी आता पुरेशा सावधानतेने या आव्हानाला सामोरे जाऊन भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही आणि झालीच तर त्यावर उपाययोजना करण्याचे सामर्थ्य सरकारच्या खजिन्यात राहिल याची काळजी घेतली पाहिजे. समोरच्याला ठेच, मागचा शहाणा हे लक्षात घेण्याची गरज आहे. सामान्य जनतेला पैशाची गुंतवणूक लाभदायक व सुरक्षित कशी करता येईल या दृष्टिने योग्य संधीची उपलब्धता सरकारी प्रयत्नातून होण्याची गरज आहे. कंपन्यामधील गुंतवणूक श्रीमंतानाच लखलाभ असो कारण त्यांच्यात हा आर्थिक धक्का पचविण्याचे सामर्थ्य असते. सामान्य भारतीय प्रथम गुंतवणूकीची सुरक्षितता बघतो आणि हेच त्याचे बलस्थान आहे.

आज अमेरिकेतील मंदिचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या झालेला आहे. भारताचा विदेशी चलनाचा साठा तुलनेने कमी झाला आहे. विकास दर घटलेला आहे. देशात महागाई अत्यूच्य टोकाला पोहचली आहे. याला देशांतर्गत झालेली अतोनात चलनवाढही तेवढीच कारणीभूत आहे. भारतातील चलनवाढीचा विचार केला असता चिंताजनक परिस्थिती दिसून येते.

**महागाई व अर्थव्यवस्थेतील चलनवाढ :**

आयातित तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे महागाई वाढते हे जरी खरे असले तरी ते केवळ एक कारण आहे. भारतात मात्र चलनवाढ हेच महागाईचे प्रमूख कारण असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. १९४७–४८ ते १९६२–६३ या कालावधित भारताने फारशी चलनवाढ केलेली नाही. १३०४ कोटी रूपयावरून २४३९ कोटी रूपयापर्यंत म्हणजे जवळपास दुपटीपेक्षाही कमी या काळातील चलनवाढ होती १९९१ नंतरच्या १५ वर्षात चलनवाढ ही ८७ टक्याने झाली तर राष्ट्रीय उत्पन्न ६४ टक्याने वाढले त्यामुळे किंमतीतील वाढ ३० टक्याची नोंदविल्या गेली. त्यानंतरच्या काळात मात्र रिझर्व्ह बँकेला अनिर्बंध आदेश देऊन खर्च भागविण्याकरीता (जो जागतिकीकरणाच्या परिणामस्वरूप विदेशी गुंतवणूकीला आकर्षित करण्याकरीता आवश्यक सोई, सुविधा पुरविल्यामुळे अतोनात वाढला होता) चलनपुरवठा मोठ्याप्रमाणावर वाढविण्यात आला.

१९७९–८० साली देशातील चलनसाठा ४३७९२ कोटी रूपये होता. सध्या तो ४०,९९,९५७ कोटी रूपये इतका प्रचंड वाढला आहे.

१९४७ नंतर देशाचे राष्ट्रीय उत्पन्न १५ पटीने वाढले असून चलनपुरवठा मात्र ४६३ पटींनी वाढला आहे.

१९४७ नंतर देशातील किंमत वाढ ४.५ टक्यावरून २३५ टक्यापर्यंत झालेली आहे.

इतर देशांच्या तुलनेत भारतातील चलनवाढ भयानक आहे. १९६० ते २००६ याकाळात अमेरिकेची

Scanned by CamScanner

चलनवाढ ३५ पट, स्विडनची चलनवाढ २९ पट, सिंगापूरची चलनवाढ ३८ पट, ऑस्ट्रेलियाची चलनवाढ ९.५ पट झाली आहे, तर भारताची चलनवाढ मात्र ६७७ पट नोंदविण्यात आलेली आहे.

चलनात येणाऱ्या अतिरिक्त चलनाच्या प्रमाणात शेती, उद्योग, नैसर्गिक साधन संपत्ती यात समन्वय प्रस्थापित करून उत्पादकता वाढवली असती तर किंमती इतक्या प्रमाणात वाढल्या नसत्या.

सिंगापूर हे ८० लक्ष लोकांचे एक छोटेसे राष्ट्र आहे. १९७४ ते २००८ या कालावधित त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न दहापटीने वाढले व चलनपुरवठा केवळ दीड पटीने वाढला. याचकाळात भारताचे राष्ट्रीय उत्पन्न ६ पटीने वाढले परंतू चलनपुरवठा मात्र ८७ पट वाढला परिणाम किंमतीत मोठ्याप्रमाणावर वाढ झाली.

येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, देशातील वाढत्या किंमतीचा फायदा उद्योगपती व व्यापारी यांना जास्त होतो. सरकारला करापासून जास्त उत्पन्न मिळते मात्र किंमती वाढल्यामुळे मध्यमवर्ग व गरीब वर्गाचे वास्तविक उत्पन्न कमी होते आणि त्यांचे हाल होतात.

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या या कठिण परिस्थितीत अर्थव्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन न केल्यामुळे देशातील हा चलनपुरवठा वाढलेला दिसून येतो. दरवर्षी अंदाजपत्रकात वाढणारी तूट, अन्नधान्ये खते व पेट्रोलच्या किंमती यासाठी लाखो रूपयांची देण्यात येणारी अनुदाने, सरकारचा वाढता अनुत्पादक खर्च, वेळोवेळी उद्भवणारी नैसर्गिक संकटे, मानव निर्मित समस्या यामुळे सातत्याने उत्पन्न कमी व खर्च जास्त ही परिस्थिती कायम राहिली व नोटा छापून चलनवाढ करण्यात आली. या चलनवाढी सोबतच शेती व उद्योगांची उत्पादकता वाढणे आवश्यक होते. तसे झाले नाही व आता ही महागाई सोसण्याच्या पलिकडे गेलेली आहे.

यावर सध्यपरिस्थितीत राजकोषिय साधने आणि मौद्रिक उपायांसोबतच देशाचा उपभोग कमी करणे, गरजा मर्यादित ठेवणे, उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणे याची नितांत आवश्यकता आहे. आणि ही केवळ सरकारचीच जबाबदारी आहे असे नाही तर देशातील जनतेने सुद्धा याचा स्विकार करणे व त्यानुरूप आचरण करणे व तसे नियोजन करणे गरजेचे आहे. सरकारला सुद्धा जनतेची साथ मिळणे आवश्यक असते. भावनेच्या आहारी जाऊन अनेकदा जनता स्वत:च राष्ट्रीय संपत्तीला हानी पोहचवते हे कुठेतरी थांबविण्याची गरज आहे. जागतिकीकरणाच्या या प्रक्रीयेत यशस्वी होण्याकरीता देशाने संघटित होण्याची प्रमुख आवश्यकता असते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे एक नविन जग अस्तित्वात आले आहे. आता विदेशी भांडवलाचा ओघ नफ्याच्या प्रेरणेने भारतात मोठ्याप्रमाणावर येऊ लागला असूनही याचा भारतीय निगम क्षेत्राला लाभ होत नसून ते क्षेत्र विदेशी कंपन्यांचे लक्ष बनले आहे. भारतातील त्यांची ही गुंतवणूक ते कधीही काढून देशाच्या अर्थव्यवस्थेला प्रभावित करू शकतात याचा अनुभवही देशाने नुकताच घेतला आहे. आता भारतात प्रचंड बहुदेशीय कंपन्या खास रोखून आपल्या भवितव्याची वाट पाहत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकत्रीकरण अशा रितीने एकप्रकारे हत्तीच्या कळपाशी, उंदराच्या कळपाचे एकत्रीकरण करण्यासारखे आहे. विदेशी कंपन्यांनी सर्वशक्तीनिशी आणि आक्रमकतेने भारतीय बाजारपेठेमध्ये शिरकाव करून या बाजारपेठांवर नियंत्रण मिळविले आहे. यामुळे भारताच्या कार्पोरेट म्हणजेच निगमक्षेत्रात चिंतेचे वातावरण पसरले आहे. संयुक्त उपक्रमाच्या क्षेत्रात या बहुराष्ट्रीय

Scanned by CamScanner

कंपन्यांनी विजेच्या गतीने भारतीय हिस्सेदारांना हुसकावून लावून त्या उपक्रमांवर पूर्ण नियंत्रण मिळविले आहे.

जागतिकीकरणाचा विकासशील देशांवर काय परिणाम होईल याची गरमागरम चर्चा सर्व जगभर सुरू आहे. भारताला सर्वाधिक नुकसान व्यापारी संबंधी बौद्धीक मालमत्तेचा हक्क (Trade Related Intellectual Property Rights) गुंतवणूकीच्या उपाययोजना आणि सेवा संबंधी करार यामुळे होण्याची शक्यता आहे. बौद्धीक मालमत्तेचा हक्काचा विस्तार आता वनस्पतीच्या पेटंटद्वारा कृषीक्षेत्रा पर्यंत झाल्यामुळे त्याचा भारतावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. वनस्पतींच्या सर्व नवीन जातीची मालकी या बहूराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या अवाढव्य साधन धनामुळे सहज बळकाउ शकतील. त्यापैकी काही कंपन्याचा संशोधन खर्च भारत सरकारच्या वार्षिक अर्थसंकल्पापेक्षा अधिक आहे. या कंपन्या वनस्पती आणि बी–बियानांच्या उत्पादनाचे नियंत्रण सहज करू शकतील. बी–बियांणाचे नियंत्रण हे अन्न पुरवठ्यावरील नियंत्रणच असल्यामुळे संपूर्ण भारतीय अन्न सुरक्षा धोक्यात येण्याची शक्यता आहे. कडूलिंब, हळद यांच्या पेटंट बाबत अमेरिकत कंपन्यांनी हक्क दाखविला असून याबाबत वाद सुरूच आहे.

सेवा क्षेत्राचा म्हणजेच बँकिंग, वीमा, दूरसंचार आणि जहाज वाहतूक यांचा व्यापारात अंतर्भाव केल्यामुळे त्याचा फायदा भारतासारख्या विकासातील राष्ट्रापेक्षा विकसित देशांनाच अधिक प्रमाणात होईल. विदेशी कंपन्या आपल्या सेवांचे जाळे भारतात पसरतील आणि त्या नफा, व्याज, मालकी, हक्क इत्यादींचे उत्पन्न त्यांच्या देशात पाठवतील. या सर्वांचा भारताच्या विदेशी हुंडणावळीवर ताण पडेल. हे लक्षात घेऊन याचा प्रत्येक भारतीयाने विचार करणे आवश्यक आहे. आता भारतीयांनी जास्तीत जास्त कंपन्यांची स्थापना करून अमेरिकन कंपन्याप्रमाणे देशाच्या आर्थिक विकासात योगदान देण्याची तयारी केली पाहिजे. मोठी स्वप्ने पाहण्याची वेळ आलेली आहे. अशक्य हा शब्द आता संपला पाहिजे. ज्यांचा आपल्या स्वप्नांवर विश्वास असतो, तेच आपलं भविष्य घडवू शकतात. ज्यांनी आपली स्वप्ने साकार केली अशांचा अनुभव आपल्या कामी येतो. मात्र याकरीता स्वत:ला प्रयत्न करावे लागतात. अमेरिकन माणसांचा अभ्यास केला असता एक लक्षात येते की अमेरिकन वैय्यक्तिकदृष्ट्या कमकुवत आहे परंतू कंपन्यांच्या माध्यमातून अतिशय बळकट झाला आहे. विश्वातील सर्वोत्तम सेवा देणारी, प्रतिष्ठित व उत्कृष्ठ तंत्रज्ञ असलेली कंपनी स्थापन करण्याचे स्वप्न अमेरिकन बघत असतो. परिश्रम त्याचे व लागणारा पैसा जनतेचा हे त्यांचे सूत्र आहे. आज जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेत भारतातील नवीन पिढीने असे स्वप्न पाहण्याची गरज आहे. जागतिकीकरणाची लय व वेग पकडून काम करणं, उद्योगाच शंभर टक्के व्यवसायीकरण करणं आणि ग्राहकांच्या गरजा ध्यानात ठेवून स्पर्धेला तोंड देण्याकरीता आपलं उत्पादन बनविणं या तीन तत्वांचा स्विकार केल्यास लाभदायक कंपनीची निश्चितपणे स्थापना होऊ शकते. कंपनीची स्थापना करतांना जर ती व्यावसायिकांची, व्यावसायीकांसाठी आणि व्यावसायिकांकडून चालवली जाणारी असेल याची काळजी घेतली तर त्या कंपनीचा भविष्यकाळ निश्चितच उज्वल असतो. कर्मचारी हे कंपनीच बळ असतं. त्यांचा आत्मसंन्मान जपनं त्यांच्याशी आदराची वागणूक ठेवणं हे कंपनीचे धोरण असणे आवश्यक आहे. कंपनीच्या संस्थापकांनी आपण मालक नसून कंपनीचेच एक कर्मचारी आहोत अशी भूमिका ठेवली तर यशाची शक्यता अधिक वाढते. ज्या कंपनीचे व्यवस्थापक आपल्या कर्मचाऱ्यांपेक्षा कोणत्याही वेगळ्या सोई सवलतींचा लाभ घेत नाहीत, पगार, भत्ते, शेअर्स या प्रत्येक बाबतीत स्वत:ला झुकतं माप देत नाहीत अशा कंपनीत मालक नौकर ही भावना मनात निर्माण न होता प्रत्येकालाच ती स्वत:ची कंपनी वाटत असते व प्रत्येक

Scanned by CamScanner

व्यक्ती स्वत:च्या पूर्णक्षमतेने येथे काम करते आणि यामुळेच त्यांना यश मिळत. दिवसभर न थकता काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास घरी गेल्यावर कोणत्याही विवंचना राहू नयेत. याकरीता त्याला जास्तीत जास्त सुख सुविधा देण्यावर कंपनीचा भर असतो. कर्मचारी मनातून समाधानी असला तरच तो उत्साही राहतो. व चांगल काम करतो फक्त भरघोस पगार देऊन नव्हे तर चांगली वागणूक, इतर सोयी मिळाल्या तरच संतोष प्राप्त होतो. कर्मचारी समाधानी असेल तर त्याची उत्पादकता वाढून उद्योग यशस्वी होतो.

जबाबदारी न टाळता सत्याला सामोरी जाणारी, भव्य स्वप्नांचा ध्यास घेणारी, कृतीतून आदर्श घालून देणारी माणसचं कंपन्या वाढवितात व देशाला श्रेष्ठ नेतृत्व देऊन राष्ट्र घडवितात. अचूक अंदाज, फायद्याचं वाढत प्रमाण, तग धरून राहण्याची क्षमता व जोखीमयुक्त उद्योग या चतु:सूत्रीवर निष्ठा असणे आवश्यक असते. संभाव्य धोके लक्षात घेऊन ते अगोदरच निकालात काढणे महत्वाचे आहे. झेपेल इतपतच जोखीम पत्करून उद्योग विस्तार करणं जमलं पाहिजे. विचारपूर्वक जोखीम पत्करावी म्हणजे फायदा होतोच जर एखादेवेळी नुकसान झालं तरी पूर्ण उद्योग बंद पडण्याची शक्यता नसते.

विकासातील फायदा भागधारक, ग्राहक, पुरवठादार कर्मचारी, सरकार व भारतीय समाज या सर्वांना व्हावा. त्यांनाही भरभराटीत सामील करून घ्यावं हे पथ्य कंपनीने पाळने आवश्यक आहे. व्यवस्थापणाचं कंपनीवर नियंत्रण असलं की, कंपनीत भांडवल पुरेसं व कमी खर्चात मिळतं भांडवलाचा पर्यायी उपयोग होतो व कंपनीतल्या नफ्यातला चांगला हिस्सा आपणास मिळतो. याची भागधारकांना आणि गुंतवणूकदार संस्थांना खात्री असते. कंपनी समोरील अडचणी, संकट लपवून न ठेवता त्याची माहिती संबंधितांना लागलीच दिल्या गेली तर अशा कंपनीबद्दल लोकांचा विश्वास वाढतो. ज्ञान, कल्पकता, कौशल्य, निरोगी स्पर्धा, प्रामाणिकपणा या गुणांची बूज जेथे राखली जाते तेथे निश्चितपणे विकास होत असतो. स्पर्धकांबद्दलही मनात निरोगी भावना असावी . असूया, व्देश यांना अजिबात थारा नसावा. कारण निरोगी भावनेतूनच स्पर्धेबद्दलची जागरूकता व तत्परता येत असते. कोणत्याही परिस्थितीत मुल्यांशी तडजोड करू नये कारण यामुळे अल्पकालीन लाभ होत असला तरी दिर्घकाळात कितीतरी पटीने त्याचे मुल्य चुकवावे लागते. मूल्य जाणीवही सर्वांना निष्ठा–रज्जूंनी परस्परांशी बांधून ठेवत असते. प्रत्येकाने जर सद्‌सद्विवेक बुध्दीचा विचार करून कृत्य केले तर यशाचा मार्ग समाधान देणारा असतो. असे म्हणतात सद्‌सद्विवेक बुध्दी सारखी उशी नाही. या उशीवर माथा टेकला की निश्चितपणे सुखाची झोप लागते.

तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि मानवी बुध्दीमत्ता या खांबावर कंपनीची इमारत उभी असण्याची गरज आहे. तंत्रज्ञानातले बदल पटकन आत्मसात करून त्याचे लाभ ग्राहकांना मिळवून द्यावे लागतात. नवनव्या गोष्टी शिकून त्या तत्परतेने ग्राहकांपर्यंत पोहचवाव्या लागतात त्यासाठी ज्याव्यक्तींमध्ये ज्ञानाची ग्रहणक्षमता आहे त्यांची निवड करणे महत्वाचे आहे. काम करतांना जबाबदारी न टाळता सत्याला सामोरी जाणारी, भव्य स्वप्नांचा ध्यास घेणारी, कृतीतून आदर्श घालून देणारी माणसंच कंपन्या वाढवितात व देशाला श्रेष्ठ नेतृत्व देऊन राष्ट्र घडवितात. अचूक अंदाज, फायद्याचं वाढतं प्रमाण, तग धरून राहण्याची क्षमता व जोखिमयुक्त उद्योग या चतु:सूत्रीवर निष्ठा असणे आवश्यक असते. संभाव्य धोके लक्षात घेऊन ते अगोदरच निकालात काढणे महत्वाचे आहे. झेपेल इतपतच जोखीम पत्करून उद्योग विस्तार करणं जमलं पाहिजे. विचारपूर्वक जोखीम पत्करावी. म्हणजे फायदा होतोच जर एखाद्यावेळी नुकसान

Scanned by CamScanner

झालं तरी पूर्ण उद्योग बंद पडव्याची शक्यता नसते. काम करतांना कर्मचाऱ्यांनी नेहमी आपल्यापेक्षा जास्त हुशार व्यक्तींच्या सहवासात रहावं त्यामुळे कार्यक्षमता वाढते आपल्यातल्या उणीवा दूर होतात, आत्मविश्वास दुणावतो, स्पर्धा वाढते, कामात जोम येतो. व्यवस्थापणाने हे लक्षात घेऊन तशी व्यवस्था ठेवण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. हुशार माणसं टिपायची. त्यांच्या बुद्धीस परिमाण द्यायच व त्यांना टिकवून धरायचं, ग्राहकांप्रमाणेच कर्मचाऱ्यांचं जतन-संवर्धन करायचं हे उद्योगाच्या भरभराटीचे एक सुत्र आहे. वेळेत चोख काम करण्यातून यशास्विता संपादन करता येते. कर्मचाऱ्यांमधील सृजनशीलता फुलविली जाते. नविण्य नसलं तर कोणताही उद्योग विशेषत ज्ञानाधारित उद्योग चालणार नाही. याकरीता कंपनीच्या प्रत्येक विभागात कामाचा वेग, तत्परता कल्पकता व उत्कृष्ठता जोपासली जात आहे काय हे पाहण्याची आवश्यकता असते. कालबाह्य तंत्रज्ञान, प्रक्रिया पद्धती मोडित निघतात. जेथे सृजनशीलतेचा सन्मान केला जातो. त्याला प्रोत्साहन देण्यात येत. नवनवीन घटकांचा, व्यवस्थापन व उत्पादनांचा, सोयींचा अवलंब केला जातो असे उद्योग प्रतिस्पर्धी उद्योगांना आश्यर्याचा धक्का देत पुढे जात असतात.

उद्योग व व्यवसायात एखादे काम मिळाले की, त्याच्या प्रणालीचा परिपूर्ण अभ्यासकरून सेवा प्रदान केल्यास ग्राहक वर्ग वाढत जातो. सातत्याने वाढते ग्राहक ही विकासाची खरी यशस्वीता असते. हे नीट समजून भारतीयांनी आता पुढे झेप घेण्याची गरज आहे. जागतिक व्यापार संघटनेमुळे भारतासारख्या स्वतंत्र राष्ट्राच्या कार्यक्षेत्रावर आणि अधिकारांवर अधिकाधिक आक्रमण होण्याची शक्यता आहे. जागतिकीकरणाचा स्विकार करायचाच तर तो पूर्ण विश्वासाने आणि दूर्दम्य उत्साहाने परिपूर्ण असलेला असणे आवश्यक आहे. या नवीन आर्थिक व्यवस्थेमुळे विकसित देशांचेच हितसंबंध जपल्या जातील तर ते योग्य नाही.

जागतिकीकरणाच्या वणव्यात हिरवे ही जळाले व वाळले ही जळाले विकसनशील राष्ट्रे व विकसीत राष्ट्रे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाशी रोज सामना करीत आहे. चिनचा विकास दर १३% वरुन ९% वर आला. अमेरिकन अर्थव्यवस्थेची वाताहात झाली. रोज कंपन्याचे दिवाळे निघत आहे. अब्जावधी डॉलर मागील काही वर्षात यू.एस.ए. द्वारा इराक सोबत लढाई करण्यात खर्च करण्यात आले. वित्तीय बाजार पत्त्याच्या बंगल्या प्रमाणे कोसळला. त्याचा परिणाम म्हणजे अमेरिकेच्या सकल घरेलू उत्पादनात ०.३% टक्के इतकी घट झाली. अमेरिकन भांडवली बाजारपेठ रोज घसरत आहे. स्वयंम चालीत बहारांचा व्यवसाय व स्टील उद्यौग, पूर्ण पणे जवळपास बंद झाल्यामध्ये जमा आहे. त्यामुळे लाखो कामगारांना घरी जावे लागले आहे.

भारताचा विचार केल्यास असे दिसते की, या देशातील अर्थव्यवस्थेचा मूलभूत आधार पक्का आहे. बाजारपेठांच्या विकासात भरपूर वाप आहे. वित्तीय नियत्रंण व्यवस्था अधिक मजबूत व पक्की असल्यामुळे भारतीय भांडवल बाजार कोसळला कारण अमेरीकेतील बदलांचा प्रभाव. विदेशी संस्थागत गुंतवणूक करणाऱ्यांनी आपला पैसा काढून घेतल्यामुळे जो जवळपास ११ बिलयिन डॉलर एवढा होता त्याचाच परिणाम भारतीय भांडवल बाजारपेठेवर झाला. सरकारला बाजार लिफ्ट करण्यासाठी प्रयत्न करावे लागले. १२ ते १५ ऑक्टोबर या दरम्यान सरकारला एक लाख हजार कोटी रूपये बाजार पेठेत आणावे लागले. मागच्या महिण्यात CRR मध्ये परिवर्तन करून तो ६.५० पर्यन्त खाली आणावा लागला. एस.एल.आर २४% ठेवण्यात आला आहे. तरी बाजारपेठातील वित्तीय संकट टळण्यासारखे नाही. जागतीक अर्थव्यवस्थेचा विकास दर या वर्षी कमी होईल अशी अपेक्षा वर्तविण्यात येत आहे.

भारताचा आर्थिक विकास दर ७ किंवा ७.५% राहण्याची शक्यता अनेक अर्थशास्त्रज्ञानी वर्तवीली आहे. IMF ने भारतीय अर्थव्यवस्था मजबू असली तरी येत्या दोन वर्षात तो दर ६.९% पेक्षा जास्त राहणार नाही असे

Scanned by CamScanner

त्यांनी त्यांच्या अभ्यासावरून स्पष्ट केले आहे. जागतीकीकरणाची व मुक्त अर्थव्यवस्थेची आज सर्वानाच समाधाने शोधावी लागत आहे. भारत हे राष्ट्र देखील त्यातून सुटणारे नाही.

जागतिकीकरणामुळे असे नवीन प्रश्न निर्माण झाले असून भारताला सतत जागरूक रहावे लागण्याची गरज आहे. विदेशी हिस्सेदार भारतीय कंपन्यामधील आपला हिस्सा सातत्याने वाढवित आहेत. ३० सप्टेंबर २००५ रोजी विदेशी हिस्सेदारांचा भारतीय कंपन्यामधील हिस्सा ३० टक्के होता याचा अर्थ विदेशी हिस्सेदारांनी भारतीय कंपन्यावर आताच एक तृतीयांश वर्चस्व स्थापित केले आहे आणि हे वर्चस्व सतत वाढत जाण्याची शक्यत आहे. जागतिकीकरणाचे अशा रीतीने फायद्यापेक्षा तोटेच अधिक होण्याची शक्यता दिसते मात्र ही संधी मानुन तशी पावले उचलली तर देशाचा निश्चितच आर्थिक विकास संभवतो. प्रत्येक देश आपल्या देशाचे हितसंबंध जोपासतो हे स्वाभाविक आहे यामुळे अमेरिका किंवा इतर विकसित देशांना दोष देऊन उपयोग नाही. भारतानेही आंतरराष्ट्रीय करार करतांना आपले हितसंबंध डोळ्यात तेल घालून जपले पाहिजे. अमेरिका आणि इतर विकसित राष्ट्रांवर डोळे झाकून विश्वास ठेवणे योग्य नाही. आपण जागरूक राहून आपली आर्थिक धोरणे आखली तरच स्वतंत्र राष्ट्र म्हणून भविष्यात आपण सन्मानाने जगु शकू.

**संदर्भसूची :**

१. दिलीप देवधर, अर्थकारण–वृत्तपत्रीय लेखमाला

२. Govt. of India Economic Survey २००७-०८

३. Indian Economy Mishra, Punj २००७-०८

४. India २००७

५. सुहास कुळकर्णी, लेखा–खरीखूरी टीम इंडिया समकालीन प्रकाशन

६. सार्वजनिक उद्योग व खाजगी उद्योग–प्रबोधन प्रकाशन माला १९९२ वर्ष तिसरे पुस्तक १२ वे

Scanned by CamScanner



# Roll and Contribution of Direct Taxes in Indian Economy

**Dr. H. A. Hudda**
V. N. Govt. Institute Of Arts and Social Science, Nagpur.

" The science of public finance studies the collection of revenue from the public and its spending for the welfare of the public". The world public finance is a combination of two words , Public and Finance. Public finance comes to be the science of incomes and expenditure of the government either central, state or local. It is thus concerned with the use and accomplishment of the essential monetory resource of the govt.

**Defination :** " Bostable - Public finance deals with expenditure and income of public authorities of the state and other mutual relation as also with the financial administration and central".

***(ii) R. A. Musgrave -*** "The complex of problems that centre around the revenue-expenditure process of Govt. is referred traditionally as public finance.

(iii) Public finance is one of these subjects which are on the borderline between economics and politics. It is concerned with the income and expenditure of public authorities and with the adjustment of the one with other" Dalton.

***Concept of Public Finance -*** (i) Classical Concept of Public Finance. It is stated on classical general economic theory . " Supply creates its own demand. Therefore their is not possibility of unemployment in the state. Hence their is no need of any state intervention in the socio - economic affairs of the country. If the state raises its expenditure by taxation it would be merely a substitution for expenditure by private persons. If state raises its expenditure through borrowing it would be competing with private individuals and this would raises prices and give way to inflation.

***(ii) Keyne's Approch-*** The keynesian concept of public finance has been called functional finance by A. P. Learner. Functional finance is the system of judging fiscal

Scanned by CamScanner

measure by the way they function in the economy . Functional finance reduces fiscal operations of taxation public expenditure and the public debt to operation of policy so as to reduce the volume of money and the aggregate demand in the country.

***(iii) Taxation and equitable distribution concept :*** Modern concept of public finance taxation is considered as an important mean of reducing economy inequalities of income and thereby promoting social justice. Modern economists favoured progressive and direct taxation as an instrument of collecting public revenues and to make equitable distribution of income in the country.

***(iv) Musgrave and public finance :*** Public finance deals with the economics of public sectors including not only its financial but its entire bearing on the level of and allocation of resources as well as on the distribution of income among consumers. And the importance of the public sectors lies in the fact that the market mechanism alone cannot perform all economic functions. Tereby public policy is needed to guide, correct and suppliment it in certain respects.

***(v) Public finance as a normative approch or normative science -*** New economists like R. A. Musgrave, J. M. Keynes, Pigou and Dalton widened the scope of public finance by including normative science as a part of public finance . The reason being that laissez-faire policy failed to bring automatic adjustment between the forces of demand and supply in the economy and hence state intervention considered necessary as part of policy to raise the level of effective demand in the economic system. According to prof. Musgrave the object of fiscal operation is to make proper allocation of resources the distribution of income, full employment and price level stability and growth.

All these above views on public finance cleared the idea that the revenue and expenditure is the prime object of the any Govt. to maintain the welfare of the state. So far revenue is concern the main source of revenue of govt., is like direct taxes, indirect taxes, interest receipts, and other transfer. But main source of revenue is direct and indirect taxes where direct taxes is subject matter of centre and indirect taxes come under the domain of state govt.

**Meaning of Direct Taxes -** A direct tax is that whose burden is borne by the person on whom it is levied. He cannot transfer the burden of the tax to some other person.

***i) J. S. Mill -*** " A Direct tax is one which is demanded from the person who intended or desired should pay."

***ii) Dalton -*** " A direct tax is really paid by the person on whom it is legally imposed."

***iii) Kaldor -*** "All taxes on income or the ownership of property would be direct taxes"

Scanned by CamScanner

Taxation is certainly in today's world. It is the most important instrument available to governments for taking away resources from the private sector. Salary income, which is also known as income from employment is generally the most important component of income of individuals in many countries. In general salary income includes wages, Salaries, Pensions, gratuity leave salary , perquisites, allowances and fringe benefits. Taxation of salary income is one source where trax compliance is generally maximum as the tax is deducted at the source itself in most countries. Still ways and means have been devised to reduce to reduce the amount of taxable salary. The rate of taxation as an instrument of redistributive policy and stability in economy. In the developing countries the rate of taxation as an instrument of resource mobilization in the initial stages of their development and its rate as an instrument of income redistribution has been given a subordinate importance.

**Rate of direct Tax** - Developmental rate of taxation constituted not only in maximizing the volume of resources for the public sector but also in maximizing the growth of private investment and guiding it into the most useful and desirable channels. Besides Taxes should penalize the diversion of savings into land, buildings, inventories and similar investment held for speculative gain or prestise purposes rather than productive uses. In order to achieve these ends such tax installments as land value, increment taxes on idle land, progressive taxes on either net worth or real estate holding and tax on capital gains should be imposed. It is necessary to tax capital gains in the developing countries because they provide an incentive for speculative investments which draw savings away from the developmental channels through the long term objective of tax reform in underdeveloped countries should aim at the development of an effective system of progressive income and wealth taxation as essential instruments in the fiscal armoury , their heavy dependence on outlay taxes as source of development finance is inescapable for various seasons in the initial stage of economic development.

**(A) Income tax and economic growth** - A progressive income tax has particular attraction as a fiscal instrument for developing countries like India. It incorporates an element of built in flexibility in the structure and as such, it is a suitable weapon for mobilizing the expanding output resulting from the process of economic development for capital formation in the public sector.

**(B) Taxation of corporate profits** - In advanced countries as a considerable proportion of economic activity is organized in the form of corporate bodies. Company profits constitute a major source of revenue. The importance of this sector in the developing countries is rather small though it is growing. But that tax potential

Scanned by CamScanner

from corporate usually exceeds that from individuals tax. In India the yield from company taxation exceeds the yield of the personal income tax.

**C) Property taxation** - Property taxation has enormous potentialities of resource mobilization in developing countries the process of economic development tends to be accompanied by a boom in real estate and investment in housing in the urban area. Investment in real estate also serves as a hedge against inflation and in those developing countries where economic development is associated with continuing inflationary pressure a sizable volume of resources tends to flow into real estate investment and luxury housing. Rapid economic growth with its concomitant expansion of urban areas brings about large increase in land value which reflect economic rent.

**(D) Expenditure Tax** - Expenditure tax is a tax which is a levied on the basis of one's expenditure rather than income. It is a direct tax to be levied on individuals with reference to the amount of consumption expenditure. The object of expenditure tax is to reduce the expenditure of individuals. Earlier economists like J. S. Mill, Marchall, Pigou and fisher argened in the favour of expenditure tax as it is a good direct tax. It is more favourable to work, saving and risk and will lead to a much greater rate of economic progress. The burden of the expenditure tax mostly falls on the rich persons on account of their heavy expendituture.

**(E) Wealth Tax** - It is an annual tax on net wealth of individuals and hindu undevided families the wealth tax should be payable on only unproductive forms of wealth. Assets subject to wealth tax include residential houses, motor cars, bullion, jewellary excepts when such assets used in business activities. The nature of wealth tax is progressive also tax is payable where the net wealth does not exceed Rs. 15 Lakh.

**(F) Gift tax** - The tax was necessary to check the evasion of expenditure tax, wealth tax and the estate duty. The liability to estate duty and the wealth tax could be reduce or avoided by making gifts. The gifts tax has not been successful as an instrument to curb **Tax Evasion** and Avoidance. Since october 1998 the gift tax was dissolved, however any amounts received by a person without adequate consideration shall be charged to tax as the income from other sources.

**(G) Capital Gains Tax** - By capital gain mean a financial gain resulting from the sale of a capital assets at a higher price than paid for it in the post. Means a capital gains is the differences between the selling price and the price which paid earlier at the time of purchase or acquizing certain type of property . Thus a capital Gains tax is imposed on the net gains realised on the sale of the property at higher price

Scanned by CamScanner

comparatively paid earlier. The capital gain tax is applicable to all gains out of the sale, exchange or transfer of a capital assets. Capital gains are more equitable , and help to control the inflation.

**(H) Securities transaction tax -** The rate for the securities transaction tax (STT) normaly fixed when prices of securities fluctuated. Reflecting the increase in implicit capital gains in securities transaction and it is increased by 25 percent.

**(I) Fringe benefit Tax -** It is a tax that the employee pays on perquisite or benefits that his employees drive as a result of employment. The taxation of fringe benefits has been justified by the Govt. both on grounds of equity and economic efficiency. FBT has been vehemently opposed by the corporate sector, trade associations as well as by substantial sections of academia. The tax is payable by a certain class of employers on the value of fringe benefits provided or deemed to have been provided by them to their employees. The deeming provisions are a presumptive method of valuation of fringe benefits where is the tax is applied to certain heads. Three years have passed since the introduction of the FBT in India. The analysis of the collection pattern has given some increasing and important insights. There is much variability in the collection from different sectors of the economy and from different heads of the FBT. The base of the FBT are significant, contributing as much as 90 percent of collection.

**(J) Banking cash transaction Tax -** The banking cash transaction tax introduced in 2005-06. The BCTT has turned out to be a soon not for the modest revenues it brought, which was never its purpose, but for the remarkable trails that it has helped establish. BCTT has also helped the department to detect bogus bills, accommodation entries, artificial loss claims and dummy firms.

**Rate of direct taxes in Developing countries -** Direct taxes play an insignificant rate in developing countries. Mainly because of the less developed money economy, illiteracy among taxpayers difficulty in maintaining records, political instability and inefficient tax administration. Further direct taxes are of minor importance in less developed countries because of low tax morality in the developing countries. Still direct taxes can play important role in developing countries.

1) The burden of direct taxes is low in developing countries.

2) Some sources have not been touched by direct taxation.

3) There is wide gap between saving and investment

4) Tax exemptions and concession can affects of direct taxes on capital formation.

Scanned by CamScanner

5) Direct taxes can reduce the gap between the rich and poor.

6) Direct taxes reduce the disposable income of the people. This will check the high marginal propensity to import of the rich and restrict consumer consumption.

(7) Direct taxes will take away the surplus income from the hands of the people and surplus can be used for rapid economic development .

(8) Direct tax is a powerful check inflation and mobilizing the excessive purchasing power which control the inflation.

(9) Direct taxes provide built in flexibility to the tax structure. As income increase tax revenue will increase.

(10) Direct taxes also satisfy the canons of equity, certainty economy, productivity, flexibility and elasticity.

**Conclusion :** In India the people are not paying the tax honestly and sincerely. The tax evasion attitudes are more among the people. The effect that the revenue remain continuously slim and thin. If we see the income tax structure only one percent peoples are paying the tax which is the lowest in comparison to other taxes.

The Industrialist, Business Tyeoonist stardom, exporter, big corporate houses are not regular to pay the tax to the Govt. It comes to the notice that 10 paisa are getting through the tax on income, while it is more than 40 paisa in other developed countries. The fact is that the Indian peoples have a great apprehension about the tax structure . They never willingly to come forward and file their structure, so the people who have the ability to pay the tax remain out of the stream and every year huge black money is increased which paralyzed and ruin the economy and find a remedy which cover more and more people every year in tax bracket ; to generate and increased the revenue of the nation.

**Notes**

1) Public finance - R. Cauvery

2) Public finance in underdeveloped countries - R. N. Tripathy.

3) Banking and financial system - Dr. Nirmalprasad

4) राजस्व – सु. रा. ओझरकर

**Reference**

(1) Economic & political weekly August 16-22

(2) Economic & Political weekly August 9-15

Scanned by CamScanner

## Table No. 1
### Contribution of direct taxes in Indian economy
(Rs. in crores)

| Year | Income Tax | Corporate Tax | Wealth Tax | Gift Tax | Int. Tax | Fringe Benefit Tax (FBT) | Security Transaction Tax (STT) | Bank Transaction Tax (BTT) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1950-51 | 134 | 40 | - | - | - | - | - | - |
| 1960-61 | N.A. | N.A. | 8.16 | 0.89 | - | - | - | - |
| 1970-71 | 473 | - | 15.00 | 3.00 | - | - | - | - |
| 1980-81 | 151 | N.A. | - | - | - | - | - | - |
| 1990-91 | 5371 | 5,335 | 175.00 | 9.00 | 801 | - | - | - |
| 1995-96 | 15592 | 16,250 | 71.84 | 11.28 | 1170 | - | - | - |
| 1996-97 | 18,567 | N.A. | 76.00 | 10.00 | 1717 | - | - | - |
| 1997-98 | 20,216 | 18,590 | 113.00 | 9.00 | 1206 | - | - | - |
| 1998-99 | 20,240 | - | 162.00 | 9.00 | 620 | - | - | - |
| 1999-2000 | 26,684 | 35,696 | 133.00 | 0.05 | 1000 | - | - | - |
| 2000-01 | 31,764 | 35,696 | 132.00 | 1.00 | - | - | - | - |
| 2001-02 | 34,436 | 36,609 | 135.00 | 1.01 | - | - | - | - |
| 2002-03 | 42,524 | 44,700 | 145.00 | - | - | - | - | - |
| 2003-04 | - | 51,499 | 145.00 | 1.00 | - | - | - | - |
| 2004-05 | 49,259 | 82,680 | 145.00 | - | - | - | - | - |
| 2005-06 | 66,239 | 1,03,573 | - | - | - | 47723 | 25590 | 3210 |
| 2006-07 | 77,409 | 1,33,010 | - | - | - | 53230 | 46480 | 5020 |
| 2007-08 | 1,03,924 | 1,86,262 | - | - | - | 67430 | 65770 | 5730 |

## Table No. - 2
### Gross Tax Revenue Profit
(Rs. in Rupees)

| Sr. No. | Analysis | 1990-91 | 1995-96 | 2000-01 | 2004-05 | 2005-06 | 2006-07 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | **Direct Taxes** | | | | | | |
| | (A) Income | 5371 | 15,592 | 31764 | 49259 | 66239 | 77409 |
| | (B) Corporate | 5335 | 16487 | 35696 | 82680 | 103573 | 133010 |
| 2) | **Indirect** | | | | | | |
| | (A) Excise | 24,514 | 40187 | 68526 | 99125 | 112000 | 119000 |
| | (B) Custom | 20644 | 35757 | 47542 | 57611 | 64215 | 77066 |
| | (C) Services | 0 | 862 | 2613 | 14200 | 23000 | 34500 |
| | Tax GDP | 10.12 | 9.36 | 8.95 | 9.77 | 10.38 | 11.30 |

Scanned by CamScanner

# विदर्भातील विज निर्मितीची समस्या, कारणे व उपाय

सविता नारायणराव काळबांडे
सम्राट अशोक ज्यू. कॉलेज, चिचपल्ली

आजच्या युगात मानवाच्या मूलभूत गरजा जसे, अन्न, वस्त्र आणि निवारा या आहेत. त्याचप्रमाणे वीज ही सुद्धा एक मूलभूत गरज बनत चालली आहे. आजच्या युगात प्रत्येक काम विजेवर अवलंबून असते. जसजसे यांत्रिकीकरण होत आहे. तसतसे विजेचा वापर करण्याची क्षमता वाढत आहे.

आजच्या काळात प्रत्येक व्यक्तीचे जीवन विजेवर चालत आहे. वीज नसेल तर जीवन एखाद्या चौकटीत जमा असल्यासारखे आहे. सकाळी झोपेतून उठल्यापासून ते रात्री झोपे पर्यंत अनेक कामे विजेवर होत असतात. उदा.– गिझर, पंखा, दिवे, मिक्सर, फ्रिज, वॉशिंग मशिन, टि.व्ही., संगणक इत्यादी अनेक गोष्टीसाठी विजेची गरज भासते. तसेच रात्री झोपल्यानंतर सुद्धा पंखा किंवा ए.सी. साठी वीज लागते.

कोणत्याही देशांचा विकास विजेशिवाय शक्य नाही. म्हणून ज्या देशामध्ये मुबलक वीज निर्मिती होते. तोच देश विकसित व समृद्ध देश आहे आणि भविष्यातही राहणार आहे. भारताने सुद्धा काळाची गरज ओळखून अमेरिके सोबत १२३ अणूकरार नुकताच केला आहे. त्यासाठी पंतप्रधान यांना देशपातळीवर व आंतरराष्टीय पातळीवर तारेवरची कसरत करावी लागत आहे. कारण अणू ऊर्जेशिवाय आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राच्या विकासाशिवाय भारताला पर्याय नाही.

वरिल सर्व कारणांमुळे विजेचा वापर जास्त होत असल्याने त्याची निर्मिती ही त्याच प्रमाणात करणे गरजेचे होत चालले आहे. भारत देश सुद्धा निरनिराळे प्रकल्प उभारून ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे भारतात अनेक ठिकाणी विद्युत केंद्रे स्थापना केली जात आहे.

भारतात विद्युत मंडळाची निर्मिती भारतीय विद्युत पुरवठा कायदा १९४८ च्या कलम ५ अन्वये १९५४ साली झाली. महाराष्ट्रात जून १९६० साली झाली. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अस्तित्वात आले. गेली ४५ वर्षे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ विज निर्मिती विजवहन व विजवितरण ही कामे यशस्विरित्या करित होते.

विदर्भात वीज निर्मितीकरिता प्रामुख्याने मुबलक जमीन,कोळसा आणि पाणी इत्यादी प्रकारच्या मुख्य

Scanned by CamScanner

घटकांची आवश्यकता तीव्रतेने भासत असते. विदर्भामध्ये उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत मुबलक वीज निर्मिती होते. कारण कोळसा या विदर्भात विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. कोळशाचे मुबलक साठे पूर्व विदर्भमध्येच आहेत. तसेच विदर्भामध्ये पावसाचे प्रमाण सुद्धा समाधानकारक असल्याने विजेसाठी लागणारे पाणी व नद्या यांचे प्रमाण सुद्धा समाधानकारक आहे. जमीन सुद्धा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. वीज निर्मितीकरिता लागणारे पायाभूत आवश्यक घटक विदर्भात उपलब्ध असल्यामुळे महाराष्ट्राला लागणारी जास्तीत जास्त वीज विदर्भामध्येच निर्मित होते.

महाराष्ट्र राज्यात एकूण वीज निर्मिती जवळपास ९५९६.७५ मेगावॅट इतकी होते. महाराष्ट्र राज्याची एकूण विजेची मागणी १४००० मेगावॅट आहे. तर विदर्भात एकूण विज निर्मिती जवळपास ४५६८ मेगावॅट होते आणि विदर्भातील एकूण विजेची मागणी २३१५ मेगावॅट आहे. म्हणजेच एकूण वीज निर्मितीपैकी ५०% विज विदर्भात निर्माण होते. महाराष्ट्र राज्यातील विजेची मागणी जास्त असून पुरवठा मात्र त्या मानाने कमी आहे. म्हणजेच आणखी आजही ४००० मेगावॅट विजेची कमतरता आहे.

६ जूलै २००५ पूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अंतर्गत निर्मिती पारेषण व वितरण विभाग काम करित होता. त्यामुळे प्रत्येक विभागाची कार्यक्षमता व गुणवत्ता तपासण्यामध्ये अडचणी येत असत व त्याचा फायदा घेऊन वीज चोरीचे प्रमाण वाढले. पारेषण लाईनमध्ये नुकसान होण्याचे प्रमाण खूप वाढून मंडळाचा फायदा कमी होत गेला. १० वर्षापूर्वी देशामध्ये एक नंबर चे विद्युत मंडळ असतांना गेल्या काही वर्षामध्ये नुकसानीत चालले होते. त्याकरिता राज्यकर्त्यांची नियोजन शून्यता फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत होती. कारण विजेची गरज मोठ्या प्रमाणावर वाढत असताना विज निर्मिती केंद्रामध्ये वाढ होत नव्हती.

६ जून २००५ रोजी महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करून तीन मर्यादित कंपन्या निर्माण केल्या.

१) महानिर्मिती (जनरेशन)

२) महापारेषण (ट्रान्समिशन)

३) महावितरण (डिस्ट्रीब्युशन)

महानिर्मिती या कंपनीकडे फक्त वीज निर्माण करण्याचे कार्य सोपविण्यात आले. महापारेषण या कंपनीकडे विज निर्मिती केंद्राने निर्माण केलेली विज विजवितरण कंपनीला पोहचविण्याचे कार्य सोपविण्यात आले. महावितरण या कंपनीकडे वीज वाटप करण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे. तसेच या सर्व तिनही कंपनीच्या कारभारावर लक्ष ठेवणारी महाहोल्डिंग कंपनी निर्माण करण्यात आली.

प्रत्येक कंपनीचा कारभार स्वतंत्र झाल्यामुळे महाजनको मध्ये विशेष फरक पडला नाही. कारण अगोदरचा निर्मिती विभाग कार्यक्षमच होता. परंतु महाडिस्को व महाट्रानस्कोच्या कार्यक्षमतेमध्ये सुधारणा झाली. वीज चोरीचे प्रमाण कमी करण्यामध्ये बऱ्याच अंशी महाडिस्को यशस्वी झाला. परंतु विजेच्या मागणीच्या प्रमाणात विज निर्मिती कमी पडत असल्याने भार नियमाचे प्रमाण वाढणे साहजिकच आहे.

—

Scanned by CamScanner

वरिल सर्व कंपन्यामध्ये काम करणारा कार्यक्षम अभियंता वर्ग असतानाही महाराष्ट्र सरकार व विविध कंपन्याच्या व्यवस्थापनामधील त्रुटी व नियोजन शून्यता महाराष्ट्रातील जनतेच्या व कर्मचाऱ्याच्या त्रासास जबाबदार आहेत. अशी खंत व्यक्त करावीशी वाटते.

महाराष्ट्रात वायू, जल आणि औष्णिक इत्यादी प्रकाराद्वारे विज निर्माण केली जाते. वायू विद्युत केंद्र उरण या ठिकाणी आहे. उरण या ठिकाणाहून वायू विजनिर्मितीद्वारे ८५२ मेगावॅट वीज निर्माण केली जाते. जल विद्युत केंद्रे कोयना, वैतरणा, भीरा टेलरेस, तील्लारी, राधानगरी, पैठण, भंडारदरा आणि भातसा इत्यादी ठिकाणी आहेत. यापैकी कोयना इथे जल वीज निर्मिती द्वारे १९६० मेगावॅट विज निर्माण केली जाते. आणि इतर छोटी जल विद्युत केंद्राद्वारे ३८८.७५ मेगावॅट वीज निर्माण होते. एकूणच जल वीज निर्मितीद्वारे २३४८.७५ मेगावॅट इतकी विज निर्मित केली जाते.

महाराष्ट्र राज्यात औष्णिक विद्युत केंद्रे कोराडी, भुसावळ, परळी–वैजनाथ, चंद्रपूर, पारस, खापरखेडा आणि नाशिक अशी ७ विद्युत केंद्रे आहेत. या सर्व ठिकाणांहून औष्णिक विद्युत केंद्राद्वारे ६३९६ मेगावॅट विज निर्मित केली जाते. एकूणच महाराष्ट्रात विविध प्रकल्पांद्वारे ९५९६.७५ मेगावॅट विज निर्मित केली जाते.

सध्या विदर्भात पारस, कोराडी, चंद्रपूर आणि खापरखेडा हे चार विद्युत प्रकल्प आहे. हे चारही प्रकल्प औष्णिक विद्युत केंद्रे असून हे चारही विद्युत केंद्रे कोळसा या विज प्रकारात मोडतात.

पारस या औष्णिक विद्युत केंद्राची निर्मिती २५ मे १९६७ साली झाली. या विद्युत केंद्राची वीज निर्मितीची क्षमता ३०८ मेगावॅट इतकी आहे.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्राची निर्मिती ३ जून १९७४ साली झाली. या विद्युत केंद्राची विज निर्मितीची क्षमता १०८० मेगावॅट आहे.

चंद्रपूर या औष्णिक विद्युत केंद्राची स्थापना १५ ऑगस्ट १९८३ साली झाली. या विद्युत केंद्राची वीज निर्मितीची क्षमता २३४० मेगावॅट आहे.

खापरखेडा या औष्णिक विद्युत केंद्राची स्थापना २६ मार्च १९८९ साली झाली. या विद्युत केंद्राची वीज निर्मितीची क्षमता ८४० मेगावॅट आहे.

या चारही औष्णिक विद्युत केंद्राचे महानिर्मितीची स्थापित क्षमता दिनांक ३१/०३/२००६ रोजीची विद्युत केंद्रे (क्षमता मेगावॅट मध्ये) पुढील प्रमाणे आहेत.

Scanned by CamScanner

| विद्युत केंद्राचे नाव | क्षमता संच मेगावॅट | घटित क्षमता(मेगावॅट) | एकूण (मेगावॅट) |
|---|---|---|---|
| पारस<br>संच -२ | 1 X 58<br>1 X 250 | 58<br>250 | 308 |
| खापरखेडा<br>संच-१ ते ४ | 4 X 210 | 840 | 840 |
| कोराडी<br>संच-१ ते ४<br>संच- ५<br>संच-६ ते ७ | 4 X 120<br>1 X 200<br>2 X 210 | 460<br>200<br>420 | 1080 |
| चंद्रपूर<br>संच-१ ते ४<br>संच-५ ते ७ | 4 X 210<br>3 X 500 | 840<br>1500 | 2340 |
| एकूण | | | 4568 |

या चारही प्रकल्पांची विज निर्मितीची क्षमता एकूण ४५६८ मेगावॅट आहे.

राष्ट्राच्या विकासासाठी उद्योगधंदे महत्वाचे घटक आहेत व उद्योगाच्या सुयोग्य संचालनासाठी विजेची आवश्यकता असते. देशाची वाढती विज गरज लक्षात घेऊन कमी खर्चामध्ये उद्योग व सामान्य जनतेसाठी अविरत वीज निर्मिती करण्यात येते. विदर्भात एकूण विजेची निर्मिती ४५६८ मेगावॅट आहे. त्यासाठी होणारी विजेची मागणी विदर्भात २३१५ मेगावॅट आहे. त्यासाठी होणारी विजेची मागणी विदर्भात २३१५ मेगावॅट आहे. म्हणजेच विदर्भात आवश्यकतेपेक्षा अधिक उत्पादन केले जाते. परंतु विदर्भातील वीज इतर भागात पाठविली जात असल्यामुळे विदर्भातच भार नियमाचे प्रमाणे वाढले आहे. कारण इतर भागात उद्योग क्षेत्रांचे प्रमाण जास्त असल्याने त्या भागात विजेची गरज असल्यामुळे तेथील विजेचा पुरवठा विदर्भाच्या विजेच्या पुरवठ्यातून पूर्ण केला जातो.

वेगवेगळ्या क्षेत्राकरिता विजेची मागणी वेगवेगळी केली जाते. जसे, विदर्भात नागपूर Urban या विभागाची एकूण विजेची मागणी ६१५ मॅगावॅट आहे. नागपूर Rural या विभागाची एकूण विजेची मागणी ९३२ मेगावॅट आहे. तर अकोला या जिल्ह्याची विजेची एकूण मागणी ७६८ मेगावॅट आहे. चंद्रपूर या जिल्ह्याची विजेची एकूण मागणी ३०४ मेगावॅट आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील घरगुती कामाकरिता विजेची मागणी ७३ मेगावॅट आहे. कृषीकरिता मागणी ३७ मेगावॅट आहे. सेवा क्षेत्राकरिता विजेची मागणी ३.२७ मेगावॅट आहे. तर उद्योगाकरिता असणारी विजेची मागणी १७६ मेगावॅट

Scanned by CamScanner

आहे.

सध्या विदर्भात कोराडी, खापरखेडा, पारस आणि चंद्रपूर हे चार औष्णिक विद्युत केंद्रे आहेत. या चारही प्रकल्पांची वीज निर्मितीची क्षमता ४५६८ मेगावॅट आहे. आता महाजनकोने चारही प्रकल्पांचा विस्तार करण्याचे ठरविले असून या प्रकल्पांमधून आणखी ३४०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याची योजना आहे.

महानिर्मितीने विज टंचाईवर मात करण्यासाठी काही गतिमान योजना आखल्या आहेत. विशेषत: जुन्या विजनिर्मिती संचाचे नुतनीकरण व आधुनिकीकरण, जुने संच मोडीत काढून त्या ठिकाणी अधिक क्षमतेचे संच उभारणे व अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवे प्रकल्प उभारणे या अशा तिनही स्तरांवर आता वेगाने कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्राच्या विजनिर्मिती क्षेत्रात अद्ययावत 'सुपर–क्रिटिकल' तंत्रज्ञानाचा यायोगे प्रथमच वापर होणार आहे या सर्व विस्तारीकरणाच्या पार्श्वभूमीवर महानिर्मितीच्या परिवारात नव्याने दाखल होणाऱ्या विजनिर्मिती संचाची देखभाल व सुरक्षितता प्राधान्याने जोपासली गेली पाहिजे. जेणेकरून या संचाचे निर्धारित आयुष्यमान राखले जाईल.

येत्या दोन तीन वर्षात कार्यान्वित होणारी औष्णिक विज केंद्रे व त्यांची क्षमता किती आहे. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

पारस या औष्णिक विद्युत केंद्रात आणखी एक संच उभारण्यात येणार असून त्याची क्षमता २५० मेगावॅट आहे. हा संच एप्रिल–२००९ पर्यंत पूर्ण होणार आहे.

खापरखेडा या विद्युत केंद्राचे आणखी एक संच तयार होणार असून त्याची क्षमता ५०० मेगावॅट आहे. हा संच नोव्हेंबर–२००९ पर्यंत पूर्ण होणार आहे.

कोराडी या विद्युत केंद्राचे सुद्धा दोन संच तयार होणार असून त्याची क्षमता प्रत्येकी ५०० मेगावॅट म्हणजेच एकूण १००० मेगावॅट आहे. यातील पहिला संच एप्रिल–२०१० मध्ये तर दुसरा संच मार्च–२०११ मध्ये पूर्ण होणार आहे.

येत्या दोन–तीन वर्षात कार्यान्वित होणारी औष्णिक विज केंद्रे व क्षमता पुढीलप्रमाणे आहे.

| प्रकल्पाचे नाव | क्षमता (मेगावॅट) | चाचणी क्रियान्वयन |
|---|---|---|
| पारस संच–१ | 250 MW | एप्रिल–२००९ |
| खापरखेडा संच–१ | 500 MW | नोव्हेंबर–२००९ |
| कोराडी संच–१ | 500 MW | मार्च–२०१० |
| संच–२ | 500 MW | जूलै–२०१० |
| चंद्रपूर संच–१ | 500 MW | एप्रिल–२०१० |
| संच–२ | 500 MW | मार्च–२०११ |

या वरिल सर्व वीज प्रकल्पांमुळे तरुणांना मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या रोजगाराच्या संधी

Scanned by CamScanner

उपलब्ध होणार आहेत.

एकूणच या वरिल प्रकल्पांच्या विस्तारीकरणासाठी १२४ दशलक्ष घनमीटर पाणी लागणार असून त्यामुळे १८,५२५ हेक्टर जमिनीवरिल सिंचन क्षेत्र बाधित होणार आहे. महाजनकोच्या या प्रकल्पांसोबतच केंद्र सरकार मौदा, भद्रावती, कामठी व चंद्रपूर या विशेष आर्थिक क्षेत्रात एन.टी.पी.सी. च्या सहकार्याने २००० मेगावॅट विज निर्मिती करणारे चार प्रकल्प उभारणार आहे. यासाठी ७५.८१ दशलक्ष घनमीटर पाणी लागणार असून त्याचा फटका ११,३७१ हेक्टर सिंचन क्षेत्राला बसणार आहे.

राज्य व केंद्र सरकारच्या या प्रकल्पांशिवाय खाजगी उद्योग समूहांकडून औष्णिक विज प्रकल्प उभारण्याच्या विषयात एकूण १७ प्रस्ताव राज्य व केंद्र सरकारला प्राप्त झाले आहे. यापैकी अनेक प्रकल्पांसाठी पाण्याचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. या प्रकल्पांना कुठलाही विरोध न झाल्यास आगामी काळात विस्तारीकरण होत असलेल्या महाजनकोच्या या प्रकल्पांसह एकूण २६ औष्णिक विद्युत प्रकल्प उभे राहणार आहेत. यासाठी हजारो हेक्टर जमिन विविध उद्योग समूहांना देण्यात येणार आहे.

या औष्णिक विद्युत प्रकल्पांमधून २१,६७५ मेगावॅट विज निर्मिती होईल. अशी योजना आहे. या सर्व प्रकल्पांसाठी एकूण ९९२.९०२ दशलक्ष घनमीटर पाणी लागणार असून त्यामुळे एकूण ३४,२९७ हेक्टर सिंचन क्षेत्र पाण्यापासून वंचित राहणार आहे.

विदर्भात मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेली जमिन, येथील धरणांमध्ये शिल्लक राहणारा पाण्याचा साठा व कोळशाची उपलब्धतता हे सर्व घटक लक्षात घेऊन बहुतांश खाजगी उद्योग समूहांनी विदर्भात औष्णिक विद्युत प्रकल्प उभारण्यास प्राथमिकता दिली आहे. मात्र या प्रकल्पांमुळे अनेक प्रश्न निर्माण होणार आहेत. या प्रकल्पामुळे विदर्भातील सिंचनाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात वाढण्यासोबतच विदर्भातील शेती व पाणी विद्युत प्रकल्पांच्या राखेमुळे दुषित होण्याचा मोठा धोका आहे. विदर्भातील लोकप्रतिनिधी व जनता वेळीच जागी न झाल्यास विदर्भाचे संपूर्ण जनजीवन या प्रकल्पामुळे उद्ध्वस्त होण्याची दाट शक्यता आहे.

जसजसे आधुनिकीकरण होत आहे. तसतसे विजेची मागणी वाढत आहे आणि पुरवठा मात्र त्यामानाने कमी होत आहे. विदर्भातील वीज केवळ विदर्भामध्येच पुरविल्या जात नाही. तर ती महाराष्ट्र राज्याच्या इतर ठिकाणीही पाठविली जाते. त्यामुळे विदर्भात विजेचा पुरवठा जास्त असुनही इतर ठिकाणाची विजेची मागणी जास्त असल्यामुळे तो पुरवठा कमी पडत आहे.

भारनियमन यालाच Load Shadding म्हणतात. जेव्हा पुरवठ्यापेक्षा विजेची मागणी जास्त असते. तेव्हा विज पुरवठा सुरळीत चालू ठेवण्यासाठी भारनियमन करणे आवश्यक असते. नाहीतर सर्वच भागातील विज पुरवठा खंडित होण्याची शक्यता असते. विदर्भात भारनियमन करण्याची काहीही आवश्यकता नाही. परंतु विदर्भातील वीज इतर ठिकाणी देत असल्यामुळे विदर्भातच त्याची कमतरता जाणवत आहे. मुंबई, पुणे या भागात भार नियमन अजिबात नाही. कारण महाराष्ट्र राज्यापेक्षा विदर्भात उद्योग क्षेत्र कमी आहे. इतर भागात उद्योग क्षेत्रांचे प्रमाण जास्त असल्यामुळे

Scanned by CamScanner

त्यांना विजेची गरज जास्त असते. म्हणून विजेची ही गरज पूर्ण करण्यासाठी विदर्भातून विजेचा पुरवठा केला जातो. तसेच त्यांच्याकडे विजेचे कमी उत्पादन होत असल्यामुळे विजेची मागणी दिवसेंदिवस वाढत असून त्या मानाने पुरवठा कमी होत आहे.

विजेचा पुरवठा कमी आणि विजेची मागणी जास्त अशी स्थिती निर्माण झाली आहे. म्हणूनच विजेची होणारी मागणी पूर्ण करण्यासाठी विजेचा पुरवठा त्याप्रमाणात करणे आवश्यक आहे.

विदर्भात विजेसाठी लागणारे पायाभूत घटक मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु तरिही पाहिजे त्या प्रमाणात पुरवठा होत नाही आहे. यासाठी अनेक कारणे जबाबदार आहेत.

विजेचा पुरवठा कमी होण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे एकदम वाढलेली विजेची मागणी. तसेच विज जास्त निर्माण करण्यासाठी नवीन प्रकल्प उभारले जात आहे. परंतु त्या प्रकल्पांना पूर्ण होण्यास वेळ लागत असल्यामुळे पुरवठ्याचे प्रमाण वाढत नाही. पूर्व विदर्भ खनिज संपत्ती, जंगल संपत्ती व काळी कसदार जमीन यासाठी प्रसिद्ध आहे. परंतु ही समृद्धी विज निर्मितीमध्ये अडसर बनते. कारण कोळसा खाणी खोदण्यासाठी जंगल कापावे लागते. त्यासाठी भारत सरकार व वन्य खात्याची परवानगी मिळत नाही. विदर्भातील शेत जमिनी समृद्ध असल्याने शेतकरी पॉवर स्टेशनसाठी लागणारी जमीन देण्यासाठी उत्सुक नसतो. तसेच पॉवर स्टेशनसाठी मुबलक प्रमाणावर पाणी लागते. त्यासाठी शेतकऱ्यांचा रोष पत्करावा लागतो.

वीज निर्माण करतांना प्रदुषण प्रचंड प्रमाणात वाढत जाऊन डोकेदुखी लायक वातावरण तयार होते. कारण विदर्भातील वीज निर्मिती कोळशावर होत असल्याने राखेच्या विल्हेवाटीची समस्या फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. राखेच्या विल्हेवाटीसाठी हजारो एकर जमीन व धरणे बांधावे लागते. तसेच चिमणीमधून बाहेर पडणारी सूक्ष्म राख व उपायकारक वायू प्रचंड प्रमाणावर वातावरण प्रदुषित करतात. तसेच राखेमुळे पिकांचे नुकसान सुद्धा काही प्रमाणावर होते. वायू प्रदुषणामुळे श्वसन संबंधीच्या आजारामध्ये प्रचंड वृद्धी झालेली आहे. जंगल कापावे लागत असल्याने वन्य प्राण्याच्या पुर्नवसनाची समस्या बिकट होत चालली व जंगली प्राणी मानवी परिसरा मध्ये प्रवेश करित आहे. मानव व जंगली प्राणी यांच्यामधील संघर्ष वाढत आहे. जंगल कापल्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होते वायू प्रदुषण वाढणे, भूमी प्रदुषण वाढणे, पाणी प्रदुषण वाढणे यामुळे ग्लोबल वार्मिंगला प्रोत्साहन मिळते. यासारखे असंघटित परिणाम विदर्भावर होत आहेत. या सगळ्यांचा परिणाम व्यक्तिवर होत आहे. त्यामुळे अशा वातावरणामुळे डोकेदुखी लायक वातावरण निर्माण होत असल्यामुळे त्याचा परिणाम विजेच्या पुरवठ्यावर होत आहे.

औष्णिक विज निर्मितीमधील मुख्य अडथळा म्हणजे कोळशाचा अपुरा पुरवठा, कोळशामध्ये प्रचंड प्रमाणात मोठ्या प्रमाणावर होणारा भ्रष्टाचार, टाकाऊ प्रतिचा कोळसा, कमी उष्मांकाचा कोळसा, परिणामकारक व्यवस्थापनाचा अभाव इत्यादी मुळे ज्या उपकरणांचा वापर होतो. त्या विविध उपकरणांमध्ये बिघाड होतात आणि उपकरणांचे जीवनमान लवकर कमी होते.

विज निर्मिती झाल्यानंतर त्याचे वितरण करतांना अनेक प्रकारचे तोटे निर्माण होतात. यामुळे प्रत्येक क्षेत्राला

Scanned by CamScanner

मुबलक प्रमाणात वीज मिळत नाही. वीज चोरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने विदर्भातील विजेची मागणी पूर्ण होत नसल्याचे दिसून येते. लोक विजेचा गरजेपेक्षा जास्त वापर करतात. यामुळे विजेची उधळपट्टी होत असल्याचे दिसून येते. बऱ्याच प्रमाणात विजेचा नको त्या ठिकाणी वापर होत असल्याने विजेची मागणी वाढत आहे.

वरिल सर्व कारणांमुळे विजेचा पुरवठा कमी होत आहे आणि विजेची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. म्हणून मागणी व पुरवठा यामध्ये निर्माण झालेली तूट वेळीच दूर करणे गरजेचे झाले आहे.

आज महाराष्ट्रातील ९०% विज ही कोळशा पासून निर्मित होते. तसेच महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त विजेची कमतरता आहे. भार नियमन (Load Shadding) हा सुद्धा लहान बालकाच्या जीभेवरील कडवट शब्द बनलाय. महाराष्ट्राला व भारताला पुढील दहा वर्षामध्ये आजच्या पेक्षा पाच पट विजेची गरज भासणार आहे. विविध खाजगी कंपन्या व भांडवलदार वीज निर्मिती क्षेत्रामध्ये उतरत आहेत. परदेशामधुन सुद्धा फार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. परंतु गुंतवणूक औष्णिक विद्यूत निर्मिती मध्येच होत आहे. पर्यायाने उपरोक्त समस्या वाढत आहे.

वरिल सर्व परिस्थितीवर उपाय अपारंपरिक ऊर्जा हाच आहे. म्हणून वाऱ्यापासून वीज निर्मिती (पवनचक्की) पाण्यापासून निर्माण होणारी वीज, सुर्यप्रकाशापासून वीज निर्मिती करण्यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच भूगर्भा मधील उष्णतेपासून सुद्धा वीज निर्माण होऊ शकते. समुद्राच्या लाटापासून विज निर्मिती, भूगर्भातील वायूपासून वीज निर्मिती यासारखे विविध पर्याय महाराष्ट्राला व भारताला नव्हे जगाने अंगीकारणे आवश्यक आहे. कारण वरिल सर्व विजनिर्मिती प्रकार प्रदुषण विरहित आहे. पुर्नरनिर्माणाचे आहेत. कारण वारा, पाणी आणि सुर्यप्रकाश इत्यादी विपूल प्रमाणावर व विनामूल्य उपलब्ध आहेत आणि या स्त्रोतांचा नाश होत नाही. परंतु वरिल स्त्रोतांपासून अत्यल्प प्रमाणावर विज निर्मिती होते.

वरिल सर्व स्त्रोतांपासून मुबलक विज निर्माण करण्यासाठी तंत्रज्ञानामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. अजूनही फार मोठ्या प्रमाणावर संशोधनाची गरज आहे.

विद्युत निर्मिती केंद्राचा एकूणच अवाढव्य पसारा लक्षात घेता पावसाळ्यात ठिकठिकाणी पाणी साचणे, तुंबणे, केबल ट्रेन्च मध्ये पाणी, चिखल साठणे, ड्रेनेज चोक-अप होणे इत्यादी समस्या उद्‌भवू शकतात. याशिवाय अतिवृष्टीमुळे केबल्स पाण्यात बुडून काही दुर्घटना घडू नये यासाठी सर्व उपाय आधीपासूनच योजले पाहिजेत. विविध साईटवरिल साठलेले पाणी उपसण्यासाठी (Dewatering Pumps ) वगैरे यंत्रणा तयार हवी. प्रमुख भांडारातील सामग्रीवर पाणी पडून ती गंजू वा खराब होऊ नये. यासाठी ताडपत्रींचे आच्छादन करण्याची गरज आहे. एकूणच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सतर्क राहण्याची गरज आहे. याच कालावधीत जल विद्युत केंद्रातून जास्तीत जास्त उत्पादन घेणे शक्य असल्याने आपल्या औष्णिक संचाच्या देखभालीची वेळापत्रकनिहाय उर्वरित कामे कशी करून घेता येतील. यासंबंधी नियोजन केले पाहिजे. त्याचप्रमाणे अंमलबजावणी व्हायला हवी.

महानिर्मितीची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कोळसा, इंधनावर अवलंबून असल्याने कोळसा वहन-हाताळणी, नमुना सर्वेक्षण इत्यादी प्रमुख घटकामध्ये मूलभूत सुधारणा घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील

Scanned by CamScanner

राहिले पाहिजे. तसेच सर्व औष्णिक विज निर्मिती केंद्राना पुरेसा व दर्जेदार कोळसा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्थापन सर्व पातळीवरून उपाय योजना राबविल्या पाहिजेत.

वीज चोरीचे प्रमाण दिवसेदिवस वाढत चालले आहे. त्यामुळे वीज चोरी होणार नाही. याची काळची घेणे आणि वीज चोरी करणाऱ्यांवर योग्य कारवाई करणे आवश्यक आहे.

ज्या योजना तयार करण्यात येतात. त्याची अंमलबजावणी वेळेवर व्हायला हवी मनुष्यबळाचा व तयार केलेल्या योजनेचा वापर चांगला व योग्य रितीने करणे गरजेचे आहे. विजेच्या वितरणात होणारे तोटे कमी करायला हवेत. जी वीज आपल्याकडे उपलब्ध होते त्याचा आणखी विकास करणे आवश्यक आहे. तसेच वीज वितरणासाठी लागणारा खर्च कमी करायला हवा. विद्युत वापरण्याची क्षमता व पडताळणी यांचा वेळेवर नीट आढावा घेणे गरजेचे झाले आहे. विदर्भात जेवढी वीज निर्माण होते. त्याच विजेचा योग्य व काटकसरीने वापर करायला हवा. तसेच निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा दर्जा वाढवायला हवा.

ऊर्जा संवर्धन करूनही विजेची बचत केली जाऊ शकते. ऊर्जा संवर्धन म्हणजे विजेची बचत. याचा अर्थ असा नव्हे की, अंधारात राहणे पण विजेचा सुयोग्य व चांगल्या पद्धतीने वापर करणे. आज आपले महाराष्ट्र राज्य विजेच्या भार नियमनाने ठवळून निघत आहे. हे भारनियमन का करावे लागत आहे ?  जेव्हा विजेच्या उपलब्धतेपेक्षा विजेची मागणी जास्त होते तेव्हा भार नियमन करणे आवश्यक असते. नाहीतर संपूर्ण राज्य अंधारात गडप होवू शकते आज विज नसेल तर सगळे विस्कळीत होवून जाते. म्हणून विजेचा सुयोग्य वापर करणे ही काळाची गरज आहे.

याकरिता खालील काही गोष्टी पाळल्यास विजेची बचत होवून पर्यायाने विजेचे भार नियमन कमी करू शकतो.

१) गरज नसेल तेव्हा सर्व विद्युत उपकरणे आणि दिवे त्वरित बंद करणे.

२) आवश्यकता असेल त्याच खोलीतील दिवे सुरू ठेवणे.

३) हॉल, किचन, बेडरूम मध्ये ट्यूब लाईट ऐवजी विजेची बचत करणारे CFL दिवे लावल्यास विजेची ७० ते ८०% बचत होते.

४) बाथरूम, संडास, व्हरांडा व पॅसेजमध्ये ६० ते १०० वॉटच्या दिव्याऐवजी ९ ते ११ वॉटचे CFL दिवे लावावेत. यामुळे विजेची ७० ते ८०% बचत होते.

५) रात्रीचा दिवा हा साधारणत: १० ते १५ वॉटचा असतो. त्याऐवजी ३ वॉटचा CFL दिवा लावल्यास विजेची ८०% बचत होते.

६) दिवे व ट्युबलाईटवर धूळ व घाण नसावी.

७) घराच्या भिंती व छताला फिकट रंग असावा.

८) शक्य असेल तेथे कमी क्षमतेचे मंद दिवे असावे.

Scanned by CamScanner

९) फ्रिज भिंतीपासून पुरेशा अंतरावर आणि हवेशीर जागी असावा.

१०) पाणी तापवण्यासाठी गिणरला जास्त विज लागते. म्हणून याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. स्नान एकापाठोपाठ केल्यास पुन्हा पुन्हा पाणी गरम करण्यासाठी खर्च होणाऱ्या विजेची बचत होईल.

११) धुलाई यंत्राचा वापर जेव्हा त्याच्या क्षमतेएवढे कपडे असतील तेव्हाच करावा.

१२) कुटूंबातील सर्वांचे कपडे एकाच वेळी धुतल्यास धुलाई यंत्र पूर्ण क्षमतेने वापरणे सोयीचे होईल.

१३) कपड्याची इस्त्री करतांना इस्त्रीचे तापमान योग्य प्रकारे नियंत्रित करावे.

१४) आपले ओले केस शक्यतो नैसर्गिकरित्याच वाळवावेत हेअर ड्रायरचा वापर करावयाचा असल्यास त्यापूर्वी केस टॉवेलने कोरडे करावे.

१५) थोड्या सफाई कामासाठी केरसुणीचा वापर करवा.

अशाप्रकारे विजेचा पुरवठा कमी आणि मागणी जास्त असल्याने असंतुलन निर्माण झाले आहे. परंतु विदर्भात मात्र विजेचा पुरवठा जास्त आणि मागणी त्या मानाने कमी आहे. म्हणजेच विदर्भात आपण विजेचे अधिक उत्पादन करतो. विदर्भात विजेच्या मागणी व पुरवठ्यामध्ये तूट निर्माण होत नाही. पण तरी सुद्धा विदर्भातच भारनियमाचे प्रमाण जास्त आहे.

विजेच्या पुरवठ्यात व मागणीत तूट नसल्यास विदर्भातील विजकपातीची समस्या योग्य आहे. कारण महाराष्ट्र राज्यातील विजेचा पुरवठा कमी आणि मागणी जास्त आहे. विदर्भ सोडल्यास इतर ठिकाणी उद्योगधंद्याचे जाळे पसरले आहेत. ते सर्व उद्योग जास्तीत जास्त प्रमाणात विजेवर अवलंबून असते. म्हणून त्यांची मागणी वाढते. परंतु महाराष्ट्र राज्य तेवढी विज निर्माण करू शकत नाही. कारण त्या भागात कोळशाचा साठा कमी आहे. जमिनीचे प्रमाण आणि पाण्याचीही कमतरता त्या भागात जाणवते. जर त्यांनी अपारंपरिक ऊर्जा च्या सहाय्याने विजेचे उत्पादन करावयाचे ठरवले तरीही ते त्या प्रमाणात विज उत्पादन करू शकत नाही. कारण अपारंपरिक स्त्रोतांद्वारे अत्यल्प प्रमाणात विज निर्मित होते. म्हणून विदर्भ सर्व बाबतीत सक्षम असल्यामुळे विविध प्रकल्पाद्वारे जास्त प्रमाणात विजेचे उत्पादन करून मुंबई, पुणे अशा औद्योगिक भागातील विजेची गरज पूर्ण करू शकतो.

विदर्भात उद्योगधंद्याचे जाळे कमी प्रमाणात आहे. विजळपान जरी थोड्यावेळा करिता केली तरी त्याचा फारसा परिणाम जाणवत नाही. जर का महाराष्ट्रातील मुंबई, पुणे अशा भागातील विजकपात केली तर प्रचंड प्रमाणावर नुकसान होऊन त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाल्याशिवाय राहणार नाही.

कोणत्याही देशाचा विकास हा औद्योगिकरणारवर अवलंबून असतो. जर हे उद्योग काही वेळाकरिता बंद ठेवण्यात आले तर प्रचंड प्रमाणात नुकसान होऊन देशाचा आर्थिक विकास होणार नाही.

विदर्भातील विजकपातीची समस्या आपण आणखी नवीन प्रकल्प उभारुन त्याद्वारे अधिक वीज उत्पादन

Scanned by CamScanner

करून दूर करू शकतो किंवा विजेची बचत करूनही भारनियमाचे प्रमाण कमीत कमी करू शकतो.

जोपर्यंत आपण विजेची बचत करणार नाही. तोपर्यंत महाराष्ट्राला लागणारी विजेची गरज पूर्ण करू शकत नाही. महाराष्ट्र राज्याला लागणारी विजेची गरज विदर्भातील अनेक केंद्रातून भागविली जाते. विज निर्मितीचा खर्च कमी करण्याच्या दृष्टिकोनातून विज निर्मितीसाठी लागणारा कोळशाचा वापर कमीत कमी व्हावा. यासाठी अदयावात संयंत्रे वापरण्यात आली आहेत. ५०० मेगावॅट संयंत्रणाला आधुनिक नियंत्रण प्रणाली देऊन त्याची क्षमता वाढविण्यासाठी कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र संघ कार्यरत असून संयंत्रणाचा योग्य विकास व सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन करित आहे. त्याचा उत्पादन वाढीमध्ये लाभ झाला असून मंडळाची आर्थिक बचत झालेली निदर्शनास आलेली आहे. संयंत्रणाची उपलब्धतता सुधारण्याच्या दृष्टिकोनातून देखभाल व दुरूस्ती खर्चामध्ये काटकसर व उत्पादन वाढ करण्यात या केंद्राची वाटचाल सुरु आहे.

## संदर्भग्रंथ सूची


३) ऊर्जा स्मरणिका–२००५ चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र

४) सृजन–एप्रिल व मे–२००७ महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य विजनिर्मिती कंपनी मर्यादित)

५) सृजन–मे व जून–२००८ महानिर्मिती (महाराष्ट्र राज्य विजनिर्मिती कंपनी मर्यादित)

६) मार्गदर्शन महापारेषण (महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित)

७) MAHAGENCO Diary-2008 Maharashtra State Power Generation Company Limited

८) Mahagenco at a Glance Engineers Diary-2007

९) महानिर्मिती Diary-2007 (महाराष्ट्र राज्य विजनिर्मिती कंपनी मर्यादित)

१०) News Papers


Scanned by CamScanner

# भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादनाच्या समस्या व त्यावर एक उपाय

**जी. एस. ठाकरे**
महाराष्ट्र क. महाविद्यालय, सिहोरा.

**प्रस्तावना–** भंडारा हा 'भनारा' ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा कारण रतनपुर येथिल उत्खननात इ.स. ११०० मध्ये मिळालेल्या शिल्प लेखात 'भनारा' हा शब्द प्रयोग आढळतो. इ.स. १८१८ ते १८३० पर्यंत हा प्रदेश राजघराण्याच्या अधिपत्याखाली होता. आणि जिल्हा मुख्यालय लांजी येथे होते. १८२१ च्या दरम्यान लांजी मुख्यालय बदलून भंडारा येथे जिल्हा मुख्यालय स्थापन करण्यात आले. १८८१ पर्यंत केवळ तिरोडा व साकोली हे दोनच तालुके होते. परंतु आता भंडारा, साकोली, तुमसर, मोहाडी,पवनी, पालांदूर, लाखनी हे सात तालुके आहेत.

भंडारा जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ३,८९० चौ.की.मी. आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २१,०७,३२९ इतकी असून त्यापैकी १०,६०,२७५ पुरूष आणि १०,४७,३३४ स्त्रियांची संख्या आहे. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ग्रामीण भागात १८,३१,७३५ असून नागरी भागात २,७५,८९४ इतकी आहे.

भंडारा जिल्हा वैनगंगेच्या खोऱ्यात उत्तर अक्षांश २० – ३९' ते २१ – ३८' आणि पूर्व रेखांश ७९ – २७ ते ८० – ४२' च्या दरम्यान आहे.

भंडारा जिल्ह्याच्या उत्तरेस मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्हा, पुर्वेस राजनांदगाव जिल्हा दक्षिण भागामध्ये चंद्रपूर जिल्हा, पश्चिमेस नागपूर जिल्हा आहे.

तुमसर तालुक्यात चांदपूर येथे मोठा तलाव आहे. त्या तलावाचे पाणी आजुबाजुच्या ४० गावातील शेतकऱ्यांना धान उत्पादनाकरिता दिले जाते. जिलीयाचा काही भाग वैनगंगेच्या मैदानी प्रदेशात मोडतो. वैनगंगा व तिच्या उपनद्यावर उपसा सिंचन योजना राबवल्या जातात त्याचे पाणी धान उत्पादनाकरिता पुरविल्या जाते.

धानाच्या उत्पादनाकरिता उष्ण व दमट हवामान आहे. १५० ते २०० से.मी. पर्जन्य आहे. गाळाची मृदा पोषक आहे. खाली चिकणमातीचा थर आहे. वैनगंगेच्या खोऱ्यातील मृदा उत्तम आहे. डोंगर उतारावरील लाल रंगाची मृदा धान उत्पादनाकरिता अनुकूल असल्यामुळे धानाचे उत्पादन जास्त होते. म्हणून भंडारा जिल्हा धान उत्पादनाकरीता प्रसिध्द जिल्हा म्हणून ओळखला जातो.

Scanned by CamScanner

१. भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादन

अ) धान उत्पादनाचे भू–क्षेत्र १.२६ टक्के

जिल्ह्याच्या एकूण भू–क्षेत्रापैकी ९०% भाग धान उत्पादनाकरीता आहे. धान हे जिल्ह्यातील प्रमुख पिक असून येथिल लागवडीखालील क्षेत्रापैकी सर्वाधिक क्षेत्र धान लागवडीखाली आहे. धानाबरोबरच १०% भागामध्ये ऊस, सोयाबीन, मिरची, यांचे उत्पादन घेतले जाते.

ब) कृषी उत्पादनात धान उत्पादनाची टक्केवारी (१९९५–१९९६)

| अ.क्रं. | तालुके | तांदळाचे उत्पादन |
|---|---|---|
| १ | भंडारा | २१४६६ |
| २ | तुमसर | २१५६८ |
| ३ | मोहाडी | २६४११ |
| ४ | साकोली | ३४५११ |
| ५ | लाखांदूर | २९६९९ |
| ६ | पवनी | २६५९२ |
| ७ | लाखनी | २५५५२ |

सरासरी धान उत्पादनाची टक्केवारी ७०.७८%

आधार– अधिक्षक कृषी अभिलेख, भंडारा

क) धान उत्पादन घेणारे शेतकरी व त्यांच्या सामाजिक व आर्थिक समस्या

भंडारा जिल्ह्यातील ९०% शेतकरी धानाचे उत्पादन घेत असून त्या शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण होतात.

**सामाजिक समस्या**

**(१) पारंपारिक पध्दतीचा वापर –** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अशिक्षित व अज्ञानी असल्यामुळे तसेच त्यांची आर्थिक स्थिती मजबुत नसल्यामुळे ते यंत्राच्या साहाय्याने शेती करू शकत नाही. त्यामुळे त्यांच्या धानाच्या उत्पादनात वाढ होत नाही.

**(२) प्रौढ शिक्षणाचा अभाव –** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी गरीब असल्यामुळे ते आपल्या अपत्यांना शाळेत पाठवू शकत नाही. निरक्षर असल्यामुळे ते आपल्या शेतीची मशागत पारंपारिक पध्दतीने करतात त्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होत नाही.

**(३) शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोण –** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी शेतीकडे फक्त उदर निर्वाहाचे साधन म्हणून पाहतात व्यापारी दृष्टीकोनातून शेतीकडे पाहात नाहीत.

**(४) शेतजमिनीचे लहान तुकडे–** भंडारा जिल्ह्यातील शेतजमीन अत्यंत लहान लहान तुकड्यांमध्ये विभागलेली

Scanned by CamScanner

आणि ठिकठिकाणी विखूरलेली आहे. अशा जमिनीवर शास्त्रीय पध्दतीने शेती करणे शक्य होत नाही.

**(५) शेतीवरील लोकसंख्येचा ताण –** जिल्ह्याचे औद्योगिक क्षेत्र पुरेसे विकसित झालेले नसल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्याचा भार शेतीवर पडतो. या क्षेत्रामध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मजूर काम करतात या जास्त मजुरामुळे धानाचे उत्पादन वाढण्याऐवजी कमी होते.

**आर्थिक समस्या :**

**(१) कर्ज पुरवठा करणाऱ्या सुविधांचा अभाव –** भंडारा जिल्ह्यामध्ये छोटे व मध्यम शेतकरी तसेच अतिअल्प भूधारक शेतकरी यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था कमी आहेत. त्याचा परिणाम शेतीच्या धान उत्पादनावर व विकासावर होतो.

**(२) जलसिंचनाचा अभाव –** भंडारा जिल्हा तलाव, कालवे यांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी या जिल्ह्यातील शेतकरी नैसर्गिक पावसावर अवलंबून असतात. पाऊस, हवामान शेतीला अनुकू ल असेल तर धान उत्पादनात वाढ होईल परंतु जलसिंचनाचा अभाव असल्यामुळे धान उत्पादनात वाढ होत नाही.

**ड) धान उत्पादनात भंडारा जिल्ह्याचे योगदान –** पूर्व महाराष्ट्रातील वैनगंगा नदीच्या खोऱ्यात वसलेला भंडारा जिल्हा धान उत्पादनाकरिता प्रसिध्द आहे. या जिल्ह्यात सरासरी १०० से.मी. पाऊस पडतो. येथिल सरासरी तापमान २७ से इतके आहे. या जिल्ह्यात अनेक लहान मोठे तलाव आहेत. येथिल भौगोलिक परिस्थिती अनुकूल असल्यामुळे धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. त्या धानाला जागतिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी प्राप्त झालेली आहे.

**इ) गत पाच वर्षाचा आढावा**

*उत्पादन '००' मे टनात आहे.*

| वर्ष | तांदूळ |
|---|---|
| १९९०-९१ | ४४१० |
| १९९१-९२ | ३५२९ |
| १९९२-९३ | ३८४६ |
| १९९३-९४ | ४४०४ |
| १९९५-९६ | ४८२९ |

सरासरी उत्पादन = ४१४३.६

आधार – कृषी आयुक्तालय पुणे

**२) भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादनाचे क्षेत्र**

**(अ) संघटित –** भंडारा जिल्ह्यात कामगार जास्त प्रमाणात संघटित जरी नसले तरी काही काही भागामध्ये कामगार संघटित आहेत. शेतकरी कामगारांना मजूरीचे दर योग्य प्रमाणात देत नाही. एकटा मजूर शेकऱ्याशी वाटाघाटी करू शकत नाही. सर्व कामगार एकत्र येऊन मालकावर दबाव टाकून आपल्या मागण्या पूर्ण करू शकताल या करीता मजूरांना संघटित होणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

**(ब) असंघटित –** बहुतेक कामगार अशिक्षित, अज्ञानी असतात त्यामुळे ते कामगार शेतकऱ्यांनी जी मजूरी दिली ती स्विकारण्याचा प्रयत्न करतात. ते कामगार मालकाशी वाटाघाटी करू शकत नाही. जर मालकासी वाटाघाटी केल्या तर मालक वर्ग कामावरून काढून टाकेल. त्यामुळे आपल्यावर उपासमारीची पाळी येईल आणि आपल्या मुलभूत गरजा भागविता येणार नाही. आपल्या कुटूंबाचे उदर निर्वाह करता येणार नाही. त्याकरिता ते कामगार असंघटित असतात.

**(क) असंघटित असण्याची कारणे :**

असंघटित असण्याची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) अज्ञान २) दारिद्रय ३) बेकारी ४) लोकसंख्येत वाढ ५) श्रमाऐवजी भांडवल प्रधान उत्पादन तंत्राचा वापर.

**(ड) संघटित होण्याच्या अडचणी :**

संघटित होण्याच्या अडचणी खालील प्रमाणे आहेत.

१) एकटा कामगार मालकाशी वाटाघाटी करू शकत नाही. २) संघर्ष वाढतो.

३) कधी कधी सर्व कामगार एकत्र येवू शकत नाही. ४) शिक्षणाचा अभाव ५) गरिबी

**(इ) संघटित क्षेत्राचे फायदे :**

संघटित क्षेत्राचे फायदे खालील प्रमाणे आहेत.

१) मजूरीचे दर वाढतात. २) कामाचे तास कमी होतात ३) कामगारांना स्वसामर्थ्याची जाणीव होते.

४) कामगारांचे शोषण संपुष्टात येते. ५) कामगारांचे सर्व प्रश्न सुटतात.

**३) भंडारा जिल्ह्यातील धान प्रक्रिया उद्योग.**

**अ) एकुण भात गिरण्यांची संख्या**

| अ.क्र. | तालुके | भात गिरण्यांची संख्या |
|---|---|---|
| १) | भंडारा | ७० |
| २) | साकोली | ६५ |
| ३) | तुमसर | ५० |
| ४) | मोहाडी | ४५ |
| ५) | लाखांदूर | ३० |
| ६) | पवनी | ४० |
| ७) | लाखनी | ५३ |
| | एकूण | ३५३ |

Scanned by CamScanner

**ब) भात गिरण्यांचे केंद्रिकरण :**

भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुका या ठिकाणी भात गिरण्यांचे केंद्रिकरण झाले. त्या ठिकाणी खाजगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या भात गिरण्या चालतात सार्वजनिक गिरणीमध्ये रास्त किंमत घेतली जाते आणि खाजगी गिरण्यामध्ये जास्त किंमत घेतली जाते.

**क) भात गिरण्यांच्या समस्या :**

भात गिरण्यांच्या समस्या खालील प्रमाणे आहेत.

**१) विजेचा अपुरा पुरवठा :** कोणत्याही उद्योगाचा विकास करावयाचा असेल तर विजेचा पुरवठा असणे आवश्यक आहे. विजेचा पुरवठा बंद पडल्यास धान गिरण्या सुरू होणार नाही. ज्या ठिकाणी खांब आहेत त्या ठिकाणी तार नाही. ज्या ठिकाणी तार आहेत त्या ठिकाणी वीज नाही. अशी भंडारा जिल्ह्याची परिस्थिती असल्यामुळे भात गिरण्या बंद पडतात.

**२) जुनी यंत्रे :** भात गिरण्यांची यंत्रे जुनी आणि कालबाह्य झाली असल्यामुळे केव्हाही बंद पडतात. यंत्र दुरूस्ती करण्याकरिता किंवा नविन यंत्र खरेदी करण्याकरिता भात गिरणी मालका कडे पुरेशा प्रमाणात पैसा उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होतात.

**ड) भात गिरण्यांचे उत्पन्न :**

| अ.क्र. | तालुके | प्रति क्विं. | दर |
|---|---|---|---|
| १) | भंडारा | १ क्विंटल | ५० रू. |
| २) | साकोली | १ क्विंटल | ४० रू. |
| ३) | तुमसर | १ क्विंटल | ४० रू. |
| ४) | मोहाडी | १ क्विंटल | ४५ रू. |
| ५) | लाखांदुर | १ क्विंटल | ५० रू. |
| ६) | पवनी | १ क्विंटल | ५५ रू. |
| ७) | लाखनी | १ क्विंटल | ४५ रू. |

**इ) भात गिरण्याचे आधुनिकिकरण :** पूर्वीच्या काळी भंडारा जिल्ह्यामध्ये भात गिरण्या अस्तित्वात नव्हत्या. त्यावेळी शेतकरी धानाची पिसाई हाताच्या साहाय्याने म्हणजेच श्रमशक्तीच्या सहाय्याने करीत होते. जस जसा मानवाचा विकास झाला. तस तसा श्रमशक्ती ऐवजी यंत्राचा वापर वाढला. साहाय्याने धानाची पिसाई केली जाते. कमीत कमी वेळामध्ये चांगल्या प्रकारे भात गिरण्यांच्या साहाय्याने धानाची पिसाई केली जाते. शेतकऱ्यांना पैशाची गरज भासली तर भात तात्काळ बाजारपेठेमध्ये नेता येतो. बाजारपेठेत भाताची मागणी जास्त वाढली असेल तर गिरण्यांच्या साहाय्याने लवकरात लवकर भाताचा पुरवठा केला जातो.

Scanned by CamScanner

### ४) धान पिकापासून उत्पन्न

धान पिकापासून उत्पन्न खालील प्रमाणे मिळते

**अ) एकरी धान उत्पादन :** भंडारा जिल्ह्याचा २००७-०८ या कालावधीचा धान उत्पादनाच्या बाबतीत विचार करता एका एकराला जिल्ह्याचे सरासरी उत्पादन १० क्विंटलच्या जवळपास आहे.

**ब) प्रति क्विंटल धान विक्री दर :** भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यात धान विक्रीची मोठी बाजारपेठ आहे. त्या बाजारपेठेत वेगवेगळ्या प्रकारच्या धानाची विक्री केली जाते.

| धानाचा प्रकार | प्रति क्विंटल | विक्री दर |
|---|---|---|
| चिनोर धान | १ क्विंटल | २००० रु. |
| बसुमती - ३७० | १ क्विंटल | १९०० रु. |

**स्पष्टीकरण :** भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे मोठी बाजारपेठ आहे. या बाजारपेठेमध्ये धानाची विक्री मोठ्या प्रमाणात केली जाते. राज्याच्या बाजारपेठेत तुमसर तालुक्यातील बाजारपेठ प्रसिद्ध आहे. कारण या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात ठोक व्यापारी येतात. त्यामुळे धानाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**क) शेतकऱ्याला मिळणारा दर एकरी मोबदला :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी आपल्या शेतीच्या मशागतीपासून तर धान कापणी पर्यंत काही रूपये खर्च करीत असतो. साधारणत: २००० हजार रूपये खर्च येतो आणि एका एकराला धानाचे उत्पादन १० क्विंटल होते.

१० क्विंटल धानाची किंमत बाजारपेठेत २०००० रु आहे.

उत्पन्न – खर्च = दर एकरी मोबदला

२०००० – २००० – १८०००/-

**ड) तांदूळ निर्मितीचा परिणाम :** उत्पादन झालेल्या धानापासून तांदूळ निर्मिती करावयाची असेल तर तांदूळ निर्मिती गिरण्याची आवश्यकता असते. परंतु तांदूळ निर्माण धान गिरण्या शेतकऱ्याच्या तुलनेत बऱ्याच कमी आहेत. त्या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांची संख्या बरीच कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे धान तांदूळ गिरण्यामध्ये पडून राहतात. आणि तांदळाला पाहिजे त्या प्रमाणात किंमत मिळत नाही. त्यामुळे तांदूळ निर्मितीचा परिणाम शेतकऱ्यावर प्रतिकूल होतो.

**इ) गिरणी मालकाला मिळणारा मोबदला :** धानाचे उत्पादन झाल्यानंतर शेतकरी ते धान पिसण्याकरिता गिरणीमध्ये नेत असतो. अशावेळी गिरणी मालकाला १ क्विंटल धानाचा ५० रूपये मोबदला मिळत असतो गिरणीमध्ये एका दिवसाला कमीत कमी ५० क्विंटल धान पिसले जातात ५० X ५० = २५०० एका दिवसाला मोबदला मिळू शकतो. कधीकधी विजेचा पुरवठा बरोबर असेल तर त्यापेक्षा जास्त ही मोबदला मिळतो.

Scanned by CamScanner

**फ) प्रति क्विंटल तांदळाचा दर :** बाजारपेठेत धानाच्या पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त असेल तर तांदळाची किंमत जास्त राहील. आणि पुरवठा जास्त व मागणी कमी असेल तर किंमत कमी राहील.

प्रचलित प्रति क्विंटल तांदळाचा दर २२०० रू. आहे.

**ह) बाजारपेठेत मध्यस्थाला मिळणारे प्रति क्विंटल उत्पन्न :** शेतकरी जेव्हा बाजारपेठेत तांदूळ किंवा धान विकण्याकरिता नेतो. त्यावेळी तो स्वत: धान्य विकत नाही. स्वत: विकण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या मालाला भाव मिळत नाही. अशा वेळी शेतकरी दलालाच्या (मध्यस्त) सहकार्याने धानाची विक्री करतो. प्रति क्विंटल धान १९०० रुपये असेल तर त्याला कमिशन म्हणून ५० ते ६० रुपये दिले जाते.

**ग) उपभोक्त्याला द्यावा लागणारा तांदळाचा दर :** मनुष्याला जिवन जगण्याकरिता ज्याप्रमाणे वस्त्राची निवाऱ्याची, शिक्षणाची , आरोग्याची आवश्यकता असते त्याचप्रमाणे पोटाची भुक भागविण्याकरिता अन्नाची आवश्यकता असते. तांदूळ जर उच्च प्रतिचा असेल तर २४ रु किलो. आणि कमी प्रतिचा असेल तर १५ रु दर द्यावा लागतो.

**५) धान उत्पादनाचे प्रकार**

अ) धान उत्पादनाचे प्रकार व लागवडी खालील क्षेत्रफळ

| अ.क्र. | धान उत्पादनाचे प्रकार | लागवडी खालील क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १) | चिनोर | भंडारा जिल्ह्यातील तांदळाचे |
| २) | एक हजार दहा | क्षेत्र जास्त असून १९९५-९६ |
| ३) | बसुमती-३७० | मध्ये एकूण क्षेत्रफळ-७०.७८% होते. |

भंडारा जिल्ह्यात अजुनही पेरणी परंपरागत पद्धतीने केली जाते. याला 'पेर भात' असे म्हणतात.

**ब) प्रकारानुसार उत्पादनाचे तुलनात्मक वितरण**

| अ.क्र. | प्रकार | उत्पादनाचे तुलनात्मक वितरण |
|---|---|---|
| १) | चिनोर | २०००० क्विंटल |
| २) | एक हजार दहा | १८००० क्विंटल |
| ३) | बसुमती-३७० | १९००० क्विंटल |

भंडारा जिल्ह्यात एका पेक्षा जास्त धानाचे उत्पादन होत असले तरी चिनोर या धानाचे उत्पादन तुलनात्मक दृष्ट्या सर्वात जास्त आहे.

**क) प्रकारानुसार धानाच्या किंमती**

| अ.क्र. | प्रकार | प्रति क्विंटल धानाची किंमत |
|---|---|---|
| १) | चिनोर | २००० रू. |
| २) | एक हजार दहा | १५०० रू. |
| ३) | बसुमती-३७० | १९०० रू. |

वरील धानाच्या प्रकारापैकी चिनोर या धानाची किंमत २००० रु प्रति क्विंटल म्हणजेच इतर धानाच्या किंमतीपेक्षा जास्त आहे.

Scanned by CamScanner

ड) प्रकारानुसार धानाचा परिव्यय

| अ.क्र. | प्रकार | धानाची प्रति क्विंटल परिव्यय |
|---|---|---|
| १) | चिनोर | ६०० रू. |
| २) | एक हजार दहा | ३०० रू. |
| ३) | बसुमती-३७० | ५०० रू. |

**इ) लोकप्रिय धान प्रकार :** भंडारा जिल्ह्यातील सर्वात लोकप्रिय धानाचा प्रकार म्हणजे चिनोर धान आहे. शेतकऱ्यांना हा धान उत्पादनाकरिता पुरविणारा धान आहे. कारण खर्चापेक्षा या धानाचे उत्पादन जास्त होते. हा धान मुलायम स्वरूपाचा असल्यामुळे या धानाविषयी लोकांची आवड निवड जास्त असते. म्हणून या धानाला लोकप्रिय धान म्हटले जाते.

**६) धान उत्पादनाच्या विविध समस्या :** धान उत्पादनाच्या विविध समस्या खालील प्रमाणे आहेत.

**१) पाणीपुरवठा :** आजही भंडारा जिल्ह्यातील ७०% शेतकरी निसर्गाच्या पावसावर अवलंबुन आहे. शेतीला पाऊस हवामान अनुकूल असेल तर शेतीचे उत्पादन जास्त होईल.

कालवे, विहिरी, धरणे इत्यादी पाणीपुरवठ्याच्या सोयी जिल्ह्यात पुरेश्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे धान उत्पादन कमी होते.

**२) मजुर व मजुरीचे दर :** धानाच्या शेतीसाठी मजुरांची आवश्यकता जास्त असते. कारण धानशेतीतील बरीचशी कामे मजुरांच्या साहाय्याने करावी लागतात.

उदा. मशागत, पेरणी, लावणी, कापणी इत्यादी कामे करण्याकरीता मजुरांची आवश्यकता असते. परंतु मजुरांची कमतरता असल्यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी मजूर मिळत नाही.

मजूरीचे दर ४० रू जास्त प्रमाणात असल्यामुळे शेतकऱ्यांना कधी-कधी उत्पन्नापेक्षा जास्त खर्च सहन करावा लागतो.

**३) वित्तपुरवठा व उत्पादन :** भंडारा जिल्ह्यामध्ये छोटे व मध्यम शेतकरी तसेच अतिअल्प भू-धारक शेतकरी यांना वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था कमी आहेत. याचा परिणाम शेतीच्या विकासावर व उत्पादनावर होतो.

**४) बि-बियाणे व रासायनिक खते :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अजूनही जुन्या परंपरागत बि-बियाणांचा वापर करतात. ही बि-बियाने गावातील सावकाराकडून किंवा खाजगी दुकानातून मिळवलेली असतात. ही बियाणी हलक्या दर्जाची असल्यामुळे धान उत्पादनात वाढ होत नाही.

रासायनिक खते : जमिनीचा कस कायम राहण्यासाठी जमिनीला नैसर्गिक व रासायनिक खते पुरविणे जरूरीचे असते. बहुतेक शेतकरी शेणखतांचा वापर करित असल्यामुळे धान उत्पादनात वाढ होत नाही.

Scanned by CamScanner

५) **असंघटित धान उत्पादन :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अज्ञानी गरिब असल्यामुळे आपल्या शेतीची मशागत चांगल्या प्रकारे करू शकत नाही. त्यामुळे एकरी उत्पादन कमी होते.

६) **अपुरा विजपुरवठा :** भंडारा जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांकडे विहीर आहेत. मोटारपंप आहेत परंतु त्या ठिकाणी खांब नाही ज्या ठिकाणी खांब आहेत त्या ठिकाणी वीज नाही विजेचा पुरवठा अपुरा असल्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत नाही.

७) **सरकारचे दुर्लक्ष :** महाराष्ट्र राज्यात भंडारा जिल्हा जास्त धान उत्पादनाचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु या जिल्ह्याकडे सरकारचे दुर्लक्ष आहे. शेतकऱ्यांना लागणारे उत्तम प्रकारचे बि–बियाणे, रासायनिक खते, कर्ज पुरवठा केल्या जात नाही त्यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक संकटे निर्माण होतात.

८) **संसाधनाचा अभाव :** भंडारा जिल्ह्यातील कृषी संशोधन केंद्र साकोली येथे आहे. प्रत्येक तालुक्यामध्ये नव्या पिढीस शेतकीशाळा व शेतकी महाविद्यालय यांच्या माध्यमातून शेतीच्या नविन पद्धती, रासायनिक खते संकरित बि-बियाणे, नविन शेतीची अवजारे या संबंधी शिक्षण देणे गरजेचे आहे.

९) **धानाच्या किंमती :** शेतीत उत्पादन होणाऱ्या शेतमालात जास्त किंमत प्राप्त होऊ नाही. कधी कधी उत्पादनापेक्षा खर्च जास्त येत असतो. बहुतेक शेतकरी गरिब असल्यामुळे सावकाराकडून कर्ज घेतात अन्नधान्याची किंमत कमी असल्यामुळे सावकाराचे कर्ज परत फेड करू शकत नाही.

१०) **साठवणूकीची समस्या व इतर समस्या :** धानाची साठवणूक करण्याकरिता शेतकऱ्याला गोदामाची आवश्यकता असते. परंतु भंडारा जिल्ह्यात अशा गोदामाची सोय फारच कमी असल्यामुळे शेतकऱ्याला मालाची साठवणूक करण्याकरिता मोठी अडचण निर्माण झाली आहे.

**इतर समस्या :**

१) **शेतीच्या यांत्रिकीरणाचा अभाव :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अजूनही लाकडी नागरांच्या, पशुंच्या साहाय्याने शेतीची मशागत करतात. त्यामुळे धान उत्पादनात वाढ होत नाही.

२) **अपूऱ्या बाजारपेठा :** भंडारा जिल्ह्यात धान विक्रीकरिता अपूऱ्या बाजारपेठा आहेत. त्यामुळे त्या शेतकऱ्यांना माल विकण्यासाठी लांब अंतरावर जावे लागते. त्याकरिता जास्त कर्ज येतो.

३) **नद्यांना येणारे पुर :** भंडारा जिल्हा वैनगंगा नदीच्या काठावर वसला असून नदीला महापूर आला की, त्या महापूरामुळे धान पिके वाहून जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते.

४) **शिक्षणाचा अभाव :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अज्ञान निरक्षर, गरीब असल्यामुळे शेतीच्या मशागती पारंपारिक पद्धतीने करीत असल्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत नाही. यांत्रिकीकरणाचा अभाव, सुधारित बी बियांणाचा अभाव असल्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होत नाही.

Scanned by CamScanner

भंडारा जिल्हा जरी धान उत्पादनाकरिता जिल्हा म्हणून ओळखला जात असला तरी त्या जिल्ह्यात वरील प्रमाणे समस्या निर्माण होतात.

ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या अंगाला एखाद्या रोगाने पछाडले असता तो रोग उत्तरोत्तर वाढू नये म्हणून त्या रोगावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून औषधांचा वापर करतात त्याप्रमाणे भंडारा जिल्ह्यातील धान उत्पादनाच्या समस्या वाढू नये म्हणून त्यावर खालील प्रमाणे उपाययोजना सांगितल्या आहेत.

**१) सुधारित बि–बियाणे :** शासनाच्या पुढाकाराने कृषि संशोधनामध्ये प्रगती झाली. सुधारित बि–बियाणे शोधून काढण्यास कृषी तज्ञांना यश मिळाले आहे. सुधारित बि–बियाणांचा वापर करून धानाची उत्पादकता वाढविता येते.

**२) जलसिंचनाच्या सुविधा :** भंडारा जिल्ह्यातील शेती निर्सगाच्या लहरीवर अवलंबून असल्यामुळे उत्पादकता कमि आहे. वैनगंगा नदीवर धरणे बांधून, विहिरी, कालवे तयार करून धान उत्पादन वाढविता येते.

**३) खतांचा वापर :** जमिनीचा कस कायम ठेवण्यासाठी आणि अधिक उत्पादन वाढविण्यासाठी जमिनीला नैसर्गिक व रासायनिक खतांचा मुबलक पुरवठा झाला पाहिजे पिकासाठी रासायनिक खते महत्वाची असतात.

**४) शेतीत आधुनिक तंत्र व अवजारांचा वापर :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी अजुनही पारंपारिक पद्धतीने शेती करतात. त्यामुळे उत्पादन कमी होते. पारंपारिक पद्धती ऐवजी आधुनिक पद्धतीने म्हणजे अवजारे, यंत्र, उपकरणे यांच्या साहाय्याने शेतीची मशागत केली तर धान उत्पादनात वाढ होते.

**५) शेतकऱ्यांना कर्जपुरवठा :** भंडारा जिल्ह्यातील शेतकरी गरीब असल्यामुळे त्या शेतकऱ्यांना अल्प दराने कर्ज पुरवठा होणे आवश्यक आहे. अल्पदराने कर्ज पुरवठा झाला तर ते शेतकरी शेतीला लागणारी आवश्यक संसाधने खरेदी करतील आणि धान उत्पादनात वाढ होईल.

**६) पिकावरील किड व रोगांचे निर्मुलन :** भंडारा जिल्ह्यात धान उत्पादनावर पडणाऱ्या किडीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे उत्पादन कमी मिळते. काही वेळा पिकावर किड पडून पिके नाहिसे होतात. यासाठी धानावर ठराविक काळाने औषधांची फवारणी केली पाहिजे. त्यामुळे धान उत्पादनात वाढ होईल.

संदर्भ टिपा :

१) भंडारा जिल्ह्याचे क्षेत्रफळ ३८९० चौ.कि.मी. आहे.
२) तुमसर तालुक्यात चांदपुर येते मोठे तलाव आहे.
३) भात संसोधन केंद्र साकोली येत आहे.
४) तुमसर येथे मोठी धान विक्री बाजारपेठ आहे.
५) भंडारा जिल्हा वैनगंगा नदीच्या खोऱ्यात बसलेला आहे.

संदर्भ ग्रंथ सुची


| अ.क्र. | लेखकांचे नाव | पुस्तकाचे नाव |
|---|---|---|
| १) | प्रा.व.गो. सहस्त्रबुद्धे | अर्थशास्त्राची मुलतत्वे |
| २) | प्रा. अ.ना. लोधे | अर्थशास्त्राची मुलतत्वे |
| ३) | प्रा. के.ए. खलीब | महाराष्ट्राचा भुगोल |
| ४) | डॉ. पालीवाल राधाकृष्णे १९८५ | भंडारा जिल्हा धान अर्थव्यवस्था |


Scanned by CamScanner



# अर्थ–वाणिज्य शिक्षण आणि रोजगार


**दत्तात्रेय सोनेगांवकर**

व्ही.एम.व्ही.कॉलेज, नागपूर


भारताच्या स्वातंत्र्याला ६० वर्षे पूर्ण झालीत परंतू आजही मागेल त्याला काम देण्याची क्षमता देशाच्या अर्थव्यवस्थेत दिसून येत नाही. कारण आजही मागितल्या शिवाय काम कुणीही देत नाही. काम मिळविण्याकरीता मागावे लागते अशीच बहूसंख्य भारतीयांची धारणा आहे आणि यामुळेच रोजगाराचा प्रश्न तिव्रतेने देशासमोर उभा असलेला दिसून येतो. अर्थ–वाणिज्य विषयाचे विद्यार्थी ज्यावेळी रोजगाराच्या शोधात कामाची मागणी करीत फिरत असतात व त्यांना काम देण्यास सर्वत्र असमर्थता व्यक्त केली जाते त्यावेळी हा प्रश्न निर्माण होतो की अर्थ-वाणिज्याचे शिक्षण घेऊनही या क्षेत्रातील बेरोजगारांना या विषयांचा अर्थच नीट कळला नाही. खरे पाहिले असता प्रत्येकाला रोजगार देण्याची क्षमता असलेले हे दोन्ही विषयांचे अभ्यासक्रम आहेत. येवढेच नव्हे तर या विषयांचे शिक्षण घेतलेला विद्यार्थी अनेकांना रोजगार उपलब्ध करू देण्याची क्षमता बाळगणारा असतो. परंतु अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांकडून केवळ परिक्षेचीच तयारी करून घेतली जाते. त्या विषयात पारंगत असे विद्यार्थी फारच थोडे असतात आणि तेच खरे देशाचे आशास्थान आहेत. आर्थिक विकासात ते आपल्यापरीने योगदान देत असल्यामुळेच आजवरचा आर्थिक विकास साध्य करता आला हे अभ्यासा अंती स्पष्ट होते. खरी समस्या आहे ती सर्व सामान्य विद्यार्थ्यांची अर्थ–वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमानुसार केवळ परिक्षेपुरती तयारी न करता या शिक्षणाच्या आधारे रोजगार कसा उपलब्ध होऊ शकतो हे शिकविणेही तेवढेच महत्वाचे आहे. प्रस्तुत निबंधाचा उद्देश ती दृष्टी शिक्षकांमध्ये विकसित करण्याचा असून त्यानुसार निबंधाची रचना करण्यात आली आहे.

प्रस्तुत निबंध अर्थशास्त्र, वाणिज्य, शिक्षण आणि रोजगार या चार विभागात सादर करण्यात आलेला आहे. अर्थशास्त्र या विभागात केवळ सुक्ष्म अर्थशास्त्रचा १२वी चा अभ्यासक्रम विचारात घेतला आहे. वाणिज्य विभागात देखील १२वी च्या अभ्यासक्रमावर आधारित आहे. शिक्षण विभागात हे शिक्षण कसे द्यावे याची मांडणी केली आहे. शेवटच्या रोजगार विभागात या शिक्षणाचा रोजगार मिळविण्यात कसा उपयोग होतो हा भाग स्पष्ट करण्यात आला


Scanned by CamScanner

अर्थशास्त्र :

सुक्ष्म अर्थशास्त्रात १२वी च्या अभ्यासक्रमानुसार उपयोगिता, मागणी, पुरवठा, बाजार व उत्पादन हे घटक प्रामुख्याने अभ्यासाला आहेत या सर्वांना जोडणारा किंमत निर्धारण हा भागही यातच येतो. त्यामुळे सुक्ष्म अर्थशास्त्र शिकवितांना या सर्वांचा परस्पर संबंध आणि त्याच्या अभ्यासाची आवश्यकता विद्यार्थ्यांना नीट समजने महत्वाचे आहे. उपभोगाची ओळख विद्यार्थ्यांना अनुभवातून झालेली असते परंतू उपभोग घेण्याकरीता त्या वस्तूत उपयोगिता असणे आवश्यक आहे ज्या वस्तुत उपयोगिता आहे. त्या वस्तुंचीच मागणी समाज करीत असतो हे त्यांना रोजगाराच्या दृष्टीने समजणे आवश्यक असते. केवळ उपयोगितेचा अर्थ, व्याख्या, घटत्या सिमांत उपयोगितेचा सिद्धांत, त्यामागील गृहिते, सिद्धांताचे अपवाद स्पष्ट करणे येवढाच शिकविण्याचा उद्देश या शिक्षणाचा असल्यास रोजगाराच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग होत नाही. उपयोगितेचे विविध प्रकार उदाहरणासह स्पष्ट करून त्या आधारे रोजगार कसा मिळविता येतो हे शिकविणे तेवढेच महत्वाचे आहे. केवळ स्वरूपजन्य उपयोगिता, स्थलजन्य उपयोगिता, कालजन्य उपयोगिता, सेवा उपयोगिता धारण उपयोगिता ज्ञान उपयोगिता या शब्दांचे अर्थ स्पष्ट करून प्रकारांची नावे सांगितली की प्रश्नांचे उत्तर पूर्ण होते असे समजणे चुकीचे आहे. या उपयोगीतांच्या प्रकारांचा अभ्यासकरून रोजगार प्राप्ती कशी हेते हे सोदाहरण स्पष्ट करणे आवश्यक आहे जे बहुदा केले जात नाही असे दिसून येते. ज्याप्रमाणे वस्तुच्या किंमतीवर वस्तुंची मागणी अवलंबून असते त्याचप्रमाणे ती वस्तुच्या उपयोगितेवर ही अवलंबून असते. हे एकदा नीट समजले की या ज्ञानाचा रोजगार मिळविण्याकरीता उपयोग करता येतो. तो कसा करावा हे अर्थशास्त्र शिकवित असतांना ध्यानात आणून दिल्या जात नाही. लहान वयातच ही गोष्ट समजली की रोजगार मागण्याची गरज नसते तो मिळवता येतो. वस्तुंची उपयोगिता सतत केलेल्या उपभोगामुळे घटत जाते. त्यामुळे वस्तुमध्ये कितीही उपयोगिता असली तरी तिची मागणी एकावेळी विशिष्ट प्रमाणात मर्यादितच असते हे सूत्र समजले की कोणत्या वस्तूचा, कोणत्या ठिकाणी, किती प्रमाणात व्यापार करावा, पुरवठा करावा याचा अंदाज घेता येतो व रोजगारात यश मिळते. वस्तुंची किंमत किती ठेवावी हे निश्चित करतांना या अभ्यासाचा उपयोग होतो. ग्राहकांच्या उपभोक्त्यांच्या वर्तणूकीचा अभ्यास कसा करावा याचे शास्त्र शुद्ध ज्ञान अर्थशास्त्रात प्राप्त होत असल्यामुळे त्यानुसार योग्य निर्णय घेऊन जास्तीत जास्त नफा मिळविता येतो हे सुत्र लक्षात आले की रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. सम-सीमांत उपयोगिता नियम नीट समजला तर उपभोक्त्याला अनेक वस्तूंचा उपभोग घ्यायला कसे आवडते व तो आपल्या खर्चाचे विभाजन एकाचवेळी महतम समाधान मिळण्याच्या दृष्टीने कसे करतो हे लक्षात आले की रोजगाराच्या दृष्टीने या ज्ञानाचे संधीत रूपांतर करणे शक्य असते. ते कसे करावे हे शिकविले जात नाही ते शिकविण्याची परिक्षेकरीता जरी आवश्यकता नसली तरी रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने निश्चितच आवश्यकता आहे. अशाप्रकारे केवळ उपयोगितेचा अभ्यास केला तरी रोजगाराच्या अनेक संधी समाजात उपलब्ध आहेत. त्याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधण्याची मात्र गरज आहे.

अर्थशास्त्रात मागणीचा अभ्यास केला जातो. वस्तु खरेदी करण्याची इच्छा, खर्च करण्याची तयारी या तिन्ही गोष्टी एकाचवेळी असतील तर मागणी केली जाते. याचा अभ्यास केला असता कोणत्या वस्तूची, कोणत्या भागात, किती मागणी आहे याचा अंदाज घेता येतो व यातून रोजगाराची संधी प्राप्त होते. कोणत्याही वस्तुंची किंमत

Scanned by CamScanner

कमी झाली की त्या वस्तुची सीमांत उपयोगिता किंमतीपेक्षा जास्त होते आणि ग्राहक त्यावस्तुचे अधिक मा तारण्यास प्रवृत्त होते हे एकदा नीट कळले की याचा रोजगाराच्या दृष्टीने उपयोग करून घेता येतो. त्याचवेळी लो आवडी निवडीमध्ये विशिष्ट कालावधीनंतर बदल होत असतो लोकसंख्या बदलत असते, लोकांची मिळकत असते, पर्यायी वस्तुंच्या किंमती बदलत असतात, लोकांना बाजारभावाचे संपूर्ण ज्ञान असतेच असे नाही, भविष्यातील किंमतीचा अंदाज बांधत असतात या बाबी कळल्या की रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. त्या होतात हे शिकवण्याची गरज आहे. हलक्या दर्जाच्या वस्तू मागणीच्या नियमाला कशा अपवाद आहेत हे एकदा स की अशा वस्तुंच्या व्यापारात रोजगाराची संधी शोधता येते. संयुक्त मागणी, संमिश्र मागणी व अप्रत्यक्ष मा मागणीचे प्रकार नीट समजले की या ज्ञानाचा रोजगाराच्या दृष्टीने उपयोग करून घेता येतो तो कसा कर शिकविण्याची खरी गरज आहे. मागणीत कोणत्या काळात कसा बदल होतो. याचा अभ्यास विशिष्ट काळात रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरतो. वैयक्तीक मागणी आणि बाजारातील मागणी निर्धारित करणारे कळले की त्या आधारे अभ्यास करून रोजगाराच्या संधी शोधता येतात. मागणीचा विस्तार, मागणीचा सं मागणीतील वृद्धी मागणीतील घट यांचा अभ्यास आणि त्याचा किंमतीशी असलेला संबंध याचा अभ्यासही रोजगार संधी उपलब्ध करून देतो. व्यक्तीच्या उत्पन्नातील बदलामुळे मागणीत होणारा बदल, पर्यायी वस्तूंच्या किंमती बदलानुसार मागणीत होणार बदल अभ्यासून रोजगाराची संधी प्राप्त करता येते. जीवनावश्यक वस्तू, चैनीच्या या वस्तूंची बाजारातील मागणी याच्या अभ्यासातून स्वत:चा रोजगार स्वत: शोधता येतो फक्त तो कसा हे शिक जात नाही ते शिकविण्याची गरज आहे.

अर्थशास्त्रात उत्पादनाचा अभ्यास केला जातो. उत्पादन. साठा आणि पुरवठा यांचा अभ्यास या क्षे रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे स्पष्ट करतो. कोणत्या वस्तुचे किती उत्पादन करायचे, किती साठा करा आणि पुरवठा कधी व कसा करायचा याचे ज्ञान रोजगार मिळवून देण्यास सहाय्यभूत असते. वस्तुंची किंमत अ पुरवठा व त्यांचा परस्पर संबंध नीट लक्षात आल्यास उत्पादन क्षेत्रात रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आ जीवनावश्यक वस्तू, फॅशनेबल वस्तू या सारख्या वस्तुंचे उत्पादन सहजतेने व कमी परीव्ययात(खर्चात), व भांडवलात करता येते व पुढे त्याचा विस्तार गगनाला गवसणी घालणारा असतो हे नीट लक्षात आले की रोज मिळवता येतो. बाजारपेठेचे ज्ञान केवळ पुस्तकातून होत नाही त्याकरीता प्रत्यक्ष बाजारपेठेत जाऊन शोध घ्या लागतो मात्र बाजारपेठेचे सर्वसाधारण ज्ञान अभ्यासक्रमातून सहज प्राप्त होऊ शकते. या बाजारपेठांचा अभ्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष बाजारात जाऊन केल्यास रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध असल्याचा अनुभव येतो.

अशाप्रकारे उपभोग, उत्पादन, विनीमय, वाटणी आणि राजस्व उपयोगिता, मागणी, पुरवठा, बाजार, भू श्रम, भांडवल यांच्या जोडीला संघटन व साहस विषयक ज्ञान विद्यार्थ्यांना दिल्यास, विशेषत: संघटकाचे कौश विद्यार्थ्यांच्या ठिकाणी निर्माण करण्याचे प्रयत्न केल्यास त्याचप्रमाणे तसे करण्याचे साहस अनेक उदाहरणे देऊ त्यांच्यात निर्माण केल्यास रोजगाराच्या असंख्य संधी मधून स्वत:ची आवड लक्षात घेऊन विद्यार्थी स्वत:चा रोज स्वत: मिळवू शकतो. परिक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी जेवढी महत्वाची आहे तेवढीच नव्हे त्यापेक्षा जास्त त्या

Scanned by CamScanner

त्याने कुठे व कसा रोजगार मिळवावा या दृष्टीने करून घेणे हे निश्चितच विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे.

**वाणिज्य :**

वाणिज्य हे अभ्यासक्षेत्र पूर्णपणे रोजगाराला समर्पित असे क्षेत्र आहे. पदोपदी प्रत्येक टप्प्यावर रोजगाराच्या असंख्य संधी या क्षेत्रात उपलब्ध आहेत परंतू केवळ पुस्तकी अभ्यासाने या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत नाही. अभ्यासाला प्रात्याक्षिकाची जोड असल्यास रोजगाराची गरज निश्चितपणे या अभ्यासातून भागविली जाऊ शकते. वाणिज्यात व्यापार आणि व्यापाराला सहाय्यभूत होणाऱ्या विविध सेवा यांचा समावेश होतो. आपापल्या आवडीनुसार व्यवसाय किंवा नौकरी या दोन्ही संधी वाणिज्याच्या अभ्यासकाला उपलब्ध आहेत. दुर्देवाची बाब ही आहे की वाणिज्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी स्वत: उद्यमी न होता अल्पशा पगारावर नौकरी मिळविण्याचा प्रामुख्याने प्रयत्न करतात. बाजारपेठांचे ज्ञान प्रत्यक्षात प्राप्त केल्यास कोणत्या वस्तुचा व्यापार आपण करू शकतो याची कल्पना येते परंतू बहुसंख्य विद्यार्थ्यांकडून असे प्रयत्न करण्यात येत नाही. या दृष्टीने वाणिज्याच्या अभ्यासक्रमा सोबतच त्यांना रोजगार कसा मिळवावा याचे ज्ञान देण्यात आल्यास बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकतो.

व्यक्तीच्या आणि समाजाच्या गरजा ह्या असंख्य, विविध आणि वाढत्या आहेत. जोपर्यंत या गरजा अस्तित्वात आहे तोपर्यंत रोजगाराच्या विविध संधी निर्विवादपणे उपलब्ध आहेत फक्त त्या शोधण्याची दृष्टी विकसित करता आली पाहिजे. या असंख्य आणि विविध गरजांची पूर्ती हा वाणिज्याचा आधार आहे. मानवाच्या गरजांची संख्या वाढल्यामुळे व त्यांचे स्वरूप बदलल्यामुळे एकाच व्यक्तीचे प्रयत्न त्याच्या व कुटूंबाच्या सर्व गरजा भागविण्यास अपुरे पडू लागलेत. समाजामध्ये राहणाऱ्या विविध कुटूंबांचा परस्पराशी निकटचा संबंध असल्यामुळे आपल्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तुंची निर्मिती स्वत:च करायची हा आग्रह मनुष्याने सोडला. प्रत्येक मनुष्य काही ठराविक वस्तुंचे उत्पादन पूर्वीपेक्षा मोठ्याप्रमाणावर करू लागला. जुन्या काळात शेतामध्ये सुर्योद्यापासून तो सुर्यास्तपर्यंत सतत कष्ट करणारा शेतकरी आपल्याला आवश्यक असलेले कापड विणत असे, शेतीची उपकरणे तयार करीत असे तसेच स्वत:ला आवश्यक असणारी मातीची भांडी सुद्धा तो स्वत:च तयार करीत असे. कालांतराने व्यवस्थेत बदल झाला. नवीन व्यवस्थेनुसार शेतकरी फक्त धान्य पिकवू लागला. या अवस्थेत समाजाचा घटक असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने स्वत: करीता विशिष्ट व्यवसायाची निवड केली. त्यामुळे रोजगाराचा प्रश्न आपोआप सुटल्या गेला. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. विशिष्ट शिक्षण घेणाऱ्याचा उद्देश मी शिक्षण घेतल्यामुळे मला चांगला रोजगार कुणीतरी देईल असा आहे. अशी वाट पाहण्यातच त्याच्या आयुष्याची महत्वाची वर्षे निघून जातात. शिवाय शिक्षण घेतलेले असंख्य स्पर्धक असल्यामुळे सर्वांनाच रोजगार पुरविणारी व्यवस्था अपुरी पडू लागली अशावेळी वाणिज्य शिक्षणाचा उपयोग विद्यार्थ्यांनी स्वत: स्वत:च्या आवडीचा रोजगार, वाणिज्य क्षेत्रातील विविध रोजगाराच्या संधीचा अभ्यास करून मिळविण्याची वेळ आलेली आहे, या करीता वाणिज्य शिक्षणाच्या अभ्यासकांनी सर्वप्रथम बाजारपेठेचा अभ्यास करण्याची गरज आहे. कोणती वस्तू कुठे तयार होते, ती कुठे मोठ्याप्रमाणावर विकल्या जाते, त्या वस्तुच्या किंमतीचा मागणी पुरवठ्यावर कोणता व कसा परिणाम होतो हे लक्षात

Scanned by CamScanner

घेऊन विपणनाच्या या प्रक्रीयेत आपल्याला रोजगाराची कशी व कोणती संधी आहे याचा प्रत्यक्ष बाजारपेठेत जाऊन अभ्यास केल्यास निश्चितच आपल्यालाही संधी उपलब्ध आहे असा अनुभव येतो. वाणिज्य शिक्षण या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. वाणिज्यात विविध प्रकारच्या सेवांचा समावेश होतो. त्यापैकी कोणती सेवा आपण समाजाला प्रदान करू शकतो हे ज्याला कळते त्याचा रोजगाराचा प्रश्न ताबडतोब सुटतो. वस्तूंचा व्यापार ही रोजगाराची संधी वाणिज्य विषयाच्या अभ्यासकाला उपलब्ध आहे. वाणिज्य शिक्षणामुळे वस्तु व सेवांच्या व्यापारातील सर्व लहान मोठ्या बाबींचे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे यशस्वीपणे व्यापार करून रोजागार मिळविता येतो. असंख्य वस्तुंची जगात सातत्याने निर्मिती सुरु आहे. कालबाह्य झालेल्या वस्तुंची निर्मिती थांबून त्यांची जागा नवीन वस्तु घेत आहेत. त्यामुळे प्रत्येक काळात या क्षेत्रात रोजगाराची संधी हमखास उपलब्ध आहे. केवळ आवश्यकता आहे ती विद्यार्थ्यांचे संघटन कौशल्य आणि साहसीवृत्ती यात वाढ घडवून आणण्याची वाणिज्य विषयाच्या शिक्षकांनी या दृष्टीने प्रयत्न केल्यास बेरोजगारीचा यशस्वीपणे सामना करता येतो, समाजात आजुबाजूला रोजागार मिळविणाऱ्यांचा अभ्यास केला असता अल्पशा भांडवलावर, परिश्रमाच्या आधारे आपल्या ज्ञानाचा उपयोग करून साहसाने त्यांनी व्यवसायाचे संघटन केले व त्यात यशही मिळविले असे दिसून येते. अर्थ–वाणिज्य विषयाचा विद्यार्थी तसा घडणे ही आज काळाची व समाजाची गरज आहे. रोजगार मिळत नाही बेरोजगारी वाढते आहे असे सर्वत्र ऐकायला आणि अनुभवाला येत असतांनाच दररोज अनेकांना रोजगार प्राप्त होत आहे. असे दिसून येते तो त्यांनी कसा प्राप्त केला याचा अभ्यास केला असता असे आढळून येते की यात त्यांच्या प्रयत्नांचा वाटा सर्वात जास्त आहे. त्यांनी रोजगाराचा शोध घेतला व त्यांना रोजगार मिळाला. अशी अनेक उदाहरणे आहेत. मात्र केवळ रोजगाराचा शोध घेऊनच तेथे न थांबता, त्यांनी स्वतःला त्याप्रमाणे घडवले व यशस्वी झाले.

१२वी च्या अभ्यासक्रमानुसार असलेले वाणिज्य शिक्षण विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यास निश्चितच समर्थ आहे. फक्त अभ्यासक्रमासोबतच प्रत्येक बाबीचा प्रत्यक्षिक अनुभव त्यांना देता आला तर रोजगार मिळविण्याचा दृष्टीने त्याचा निश्चितच उपयोग होऊ शकतो. वस्तूंच्या विपणन प्रक्रीयेत अनेक कामांची श्रृंखला आहे या श्रृंखलेच्या प्रत्येक कडीवर रोजगाराची संधी उपलब्ध आहे. फक्त आपल्या आवडीचे काम निवडून त्यात प्राविण्य प्राप्त करण्याची गरज आहे. विक्रीसाठी उपलब्ध असणाऱ्या सर्वच वस्तुंच्या बाबतीत खरेदी–विक्री, साठवण, वाहतूक, प्रमापीकरण, विपणी संशोधन, विपणी समाचार या प्रत्येक टप्प्यावर रोजगाराच्या संधी पूर्वीही उपलब्ध होत्या आणि आज ही उपलब्ध आहेत. स्थानिय बाजारपेठ, राष्ट्रीय बाजारपेठ, जागतिक बाजारपेठ, अल्पकालीन बाजारपेठ, दिर्घकालीन बाजारपेठ, ठोक बाजारपेठ, चिल्लर बाजारपेठ, पूर्ण बाजारपेठ, अपूर्ण बाजारपेठ, नियंत्रित बाजारपेठ या सर्व बाबींचा अभ्यास वाणिज्यात व अर्थशास्त्रात केला जातो. या बाजारपेठांची आणि त्यातील कार्याची विद्यार्थ्यांना ओळख करून दिल्यास कोणत्या बाजारपेठेत कोणते कार्य करण्याची आपली क्षमता आहे हे जाणून तो रोजगार मिळवू शकतो. जिथे बाजार पेठ येते तेथे त्याकरिता आवश्यक सेवांची आवश्यकता आहे. वाहतूक व्यवस्था, वीमा व्यवस्था, संग्रहण व्यवस्था, वित्त व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था या सर्वप्रकारच्या सेवांमधून रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. अभ्यासक्रमानुसार केवळ परिक्षेपुरताच अभ्यास घेतल्या जात असल्यामुळे स्वतःचा रोजगार स्वतः शोधण्याची क्षमताच विद्यार्थ्यांच्या ठाई निर्माण होत नाही आणि त्यामुळेच बेरोजगारीची समस्या मोठ्याप्रमाणात

Scanned by CamScanner

निर्माण झाली आहे. प्रत्येक सेवाविषयक अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांने कोणती सेवा पुरविल्यास त्याला कोणता रोजगार मिळू शकतो याची स्पष्ट कल्पना देण्यात आली तर स्वत:चा रोजगार निवडण्यास विद्यार्थी स्वत: सक्षम होऊ शकतो. मात्र याकरीता अर्थ–वाणिज्य शिक्षकांच्या संघटित प्रयत्नांची गरज आहे. यावृष्टीने अर्थ–वाणिज्याच्या शिक्षणात थोडासा बदल अपेक्षित आहे.

**शिक्षण :**

अर्थ–वाणिज्य विषयाच्या शिक्षणात रोजगार देणारे शिक्षण हे उद्दिष्ट समोर ठेवून त्यानुसार अभ्यासक्रमाची आखणी केली तर रोजगाराचा प्रश्न या विद्यार्थ्यांच्या संदर्भात निश्चित पणे सुटू शकतो. अर्थ–वाणिज्य विषयातील कोणतेही अभ्यास घटक शिकवितांना त्याच्या अभ्यासातून रोजगार कसा मिळू शकतो याचे विस्तृत विवेचन वेळोवेळी होईल असे शिक्षण देण्याची गरज आहे. उदाहरण स्वरुप वस्तु व सेवांची मागणी याचा येथे विचार करण्यात आला आहे.

**वस्तुंची व सेवांची मागणी :**

वस्तु व सेवांची मागणी या विषयाचा अभ्यास केला असता. प्राप्त ज्ञानाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो. विविध वस्तुंच्या व सेवांच्या मागणीचा अभ्यास करून त्यापैकी आपल्याला सोईची असलेली वस्तू व सेवा निवडून ती पुरविण्याचे काम केल्यास रोजगाराची उपलब्धता होते. याकरीता मागणीचा अभ्यास महत्वाचा असतो. अशी विषयाला सुरवात करून मागणीचे, मागणीच्या लवचिकतेचे ज्ञान अभ्यासक्रमानुसार दिल्यास हा अभ्यास रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे असे लक्षात येऊन अभ्यासात गोडी निर्माण होते.

वस्तु व सेवेमध्ये असलेल्या उपयोगितेमुळे वस्तु खरेदी करण्याची इच्छा होते. ती खरेदी करण्याकरीता ऐपत असल्यास व खर्च करण्याची तयारी असल्यासच मागणी निर्माण होते. मागणीचा हा अर्थ लक्षात घेऊन एखाद्या विशिष्ट भागात कोणत्या वस्तुला किती मागणी आहे याचा शोध घेतला तर कोणती वस्तु पुरविणे लाभदायक आहे याचा अंदाज येईल व ती वस्तू पुरविण्याचे काम स्विकारून रोजगार प्राप्त करता येईल.

रोजगाराकरीता ज्या वस्तुंचा पुरवठा करायचा आहे त्यावस्तुची निवड केल्यानंतर ती वस्तू कोण कोणत्या बाजारपेठेत उपलब्ध आहे. कोण–कोणत्या किंमतीला उपलब्ध आहे याचा अभ्यास केल्यास कमी किंमतीत वस्तुंची खरेदी करता येते. उधारीची सवलत कोणाकडे व किती दिवसांची मिळते याचा अभ्यास केल्यास त्यानुसार लाभदायक खरेदी करता येते. मागणीनुसार पुरवठा कसा केला असता निश्चितपणे लाभ मिळतो हे जर विषय शिकविताना विद्यार्थ्यांच्या कानावर सतत पडत गेले तर विषयाच्या अभ्यासात त्याला निश्चितपणे रूची निर्माण होते. यामुळे एकीकडे परिक्षेत तर पास होतोच होतो. आपले संघटन कौशल्य वाढविण्याचा तो प्रयत्न करतो आणि रोजगार मिळवतो.

त्याच मनुष्य निर्मीत वस्तुंना मागणी असते ज्यांच्यात उपयोगिता असते. उपयोगितेचे प्रकरण शिकवितांना उपयोगितेच्या प्रकारानुसार कसा रोजगार मिळवता येतो हे जर शिकविण्यात आले तर विद्यार्थी शिक्षण संपताच त्यादृष्टीने प्रयत्न करून रोजगार मिळवू शकतो. ज्या वस्तुंची विशिष्ट ठिकाणी उपयोगिता असते त्यावस्तू त्याठिकाणी

Scanned by CamScanner

विकल्यास लाभदायक रोजगार मिळू शकतो काही वस्तुंची विशिष्ठ काळातच उपयोगिता असते. त्याकाळापुरता हो व्यवसाय करून रोजगार प्राप्त करता येतो असे प्रत्येक प्रकाराच्या संदर्भात शिकविण्यात आले तर विद्यार्थी स्वतःच रोजगार प्राप्त करू शकतात.

उत्पादकापासून उपभोक्त्यापर्यंत वस्तू पोहचविण्याचे कार्य केल्यास मोठ्याप्रमाणावर रोजगार उपलब्ध होते हे शिक्षण त्यावस्तू प्रत्यक्षात कशा पोहचल्या जातात हे बाजारपेठेत जाऊन प्रत्यक्ष अनुभवातून घेता आले तर एखाद्या वस्तूची निवड करून ती ग्राहकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य समाजातून करणारा रोजगार अनेक वस्तुंच्या बाबतीत आजही उपलब्ध आहे.

* व्यापार व्यवसायाला सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध सेवांची केवळ विस्तृत माहिती देणारे शिक्षण आता पुरेसे नाही या सेवांचा अभ्यास करून रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने काय करणे आवश्यक आहे याचे शिक्षण ११वी १२वी स्तरावर प्रामुख्याने देण्याची गरज आहे.

* अर्थ–वाणिज्याचे शिक्षण देतांना प्राथमिक अवस्थेत कोणताही विद्यार्थी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून कसा रोजगार मिळवू शकतो याचेही ज्ञान प्रात्याक्षिकासह देण्यात आले तर रोजगाराची समस्या निश्चितपणे सोडविता येते.

* विद्यार्थ्यांजवळ श्रमाचा पुरवठा तर निश्चितपणे असतो. या श्रमाचा अर्थ–वाणिज्य शिक्षणाच्या आधारे कसा उपयोग करावा याचे शिक्षण जर या स्तरावर देण्यात आले तर रोजगाराचा प्रश्न सुटण्यास मदत मिळू शकते.

* केवळ परिक्षेची तयारी हा हेतू शिक्षणाचा कधीच नसावा परंतू आज तो तसा आहे. त्यात बदल होण्याची रोजगाराच्या दृष्टीने प्राथमिक आवश्यकता आहे. विद्यार्थ्याने हा अभ्यास केल्यास त्याला ह्या क्षेत्रात निश्चितपणे रोजगार मिळेल याची हमी शिक्षणाने द्यावयास पाहिजे.

* कोणताही रोजगार मिळविण्यास आवश्यक असलेले शिक्षण कमीत कमी ६ महिने ते जास्तीत जास्त ३ वर्ष या कालावधीत पूर्ण होऊन कालावधीपूर्ण होताच तो त्या रोजगारास पूर्ण पात्र राहिला तर रोजगाराचा प्रश्न निर्माण होणार नाही.

* दिवसातील आठ तासाचे परिश्रम त्याच्या कुटुंबाचा भार उचलेल येवढा आर्थिक मोबदला निश्चितपणे देऊ शकते मात्र याकरीता त्याला तशा प्रकारचे अर्थ–वाणिज्याचे शिक्षण देता आले पाहिजे.

* दिवसाला कमी कमी ५० रूपये मिळविनच अशी जिद्द १२वीच्या स्तरावर जर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणारे शिक्षण जर देता आले तर रोजगाराचा प्रश्न विद्यार्थी स्वत:च सोडवू शकतात.

* तास दोन तासांचे काम करून प्रत्येक विद्यार्थ्याने अर्थ–वाणिज्य शिक्षण घेतले पाहिजे असे बंधन जर घालण्यात आले व अशी कोणती कामे आहेत जी तो करू शकतो याची महिती त्याला दिल्यास पूर्ण कालीन रोजगाराची पुढे जाऊन त्याला निश्चितपणे संधी मिळते.

Scanned by CamScanner

अर्थ–वाणिज्य शिक्षणातून प्रत्येक कामाचा किती विस्तृत विकास करता येतो याचे ज्ञान मिळते त्यामुळे छोट्या स्वरूपात केलेला लहानसा व्यवसाय त्याच्या मोठ्यात मोठ्या स्वरूपापर्यंत पोहचविण्याची क्षमता विद्यार्थ्यात निर्माण करता येते.

**रोजगार :**

जगण्याकरीता प्रत्येकाला रोजगाराची आवश्यकता असते. एकाने कमवायचे आणि चौघांनी खायचे हा जमाना आता बदलला आहे. शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकाला शिक्षण पूर्ण होताच रोजगाराची गरज असते. आज रोजगाराच्या प्रतिक्षेत असलेल्या ज्यांचे शिक्षण त्यांच्या ऐवतीप्रमाणे पूर्ण झाले आहे अंशाची संख्या मोठ्याप्रमाणावर वाढली आहे. कुणीतरी आपल्याला काम देईल म्हणून त्यांची प्रतिक्षा शुरू आहे आणि विशेष म्हणजे या यादित अर्थ–वाणिज्य विषयाचे शिक्षण पूर्ण झालेले विद्यार्थीही मोठ्या संख्येत आहे. आजुबाजूच्या परिसराचा शोध घेतल्यास हि बाब स्पष्ट होते. अर्थ–वाणिज्य विषयाचे शिक्षण घेऊनही जर विद्यार्थी बेरोजगार राहत असतील तर ती काळजीची बाब ठरते. यात विद्यार्थ्यांचा दोष नाही. विषयांचे शिक्षण देत असतांना रोजगार कसा शोधावा हा भाग अभ्यासक्रमात नसल्यामुळे केवळ अज्ञानातून या विद्यार्थ्यांची बेरोजगारी दिसून येते.

वास्तविक पाहता अर्थ–वाणिज्य विषयाचा विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात रोजगार मिळवू शकतो. कांही उदाहरणे या संदर्भात उपयुक्त ठरतील.

१. अर्थ–वाणिज्य विषयाचे अभ्यासक स्वत:चे हॉस्पीटल काढू शकतात. काहींनी काढलेलेही आहे. हॉस्पीटल करीता भूमी, इमारत, उपकरणे, व्यवस्थापक, कर्मचारी, नर्सेस व डॉक्टर यांची गरज असते. अर्थात या सर्वांकरीता भांडवलाची गरज असते. अर्थ–वाणिज्यांच्या विद्यार्थ्यांना भांडवल उभारणी कशी होते, वित्त व्यवस्था कशी केली जाते, परिव्ययावर नियंत्रण कसे ठेवले जाते, व्यवसायाचे व्यवस्थापन व संघटन कसे होते, ग्राहकांची वर्तणूक कशी असते, मागणी कशी निर्माण होते या सर्वांची विस्तृत माहिती अर्थ–वाणिज्य शिक्षणातून प्राप्त होते. आवश्यकता आहे ते फक्त साहस करण्याची व संघटन कौशल्याची ते कसे करावे याचे शिक्षणही त्यांना मिळलेले असते. फक्त त्यांनी रोजगाराच्या दृष्टीने या शिक्षणाचा उपयोग कसा करावा हे शिकविणेच राहून गेल्यामुळे ते रोजगाराच्या शोधात राहतात. ते कार्य अर्थ वाणिज्य विषयाचा शिक्षक करू शकतो.

२. अर्थ–वाणिज्य विषयाचे अभ्यासक स्वत:ची कंस्ट्रक्शन कंपनी काढू शकतात. कंपनी म्हणजे काय ? ती कशी काढावी. त्याकरीता कोणकोणत्या बाबींचे संघटन करावे याची माहिती या शिक्षणातून त्यांना झालेली असते. स्वत: इंजिनीयर नसताना आपल्याला पदरी इंजिनीअर्स ठेऊन ते या क्षेत्रात उतरू शकतात मात्र नेमके हेच त्यांना शिकविले जात नाही म्हणून ते रोजगाराच्या शोधात हिंडत असतात.

३. अर्थ–वाणिज्य विषयाचे अभ्यासक हॉटेल व्यवसाय उत्तमपणे चालवू शकतात, बँका चालवू शकतात विमा कंपन्या, वाहतूक कंपन्या, चालवू शकतात, स्वत: काढू शकतात.

४. मार्केटिंग क्षेत्रात तर या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. कारण या क्षेत्रात काम करण्याचे शिक्षण त्यांना मिळालेले असते. स्वत: एखादे प्रॉडक्ट निवडून त्याचे मार्केटिंग केल्यास चांगला रोजगार उपलब्ध होतो.

Scanned by CamScanner

५. कोणत्याही वस्तुचे उत्पादन करण्यात अर्थ–वाणिज्य विषयाचा विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो कारण त्याकरिता आवश्यक असलेले त्याचे शिक्षण पूर्ण झालेले असते.

आज असे एकही क्षेत्र नाही की, ज्यात अर्थ–वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध नाही. मात्र असे आपण करू शकतो हा आत्मविश्वास शिक्षणाची उत्तम सोय असूनही विद्यार्थ्यांच्या मनात अद्याप आपण निर्माण करू शकलो नाही. या विषयांचा अभ्यास केवळ पदवी मिळविण्याकरीता केला जातो. कमी वेळात, कमी श्रमात परिक्षेची तयारी कशी करावी याचेच शिक्षण दिल्या जात असल्यामुळे विद्यार्थ्यांची स्वतंत्र विचार शक्ती प्राप्त होत नाही आणि त्यामुळेच रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे.

यावर हाच उपाय आहे की या विषयाच्या विद्यार्थ्यांच्या मनात ११वी पासूनच असे बिंबवणे की या विषयाचा अभ्यास करून मिळविलेले ज्ञान इतरांकरीता रोजगाराच्या संधी निर्माण करण्याकरीता तुम्हाला वापरावयाचे आहे. यातून तुम्हाला तर रोजगार मिळेलच इतरांनाही तुम्ही रोजगार देऊ शकाल. या दृष्टीने या विषयाचा अभ्यास करण्याची गरज आहे. छोट्याशा कार्यापासून सुरवात केल्यास पुढे त्याचा विस्तार जगाच्या बाजारपेठेपर्यंत वाढवित नेता येते. देशाच्या आर्थिक विकासाची जबाबदारी अर्थ–वाणिज्य विषयाच्या विद्यार्थ्यांवर असते. देशात जर गरीबी असेल, बेरोजगारी असेल तर त्याला अर्थ–वाणिज्य विषयाचा विद्यार्थीच अंतिमत:जबाबदार असतो. त्याने आपली जबाबदारी नीट पार पाडलेली नसते. इतरांना रोजगार देण्याची क्षमता असूनही तो स्वत: रोजगाराच्या शोधात भटकत राहतो ही लाजीरवाणी परिस्थिती आहे. ती तुम्ही बदलवा. केवळ परिक्षेकरीता अभ्यास करणे योग्य नाही. त्यामुळे तुम्हाला रोजगार मिळण्याची शक्यता फारच कमी आहे. प्रत्येक विषयाचा नीट समजून अभ्यास केल्यास संपूर्ण समाजाला रोजगार पुरविण्याचे सामर्थ्य तुमच्या ठाई निर्माण होऊ शकते.

अशाप्रकारे अर्थ–वाणिज्य शिक्षणाचा रोजगाराशी सर्वात जवळचा संबंध आहे. या विषयाचा रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यात आला व प्रत्यक्षात त्याचा रोजगार निर्मितीत उपयोग केल्या गेला तर रोजगाराचा प्रश्न निश्चितपणे सुटू शकतो. मात्र यात अर्थ–वाणिज्य शिक्षकांनी अशी दृष्टी निर्माण करण्यात आपले योगदान देणे तेवढेच महत्वाचे आहे.

संदर्भ : १. वाणिज्य कार्यपद्धती आणि कार्यालय व्यवस्थापन खरे/उखळकर, विद्याप्रकाशन, १९९८

२. व्यावसायिक अर्थशास्त्र–मुकुंद महाजन, श्री. वा. पंडित, व्हीनस प्रकाशन, १९६३

३. व्यवसाय व्यवस्थापन आणि प्रशासन–डॉ. राजीव आष्टीकर / डॉ. संजय कप्तान, साईनाथ प्रकाशन १९९४

४. कंपनी सचिवाची कार्यपद्धती–प्राचार्य उखळकर, विद्याप्रकाशन, १९९८

Scanned by CamScanner



# ''भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष कराची भुमिका''

प्रा. अशोक चेट्रूले
शिव आदिवासी क.म. गराडा

भारतीय करप्रणाली व तिची रचना जागतीक किरणानंतरच्या प्रवासात विविध कारणांनी शिथील करण्यात आलेली दिसते. त्याचा परिणाम राजस्वीय प्राप्ती पर झालेला दिसतो. या संदर्भात आयात, निर्यात कराचा व आकारण्यात येणाऱ्या शुल्काचा विचार केल्यास त्यात प्रती वर्षी घट झालेली दिसून येते. काही वस्तू ज्या निर्यात वाढीला प्रोत्साहीत करण्यात साह्यभूत ठरणाऱ्या आहेत अशा आयात करण्यात येणाऱ्या वस्तूवरील आयात कर शुन्यापर्यंत कमी करण्यात यावा अशी ही मागणी केली जात आहे. सिंगापूर येथे आयात शुल्क शून्य आहे. परिणामत: विदेशी कंपन्यानी मोठ्या प्रमाणावर सिंगापूर ची बाजारपेठ हस्तगत केली आहे. आयात शुल्कामुळे सिंगपूरचे जे नुकसान झाले ते त्यांनी बाजारपैठेतील माध्यमातून कितीतरी अधिक प्रमाणात विदेशी मुद्रा राजस्वाच्या स्वरूपात प्राप्त केल्या त्यामुळे सिंगापूरचे आर्थिक नुकसान होण्याऐवजी त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. अर्थातच भारतात असे करणे शक्य नाही तरी जवळपास ८०० पेक्षाही अधिक वस्तुवरील मात्रात्मक नियंत्रण हटविण्यात आली आहे. दैनदीन आंतरराष्ट्रीय व्यापारातील कर रचना शिथील होत आहे.

देशातील कर रचना कशी असावी या संदर्भात कर निर्धारिण करण्यासाठी जी. तत्त्वे सांगीतलेली आहे त्याच तत्त्वाचा वापर करण्यात येतो परंतू कधी कधी तत्त्वे व देशातील स्थिती यांचा विचार करून कर संरचना निश्चित केली जाते. अर्थातच भारतासारख्या विकसनशिल देशात ज्याठिकाणी विषमता व गरिबी अजूनही मूलभूत प्रश्न आहे अशा स्थितीत उत्पन्नातील वाढीनुसार कराच्या दरातही वाढ केली जाते. अर्थातच जागतिकीकरणानंतर आयकरातून सुट देण्याची सीमा तिप्पट इतकी वाढविण्यात आली आहे. परंतू मागील अनेक वर्षापासून निगम करात घट करावी अशी ओरड कंपन्यानी चालविली असली तरी निगम करात पाहिजे तो बदल करण्यात आलेला नाही. याचा सरळ परिणाम औद्योगीक गुंतवणूक व औद्योगिक उत्पादन व पर्यायाने संघटीत क्षेत्रातील रोजगारावर व झालेला नाही असे दिसून येते. या शिवाय अन्य विकसनशील राष्ट्रातील दर उदा. इंडोनेशिया, मलेशीया तायवान येथील दर ४०% कमी आहे. याचा सरळ प्रभाव गुंतवणूकीवर येत असतांना दिसतो. म्हणजेच कर रचनेतील अन्य विचलनामुळे त्याचा परिणाम अर्थव्यस्थेतील विविध क्षेत्रावर होतो. यावरून कर रचनेचा पाया व कर रचनेची अंतर्गत व बाह्यगत व्यवस्था याचा देखील विचार तेवढाच महत्वाचा असलेला दिसून येतो. भारतात कर रचना कशी असावी व त्याचे विभाजन कसे

Scanned by CamScanner

असावे या संदर्भात घटनात्मक तरतूदीनुसार कराव विभाजन हे मध्यवर्ती किंवा केंद्रसरकार व राज्यसरकार यांचे अंतर्गत वितरतीत व्हावे असे निर्देशीत केलेले आहे. या शिवाय भारतीय घटनेनुसार केंद्राने गोळा केलेल्या उत्पन्नातील वाटा राज्याना कसा आणी किती वितरीत करावा यासंबंधी दर पाच वर्षांनी वित्तीय आयोगाची स्थापना केली जाते व आयोगाने केलेल्या शिफारसी प्रमाणे राज्यांना त्यांचा वाटा दिल जातो. अशा प्रकारची वित्तीय संरचनेतील यंत्रणा राजस्वीय वितरणासाठी वापरली जाते. अशारीतीने कर हे राज्याने व केंद्रांने गोळा करावे व शिवाय केंद्राने गोळा केलेले कर राज्यांना वितरीत करावे अशी वित्तीय वितरणाची व्यवस्था आपल्या देशात स्थित आहे. संघीय वित्ताच्या अंतर्गत उत्पन्नाच्या साधानाचे योग्य वितरण व सांमजस्य स्थापन करण्यासाठी स्वतंत्रता, पर्याप्तता व एकरूपता ह्या तत्वाचा आधार घेतल्या जातो. स्वतंत्रता तत्वानुसार असे म्हणता येईल की प्रत्येक सरकारला उपलब्ध करून दिलेली उत्पन्नाची साधने स्वतंत्र असली पाहिजे व कर लावण्याबाबत, व्यय करण्याबाबत व ऋण घेण्याबाबत पूर्ण अधिकार असले पाहिजे संविधानाच्या अंतर्गत केन्द्र व राज्य सरकारांच्या दरम्यान उत्पन्न प्राप्त करणाऱ्या साधनाचे झालेले विभाजन प्रशासकीय दृष्टीने योग्य आहे. उत्पादन कर, आयात निर्यात कर, उत्तपन्न कर, व राज्य सरकार द्वारे विक्री कर, शेतसारा, करमणूक कर, आदी निर्धारित करून वसूल करण्याची राज्यावरील जबाबदारी योग्य वाटते.

केन्द्र सरकार व राज्य सरकारांना कर आणि करेत्तर अशा दोन साधनांच्या द्वारे उत्पन्न प्राप्त होते. या दोन उत्पन्न प्राप्त करण्यासह साधनात कर हे अत्यंत महत्वाचे साधन समजल्या जाते. इस १९५०–५१ मध्ये केन्द्र सरकारच्या एकून उत्पन्नात करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा ९०% होता. १९७३–७४ मध्ये तो ७८% इतका झाला व अलिकडेही तो ७०% कमी झालेला दिसून येतो. देशातील सर्व प्रकारचे प्रत्यक्ष कर हे केंद्र सरकार द्वारा लावल्या जाते व अप्रत्यक्ष कर मात्र राज्यसरकार द्वारे गोळा केले जाते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराच्या संदर्भात घटनेअंतर्गत जे विभाजन सांगितल्या गेले आहे किंवा जे कर निश्चित करीत असतांना ते निश्चित करण्याबाबत असलेली तत्वे अंमलात आणूनच या दोन्ही करांच्या संदर्भात स्पष्ट असे विभाजन झालेले दिसून येते. म्हणून भारतीय कर रचना व कर वसूलीची पद्धत यामध्ये सुसंगतता व सुनियोगीतता निर्माण व्हावी याकरीता प्रयत्न करण्यात येत आहे. आणि म्हणून याच आधारवर केन्द्र सरकार द्वारे राज्यांना देण्यात येणारा वाटा हा वित्त आयोगाने ठरवून दिलेल्या तत्वानुसार व अंदाजपत्रकीय धोरणातील तरतुदीनुसार अग्रीम व हस्तांतरणे याचा देखील राज्याचा वाटा ठरविता असतांना विचार केला जातो. थोडक्यात राज्य व केन्द्र यांच्या अंतर्गत वित्तीय वाट्यातील रचना विशेष सवलती अनुदाने व साहय्यक अनुदाने या सर्व बाबींचा विचार एकूणच त्या राज्यातील असलेल्या विशेष स्थितीनुसार निश्चित होत असते व कठीण प्रसंगी त्वरीत केन्द्र सरकार द्वारे वित्ताचे विना विलंब वितरण केले जाते. केन्द्र सरकार द्वारे प्रत्यक्ष कराच्या स्वरूपात गोळा करण्यात येत असलेल्या कराच्या बाबतील विश्लेषण पूढील प्रमाणे केले आहे.

**१. उत्पन्न कर :** भारतामध्ये उत्पन्न कर लावण्याची प्रणाली १८६० सालानंतर सुरू करण्यात आली व नंतर १८६५ मध्ये ते बंद देखील करण्यात आले. १८८६ नंतर कायम स्वरूपात उत्पन्नावरील आयकर लावण्यात येऊ लागले असे असले तरी भारतामध्ये आयकर कायदा १९६१ साली अमलांत आला. केंद्रसरकार द्वारे उत्पन्नाला कर लावण्यात येत असले तरी सर्वांच्या उत्पन्नावर तो कर लावल्या जात नाही तर कर लावण्याकरीता एका विशिष्ट प्रकारची राशी निश्चित करूनच त्यानंतर त्यावर कर आकारण्यात येतो. उदा. आज मितीत ही मर्यादा विविध

Scanned by CamScanner

लोकाकरीता भिन्न भिन्न आहे. जेष्ठ नागरीक, स्त्रिया व किमान उत्पन्न या तिन प्रकारात उत्पन्न मर्यादा लक्षात घेऊन कराची आकारणी केली जाते. उत्पन्न कर मर्यादा ही एक लाख पन्नास हजार इतकी आहे. उत्पन्नावरील कर व त्यापासून मिळणारी रक्कम ही जरी भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने कमी असली तरी तिचा वाटा मात्र राज्यांना वितरण करण्यात होतो. वैयक्तिक उत्पन्न करापासून मिळणारे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रतिवर्ष अंदाज पत्रकामध्ये विविध प्रकारच्या तरतूदी व योजना राबविल्या जातात ज्यामुळे जास्तीजास्त लोक आपल्या उत्पन्नावरील कर देण्यात समोर येतील या करीता आयकर देण्याची कार्यालयाने औपचारीकता सामान्य करणे गरजेचे आहे. ज्यामुळे उत्पन्नावर कर देत असतांना करदात्यांना ते त्रासदायक होणार नाही. २००६-०७ मध्ये आयकरापासूनची प्राप्ती ही ७७,४०९ कोटी रूपये इतकी होती.

**आयकरावरील अधिभार :** आय वर कर निर्धारीत झाल्यावर अतिरिक्त होणाऱ्या उत्पन्नावर अधिभार लावल्या जातो. शिक्षणाचा खर्च पूरेसा व्हावा म्हणून शिक्षण अधिभार म्हणून ३/- कर करदेय उत्पन्नावर आकारण्यात येतो.

आयकरात बचतीला प्रोत्साहन देण्याबाबत कोणतीही विशेष व्यवस्था नाही आयकरात दिलेल्या वजावटी फार किरकोळ स्वरूपाच्या आहेत. अनेक वेळा आय-कर योग्य वेळी भरला जात नाही. कर संग्रहणाचे कार्य वेगाने वाढल्या पाहिजे आयकराच्या बाबतीत न्यायालयीन कारवाई अत्यंत तत्पर असली पाहीजे. या करीता याही कायद्यामध्ये दूरस्त होणे गरजेचे आहे. आज मितीस हजारो खटले न्यायालयीन प्रकरणे म्हणून न्याय प्रविष्ट आहे.

**निगम कर :** हा कर कंपनी किंवा प्रमंडळावर लावण्यात येतो कंपन्याना दरवर्षी जो नफा होतो त्या नफ्यावर कर आकारण्यात येतो. निगम कर अन्य कर एकत्रीत करून १९६५ मध्ये निगम कर आकारण्यात सुरूवात झाली. निगम करामध्ये देण्यात येणाऱ्या लाभांश करावरील समावेश व करावरील अतिरिक्त भार या दोन्ही करांची राशी मिळून निगम कर देण्यात येतो ( Corporation Tax = Divident Tax + Service Tax = निव्वळ उत्पन्न ) कंपन्याना या करातून व्यवसायाकरीता आलेला खर्च व अवमूल्यन यांची राशी वगळता होणाऱ्या एकूण निव्वळ नफ्यातून वरील प्रमाणे कर आकारण्यात येतो. २००६-०७ पर्यन्त कंपन्यापासून प्राप्त होणारा एकूण निगम कर हा १,३३,०१० करार रूपये इतका होता.

१९५०-५१ मध्ये या करा पासून एकूण प्राप्ती ही ४० कोटी रूपये इतकी होती. १९५०-५१ च्या तूलनेत निगमकरातील वाढ २२०० टक्केपेक्षा जास्त असली तरी १९५०-५१ च्या तुलनेत कंपन्यात झालेली वाढ ही त्याहीपेक्षा जास्त आहे. कंपन्यातील ही वाढ जवळपास ५०००टक्के पेक्षा जास्त आहे. तूलनेत केंद्रसरकारचा प्राप्त होणारा निगम कर दरवर्षी वाढत असला तरी तो कमी आहे. कंपन्याचे कर बुडवेपणाचे धोरण असल्यामुळे निगम कर पाहिजे ज्या प्रमाणात प्राप्त होत नाही. वर्तमान स्थितीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून प्रत्येक प्रमंडळाचे दैनंदिन व्यवहार, निर्माण कार्याचे व्यवहार, लघुउद्योगातील व्यवसाय, यांचा प्रत्यक्ष संबंध संगणकाद्वारे वित्त मंत्रालयाशी स्थापीत करण्यात आला आहे. काही प्रमाणात कर बुडवे पणाला यामुळे आळा बसला आहे.

**मालमत्ता कर :** मालमत्ता हा कर मालमत्ता धारण करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्युमुळे व अन्न कारणामुळे हस्तांतरीत झाल्यावर लावण्यात येतो शेतीयोग्य जमीन काढून अन्य मालमत्तेच्या हस्तांतरणारवर हा कर लावला जातो. ह्या करापासून प्राप्त होणारे उत्पन्नं राज्यामध्ये वाटले जाते. ह्या कराची आकारणी सर्व प्रथम १९५३ मध्ये करण्यात

Scanned by CamScanner

आले. परंतू भारतामध्ये मालमत्ता कर हा पूर्णपणे अपयशस्वी ठरला आहे. या करापासून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाची रक्कम लक्षात होता हा कर बंद करण्यात यावा अशा प्रकारची मागणी करण्यात आली. त्यामुळे विश्वनाथ प्रताप सिंह हे वित्तमंत्री असताना त्यानी १९८५ मध्ये हा कर बंद केला.

कारण या करापासून प्राप्त होणारी एकूण निव्वळ आय ही २० कोटी रूपये इतकी होती तर यावर होणारा एकूण खर्च हा या रकमेपेक्षा कितीतरी जास्त होता. म्हणजेच खर्च अधिक व प्राप्ती कमी अशी स्थिती मालमत्ता कराच्या बाबतीतील होती.

**भांडवली लाभ कर :** द्वितीय महायुद्धाचे काळात अनेक व्यक्तीनी भांडवलावर लाभ प्राप्त केले होते. परिणामतः इ.स. १९४७-४८ मध्ये प्रथमच भांडवली लाभावर कर बसविण्यात आला होता. त्यानंतर मात्र तीन वर्षाच्या कालावधीनंतर हा कर रद्द करण्यात आला. प्रा. काल्कोर यांनी सूचीत केल्याप्रमाणे १९५६ मध्ये पून्हा भांडवली कर आकारण्यास सुरूवात झाली. अधिक किंमतीतील भांडवली संपत्ती विकून जी कर मिळकत प्राप्त होते. त्या एकूण मिळकतीवर हा कर आकारण्यात येतो. सर्व प्रकारच्या विक्री करण्यात आलेल्या संपत्तीच्या अतिरिक्त मिळकतीतून जी प्राप्ती होते त्यावर कर देणे म्हणजे भांडवली वस्तूच्या विक्रीवरील लाभ कर होय.

भांडवली लाभ कर हा कर पद्धतीचा अविभाज्य घटक आहे. भारतात तिसऱ्या पंचवार्षिक योजनेनंतर किमंती वेगाने वाढत आहे. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत किमंतीत वाढ झाल्याने जर व्यक्तीला भांडवली लाभ झाला तर ह्या लाभावर कर आकारणे न्यायोचीत ठरेल. ह्या करापासून १९९० नंतर मात्र वाढ झालेली दिसून येते.

**व्यय कर :** प्रा. काल्डोर यांनी केलेल्या शिफारसीनुसार भारतात १९५८ मध्ये, प्रथम हा कर बसविण्यात आला. काल्डोरांच्या मते उत्पन्नापेक्षा व्यय हा व्यक्तीच्या करदेय सामर्थ्याचा अधिक चांगला आधार आहे. तसेच उत्पन्न कराप्रमाणे व्यय कर बचतीला निरूत्साही करत नाही. एकिकृत कर योजनेच्या अंतर्गत हा कर लावण्यात येतो. व्यक्तीचा किंवा अविभाजीत हिंदू कुटूंबाचा वार्षिक व्यय ३६००० रूपयापेक्षा जास्त असेल तर त्यावर व्ययकर बसविण्यात येतो उत्पन्नकरा पेक्षा व्यय कर हा अधिक योग्य व चांगला असतो याचे समर्थन परंपरावाद्यानी देखील केलेले दिसते ज्यामध्ये जे.एस. मिल, डॉ. मार्शल, पिगू व फिशर यांचा समावेश होतो. २००१-०२ पर्यंत व्ययकराच्या अंतर्गत केन्द्र सरकारला २५० करोर रूपये प्राप्त झाले होते.

**देणगीकर :** १९५८ मध्ये हा कर लावण्यात आला होता. हा कर संपत्ती कर व मालमत्ता करास पूरक आहे व्ययकर, संपत्तीकर व मालमत्ता कर बुडविण्याची शक्यता नष्ट करण्यासाठी देणगीकर लावणे आवश्यक ठरते. प्रत्येक आर्थिक वर्षात देणगीकर अशा देणगीवर लावल्या जातो की, जी गेल्या वर्षी दिलेल्या देणगीपेक्षा दहा हजार रूपयांनी जास्त आहे. १९६०-६१ मध्ये देणगीकरापासून प्राप्त होणारे उत्पन्न ०.८५ कोटी रूपये इतके होते तर २०००-०१ मध्ये हे उत्पन्न १.०० कोटी इतके झाले.

प्रा. काल्डोर यांनी देणगी कर मालमत्ता कराऐवजी सुरू करण्याची शिफारस केली होती. तसेच देणगी प्राप्त करणाऱ्यावर देखील कर बसविण्यात याचा अशी शिफारस केली होती. भारत सरकारने मालमत्ता कर तसाच ठेवून केवळ व्यक्तीद्वारा दिल्या जाणाऱ्या देणगीवर कर बसविला. कोल्डोर यांनी जी एकीकृत कर योजना सूचविली होती

Scanned by CamScanner

तिला अनुसरून देणगी कर लावल्या गेला नाही.

सारांश : वरिल प्रमाणे प्रत्यक्ष कर रचना भारतात अमलांत आणल्या जात आहे. वरिल सूचविलेल्या व्यतिरिक्त आणखी काही प्रत्यक्ष कराची पदे आहे. ज्यामुळे सरकारला त्यापासून प्रत्यक्ष कर प्राप्त होते ज्याचा उल्लेख करणे या ठिकाणी शक्य झाले नाही. केंद्र सरकारच्या कार्याचा विस्तार वाढत चालल्याने ती कार्ये पार पाडण्यासाठी अधिक उत्पन्नाची केन्द्राला आवश्यकता अत्यंत आहे. परिणामत: करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होत आहे. करापासून मिळणारे उत्पन्न वाढवितांना अप्रत्यक्ष करावर केन्द्र अधिक विसंबून राहात आहे. त्यामुळे निम्न व मध्यम स्तरातील व्यक्तीवर करभार सारखा वाढत असल्याचे दिसून येते. कोणत्याही देशात करविषयक धोरणाने सरकारी नीतीच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यास सहकार्य दिले पाहिजे. भारता सारख्या विकसनशिल देशात सरकारला करांच्या द्वारे मिळणारे उत्पन्न पून्हा अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी उपयोगात आणल्या जाते. करांच्या द्वारा देशातील साधन संपत्ती अनुत्पादक उपयोगापासून परावृत्त करून उत्पादक उपयोगात वापरली गेली पाहिजे. तसेच भारताच्या करपद्धतीच्या द्वारा आर्थिक उद्दिष्ट बरोबर सामाजीक उद्दिष्टेही पूर्ण केली पाहिजेत.

वर्तमान स्थितीत केन्द्र व राज्य यांची राजकोषीय व महसूली तुट पूर्णत: कमी करण्याचे ठरविण्यात आले आहे. २००१ पर्यन्त महसूली उत्पन्नातील तुट शुन्य करण्याकरीता प्रयत्न करण्यात येणार आहे. या करीता सरकार 'राजकोषीय दायीत्व व अंदाजत्रकीय व्यवस्थापण कायदा संमत करण्यात आला आहे. परंतू अर्थव्यवस्थेत अचानक निर्माण झालेल्या घसरणीमुळे यावर्षीही महसूली तुट शुन्य होणे शक्य नाही. या करीता सरकारच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे अतिश महत्वाचे आहे.

भारतातील कर प्रणाली ही प्रत्यक्ष करप्रणाली असो अप्रत्यक्ष करप्रणाली असो ही अधिक गुंतागुतीची व सामान्यांना न समजणारी आहे. त्यामुळे ग्रामीणभागातील एकूण लोकसंख्ये पैकी काही लोक श्रीमंत असले तरी त्यापैकी कूणीही आयकर भरत नाही. ग्रामीण भागातून आयकर भरणाऱ्यांचे प्रमाण जवळपास नगन्य आहे. अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर यांचे महत्व सारखेच असले तरी सरकारी गुंतवणूकीत वाढ करण्यासाठी व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी अर्थव्यवस्थेतील प्रत्यक्ष कराचे महत्व व त्याची भूमीका ही नेहमीच निर्णायक ठरणारी असेल. प्रत्यक्ष करा अंतर्गत अधिक लोकांचा सहभाग व्हावा या करीता सरकार द्वारे विविध प्रयत्न करून आपल्या उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न करीत आहे.

Scanned by CamScanner



# प्रत्यक्ष कराचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्व व भूमिका

**प्रा. डॉ. माधुरी प्रदीप लेले**
श्री. बिंझाणी नगर महा. नागपूर.

फार प्राचीन काळापासून कर हे सरकारचे उत्पन्न मिळविण्याचे एक प्रमुख साधन आहे. सामाजिक हितो कार्य करण्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न कराच्या रुपाने समाजाकडून वसुल केले जाते. ते केले जात असतांना 'न्याय व समानतेचे तत्व' सर्वात महत्वाचे मानावे असे प्रा. ॲडम स्मिथ चे प्रतिपादन आहे. प्राचीन भारतीय अर्थतज्ञ कौटिल्याच्या मते राजाने सूर्याची भूमिका पार पाडणे अत्यंत गरजेचे आहे. सूर्य ज्या प्रमाणे ज्या ठिकाणी पाण्याचा भरपूर साठा आहे उदा. सागर तेथुन बाष्परुपाने पाणी शोषून घेतो. नंतर पावसाच्या रुपाने संपुर्ण धरतीला तृप्त करतो याच तत्वानूसार श्रीमंत व्यक्तिकडून कररुपाने पैसा गोळा करुन संपूर्ण देशाच्या आर्थिक विकासासाठी, सामाजिक हितासाठी, समाजोपयोगी सेवांसाठी, संरक्षणासाठी तो पैसा खर्च करावा.

प्रत्येक देशातील सरकारचे कर आकारणीविषयी विशिष्ट स्वरुपाचे धोरण असते. हे करधोरण किंवा करनीती ठरवितांना (१) सरकारी उत्पन्नात वाढ करणे (२) रोजगारात वाढ करणे (३) आर्थिक स्थैर्य निर्माण करणे (४) आर्थिक विषमतेला आळा घालणे आणि (५) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, ही प्रमुख उद्दीष्टे असतात याच उद्दीष्टांना अनुसरुन करसंचरना केली जाते. केंद्र व राज्य सरकारमधील करवितरणातील भागीदारी निश्चित केली जाते. तसेच करांचे विविध प्रकार व स्वरुप देखील ठरविले जाते.

भारतात वर्तमानकालीन करधोरणात दोन प्रकारचे कर प्रामुख्याने सरकार तर्फे गोळा करण्यात येतात प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर ज्या व्यक्तीवर कराचा भरणा करण्याची कायदेशीर जबाबदारी असते त्याच व्यक्तिवर कराचा अंतिम भार पडत असेल तर त्या कराला 'प्रत्यक्ष कर' असे म्हणतात.

प्रत्यक्ष करांमुळे अर्थशास्त्राचे जनक प्रा. ॲडम स्मिथ यांनी सांगितलेले ' न्यायाचे व समानतेचे तत्व 'चे पालन होते. आर्थिक विषमतेमध्ये घट होण्यास मदत होते. तसेच प्रत्येक करदात्याला आपल्या करभाराबद्दल निश्चित स्वरुपाची माहिती असते. वैयक्तीक प्रत्यक्ष कर उदा. आयकर, निगम कर (कंपन्यांच्या नफ्यावर लागणारा) देणगी कर इ. प्रत्यक्ष कराची उदाहरणे आहेत.

करनीतीमध्ये वेळोवेळी सरकारच्या ध्येयधोरणानुसार आणि गरजेनुसार बदल होणे अनिवार्य आहे त्यास्वरुपाची लवचिकता प्रत्येक देशाच्या करप्रणालीत अपेक्षित असते. भारतीय करप्रणालीत देखील स्वातंत्र्यापासून

Scanned by CamScanner

तर आजपर्यंत वेळोवेळी अनेकदा बदल करण्यात आले. आयकरात तर हे बदल फारच अधिकदा करण्यात येतात. कायद्याच्या गरजेनुरुप हे बदल केले जातात.

१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये फार मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण होवून अर्थव्यवस्था विस्कळीत होण्याच्या मार्गावर होती. तेव्हा बिघडलेली आर्थिक घडी सुधारुन जलदगतीने आर्थिक विकास साध्य करण्याच्या हेतूने भारत सरकारने १९९१ ला नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. याच काळात सरकारच्या असे लक्षात आले की या अस्थिरतेला काही प्रमाणात कारणीभूत आहे ती म्हणजे भारतीय करव्यवस्था म्हणून १९९१ मध्येच भारत सरकारने डॉ. राजा चेलिया यांच्या अध्यक्षतेखाली कर सुधारणा समितीचे गठन केले. कर पध्दतीमधील दोष कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविण्यासाठी या समितीची स्थापना झाली. या समितीने सुचविलेल्या शिफारशींची अमल बजावणी देखील करण्यास सुरूवात केली.

**डॉ. चेलिया समितीच्या शिफारशी :**

कोणत्याही देशाच्या दूरदृष्टी असणाऱ्या राजकोषीय व्यवस्थापनासाठी संतुलित कररचनेची गरज असते. माफक दर, कमी कर सवलत आणि विस्तीर्ण कर आधार या वर आधारित किंवा व्यापक अर्थाने कररचना ही समन्यायी तसेच कार्यक्षम असली पाहीजे.

समन्यायी म्हणजे कोणत्याही करदात्यावर अन्याय न करणारी किंबहुना ज्याच्या त्याच्या कर देय क्षमतेनुसार कर आकारणी असली पाहिजे. तर कार्यक्षम म्हणजे करदात्यांच्या उपभोग, बचत, आवडनिवड, उत्पादनासाठी लागणाऱ्या आदानांच्या निवडी आणि विशेष म्हणजे सरकारच्या महसूली मिळकतीवर कुठलाही अनिष्ट परिणाम न करणारी असली पाहिजे. त्यासाठी या समितीने पुढील शिफारशी सुचविलेल्या आहेत.

१) अस्तित्वात असलेले कराचे अनेक दर रद्द करुन करदात्यांना पेलवेल एवढे माफक असे कर दर आकारण्यात यावेत.

२) कर दात्यांची संख्या आणि कर योग्य उत्पन्न वाढवून कराचा आधार वाढविण्यात यावा.

३) कर कायद्यातील क्लिष्टता टाळून कर पध्दती सोपी करावी शिवाय करदर स्थिर राहतील असा प्रयत्न करावा.

४) अनेक प्रत्यक्ष करांऐवजी सर्वसमावेशक असा एकच केंद्रीय वर्धित मूल्य कर असावा टप्याटप्याने तो मूल्यवर्धित मूल्य करात रूपांतरीत करावा.

५) सेवा कर, कर्मचारी सवलत कर, अनुमानावर आधारित कर आकारण्यात यावेत.

६) कर प्रशासनात पारदर्शकता, कर लवचिकता, कर हे समन्यायी आणि कार्यक्षम होतील असे प्रयत्न करावेत.

डॉ. चेलिया समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी वरील सुचविलेल्या शिफारशींची भारत सरकारने अंमलबजावणी १९९१ पासून करण्याचे ठरवून करपध्दती संतुलित करण्याचे सतत प्रयत्न केले.

(१) **करांच्या दरात घट** – प्राप्ती कर, निगम कर या प्रत्यक्ष करांसोबतच सीमा शुल्क व उत्पादन शुल्काच्या करांच्या दरात घट करण्यात आली. प्राप्तीकराची कमाल मर्यादा दर ३०% पर्यंत घटविण्यात आला, दर कमी केल्याने कर महसूलात वाढ होईल ही अपेक्षा होती.

(२) **व्याज कर** – १९९१ पासूनच हा नवीन प्रत्यक्ष कर आकरण्यास सुरूवात झाली. मुदती ठेवी आणि म्युच्युअल

Scanned by CamScanner

फंडावर प्राप्त व्याजावर कर आकारण्यात येऊ लागला.

**(३) अनुमानाधारित कर** – १९९२–९३ पासून हा नविन कर भारतीय कर प्रणालीत समाविष्ट झाला. कर या किंवा त्यापेक्षा

अधिक उत्पन्न मिळवून देखील छोटे व्यापारी, व्यावसायीक यांच्यावर कर आकारणे कठीण असल्याने मोठ्या प्रमाणात महसुली हानी होत होती. त्यासाठी ज्यांची वार्षिक उलाढाल ३५००० रु. ते ५ लाख रु. आहे अशांनी नोंद करून केवळ १,४०० रु. वार्षिक कर भरावा अशी व्यवस्था करण्यात आली नंतर ही मर्यादा ३७००० रु. पर्यंत वाढविली व देशाच्या ३५ शहरासाठी हा कर लागू झाला.

**(४) किमान पर्यायीकर** – पुर्वीच्या करप्रणाली देऊ केलेल्या कर सवलती, कर सूट आणि कर वजावटी इ. फायदा घेऊन नफ्यात चालणारी प्रमंडळे कर टाळीत होते. त्यांना ' शुन्य कर कंपन्या ' म्हणून ओळखले जात होते. अशा कंपन्यांना वार्षिक ३० % पुस्तकी मुल्यातील नफ्यावर किमान १०% पर्यायी कर आकारणे १९९७–९८ पासून सुरू केले नंतर हा दर १२% पर्यंत वाढविला.

**(५) रोखे खरेदी विक्री व्यवहार कर** – २००४–०५ यां वर्षापासून भाग बाजारात होणाऱ्या रोख्यांच्या उलाढालीवर .०१ ते .०१५ टक्यापर्यंत कर आकारण्यात येतो.

**(६) कर्मचारी सवलत कर** – बऱ्याच कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना वेतना व्यतिरिक्त अनेकविध सवलती देतात. उदा. घर, प्रवास, आरोग्यविमा त्या सवलतीचे बाजारातील मुल्य जास्त असुनही त्यावर कर आकारला जात नसे. एप्रिल २००६ पासून या सवलतींच्या एकूण मुल्यावर ३०% कर कंपनीने भरावा असा निर्णय देण्यात आला, यालाच कर्मचारी सवलत कर असे म्हणतात.

**(७) बँकेतून रोख रक्कम काढण्यावर कर** – हा कर २००५–०६ पासून लागू करण्यात आला. या कराचा उद्देश महसुल वाढविणे हा नसुन काळा पैसा उघडकीस आणणे हा होता. परंतु यावर अनेक उहापोह झाला. प्रथम २५,००० रू. वर ०.१ टक्का, नंतर ५०,००० पर्यंत मर्यादा वाढविली, परंतु अतिशय तीव्र विरोधामुळे २००८–०९ अर्थसंकल्पापासून हा कर रद्द करण्यात आला.

वरील प्रत्यक्ष करांविषयी ज्या शिफारशी डॉ. चेलिया समितीने सुचविल्या त्या सरकारने वरीलप्रमाणे अंमलात आणल्या. त्याचबरोबर सेवा कर, वर्धित मुल्य कर यासारख्या अप्रत्यक्ष करांबद्दलही अनेक शिफारशी या समितीने सुचविल्या.

भारत सरकारने डॉ. चेलिया समितीच्या शिफारशीच्या आधारे कराचा आधार वाढविणे, दर कमी करणे, नवीन कर आकारणे, कायद्यातील क्लिष्टता टाळून पारदर्शकता आणणे इ. उपाययोजना करून कररचना संतुलित, समन्यायी आणि कार्यक्षम करण्याचा प्रयत्न गेल्या पंधरा वर्षापासून सतत करण्यात आले. त्या सर्व उपायांच्या प्रत्यक्ष कराच्या महसुलावर काय परिणाम झाले हे पाहणेसुध्दा आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

तक्ता क्र. १ :– प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करभार

| वर्ष | प्रत्यक्ष कर | अप्रत्यक्ष कर |
|---|---|---|
| 1991-92 | 22.6 | 75.5 |
| 92-93 | 24.6 | 73.7 |
| 93-94 | 23.4 | 76.6 |
| 94-95 | 27.4 | 72.7 |
| 95-96 | 27.2 | 72.8 |
| 96-97 | 21.1 | 72.9 |
| 97-98 | 28.4 | 71.6 |
| 98-99 | 32.2 | 67.8 |
| 99-2000 | 33.7 | 65.5 |
| 2000-2001 | 36.2 | 62.9 |
| 01-02 | 37.0 | 62.1 |
| 02-03 | 38.4 | 60.7 |
| 03-04 | 41.3 | 57.9 |
| 04-05 | 43.3 | 56.1 |
| 05-06 | 45.1 | 54.4 |
| 06-07 | 48.8 | 51.2 |

तक्ता क्र.१ वरून हे स्पष्ट होते की नवीन आर्थिक धोरणाचा भारतीय कर प्रणालीवर प्रत्यक्ष प्रभाव पडलेला आहे. १९९१–९२ पासून हळूहळू पण निश्चितपणे प्रत्यक्ष कराचे एकुण महसुलातील प्रमाण वाढलेले आहे. ही वाढ जवळजवळ दुप्पट आहे. (१९९१–९२ ला २२.६% ते २००६–०७ मध्ये ४८.८%) किंबहूना अधिकच आहे.

परंतु त्याचबरोबर जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या धोरणानुसार अप्रत्यक्ष करांचे प्रमाण मात्र वेगाने कमी झालेले दिसून येते. आयात कर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क इ. चा या प्रामुख्याने समावेश होतो.

डॉ. चेलिया समितीच्या शिफारशीनुसार काही नविन करांची आकारणी करण्यात आली. या सर्वांचा परिणाम होऊन केंद्र सरकारचे एकुण राष्ट्रीय उत्पन्न वाढेल ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

तक्ता क्र. २ :– प्रत्यक्ष कराचा महसुल.

| वर्ष | निगम कर | प्राप्ती कर |
|---|---|---|
| 1991-92 | 11.7 | 10.0 |
| 92-93 | 11.9 | 10.6 |
| 93-94 | 13.3 | 12.0 |
| 94-95 | 15.0 | 13.0 |
| 95-96 | 14.8 | 14.0 |
| 96-97 | 14.4 | 14.1 |
| 97-98 | 14.3 | 12.1 |
| 98-99 | 18.1 | 14.4 |
| 99-2000 | 17.1 | 14.9 |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 2000-2001 | 18.9 | 16.8 |
| 01-02 | 19.6 | 17.1 |
| 02-03 | 21.3 | 17.0 |
| 03-04 | 24.9 | 16.2 |
| 04-05 | 27.1 | 16.1 |
| 05-06 | 27.9 | 17.9 |

टीप :- आकडे एकूण कर महसुलाशी टक्केवारी दर्शवितात.
संदर्भ :- भारत सरकार आर्थिक पाहाणी
(१९९१-९२ ते २००७-०८)

तक्ता क्र. २ चा अभ्यास केल्यास निगम कर Corporate Rax आणि प्राप्ती कर Income Tax दोन करांच्या एकुण महसुलात वाढ झालेली दिसते. दोन्ही करांच्या दरात बरीच घट करण्यात आली. अधिकाअधिक नागरिक या करांच्या कक्षेत येतील असे प्रयत्नही करण्यात आले. परंतू त्यातुलनेत झालेली वाढ मात्र अपेक्षे एवढी झाली नाही असे म्हणावे लागेल आणि त्याचबरोबर अप्रत्यक्ष करांमध्ये मात्र घट झाली.

करांमध्ये विविध सवलती, सुट, थकबाकी कर वजावटी इ. प्रमुख कारणे करमहसुलाची अपेक्षित वसुली न होण्यासाठी दिली जातात. याशिवाय ' करपात्र करदात्यांना शोधणे ' या मधेही सरकार अपयशी ठरले. करांची मर्यादा व दर अपेक्षेप्रमाणे कमी करूनही भारतीय नागरिक करचुकवेगिरी, करलपवेगिरी आणि कर भरण्याची टाळटाळ करणे या सवयींनी ग्रस्त आहे.

**प्रत्यक्ष करांची थकबाकी :**

प्रत्यक्ष करांची थकबाकी
तक्ता क्रमांक ३ (रू. कोटीत)

| कर | 2004-05 | 2005-06 | 2006-07 |
|---|---|---|---|
| निगम | 43,134 | 38004 | 38955 |
| प्राप्ती कर | 53,480 | 37470 | 40125 |

प्रत्यक्ष करातील जे सर्वात महत्वाचे दोन कर आहेत, त्यांची थकबाकीची रक्कम पाहिल्यास (तक्ता क्र.३) मन थक्क होते. ही थकबाकीची रक्कम प्रामुख्याने मोठ्या कंपन्या , औद्योगिक घराणी, नेते, अभिनेते या मंडळीकडून येणे बाकी आहे. कर प्रशासनातील अकार्यक्षमता आणि राजकरणी लोकांची दुर्बल इच्छाशक्ती यामुळेच ही थकबाकी वसूल होवू शकली नाही, हे सत्य नाकारता येत नाही. या करांच्या रकमेतूनच शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, वीज इ. लोकोपयोगी सेवांची निर्मिती होत असते. प्रभावी करवसुलीच्या अभावी या सर्वच सेवांवर विपरित परिणाम पहावयास मिळत आहे.

वरील विश्लेषणावरून हे सहज लक्षात येते की, भारतीय कर रचना संतुलित होण्याच्या दिशेने सरकारने प्रयत्न केले असले तरी अपेक्षित साध्य करणे अद्यापही शक्य झाले नही. समन्यायी आणि कार्यक्षम कर रचनेच्या

Scanned by CamScanner

निर्मितीसाठी यापेक्षाही भरीव व ठोस राजकोषीय निर्णय घेण्याची गरज आहे. ज्यामुळे करपात्र करदात्यांची संख्या वाढेल, कर कायद्यातील क्लिष्टता कमी होऊन सामान्य नागरिक आपणहून, जबाबदारीने कर भरेल, कर लवचिकतेचे प्रमाण वाढून कर महसुलात वाढ होईल. त्यासाठी दूरदृष्टी आणि प्रबळ राजकीय ईच्छाशक्तीची गरज आहे.

संदर्भसुची

१) **अर्थसंवाद :** एप्रिल ते जुन २००६
गत शतकातील केंद्रीय अर्थसंकल्पांचा आढावा
प्र.गो. म्हस्के

२) **अर्थसंवाद :** एप्रिल ते जुन २००८
केंद्र सरकारचा कर महसुल
प्र.गो. म्हस्के

३) Government of India
Receipts Budget (200-01 to 2007-08)

Scanned by CamScanner

# प्रत्यक्ष कराचे देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्व व भूमिका

**प्रा. नंदकिशोर एम. मेनेवार**
जा. कृ. बोमनवार विज्ञान व कला
महाविद्यालय, चामोर्शी, जि. गडचिरोली

'राजस्व' अर्थशास्त्राचे एक महत्वपूर्ण अंग आहे. सरकार उत्पन्न मिळविते, मिळविलेले उत्पन्न खर्च करते या उत्पन्न मिळविण्याची व खर्च करण्याशी संबंधित असलेल्या ज्या समस्या असतात त्याचा अभ्यास राजस्व करते. Public Finance या इंग्रजी शब्दाचा अर्थ राजस्व असा नाही. Public म्हणजे लोक व Finance म्हणजे वित्त होय. म्हणून Public Finance या शब्दाचा अर्थ लोकवित्त किंवा सार्वजनिक वित्त असा आहे परंतू यात लोकांच्या किंवा जनतेच्या वित्ताचा अभ्यास करता येत नाही. जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या राज्याच्या किंवा सरकारच्या वित्तीय व्यवस्थेचे अध्ययन करण्यात येते. सरकारची उत्पन्नाची साधणे कोणती व मिळविलेले हे उत्पन्न खर्च करण्याची क्षेत्रे कोणती यांचा अभ्यास सार्वजनिक आयव्ययात किंवा राजस्वात होतो. थोडक्यात, सरकारचे उत्पन्न व खर्च यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे राजस्व होय.

## राजस्वाची व्याख्या

प्रा. फिंडले शिरास च्या मते, राजस्व हे सार्वजनिक सत्तेच्या उत्पन्न मिळविण्याच्या व खर्च करण्याच्या पध्दतीशी निगडीत असलेले शास्त्र होय.

प्रा. स्मिथच्या मते, सार्वजनिक आय आणि व्यय यांचे स्वरूप व सिध्दांत यांचे अध्ययन करणाऱ्या शास्त्राला राजस्व असे म्हणतात.

प्रा. मेहता व अग्रवाल यांच्या मते, राजस्व म्हणजे राज्याच्या मौद्रिक व प्रत्यय साधनांचा अभ्यास होय.

सरकारचे उत्पान्न व खर्च हे सार्वजनिक वित्ताचे प्रमुख विभाग आहेत. हे वरील व्याख्येवरून स्पष्ट होते.

## राजस्वाची स्वरूप

व्यक्तीप्रमाणे सार्वजनिक सत्तेला किंवा सरकारला विविध प्रकारची कार्य पार पाडावयाची असतात. या करीता सरकारला मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो हा खर्च भागवण्याकरीता सरकारला मोठ्या प्रमाणात पैसा उभारावा लागतो. किती खर्च करावयाचा हे सरकार प्रथम ठरविते व या करीता आवश्यक असणारे उत्पन्न कसे गोळा करावयाचे ही गोष्ट सरकार नंतर ठरविते. कराव्या लागणाऱ्या खर्चा इतके उत्पन्न मिळत नसेल तर सरकारला उद्दीष्टे

Scanned by CamScanner

अंदाजपत्रक करावे लागते.

सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती

आयव्ययता मुख्यता तीन प्रकारची असतात. केंद्रीय, प्रादेशीक व स्थानिक सार्वजनिक आयव्ययाची पाच प्रमुख भाग पडता येतात.

१. सार्वजनिक व्यय – सरकारच्या व्ययाची तत्वे व परिणामांचा विचार होतो.

२. सार्वजनिक उत्पन्न – कर हा सरकारच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत आहे.

३. सार्वजनिक ऋण – कर्जाचे स्त्रोत, प्रकार, परिणाम त्याच्या परतफेडीची व्यवस्था इत्यादींचा अंर्तभाव होतो.

४. वित्तीय प्रशासन – अंदाजपत्रक तयार करणे, प्रस्तुत करणे, लेखांचे निरीक्षण, अंकेक्षण इत्यादींचा अंर्तभाव होतो.

५. वित्तीय धोरण – सार्वजनिक आयव्यय, कर, ऋण इत्यादींचा समावेश होतो.

आधुनिक काळात समाजहीत ही व्यक्तीहिताहून भिन्न कल्पना आहे. हे मान्य केले गेले त्यामुळे व्यक्तीहिताहून समाजहित साध्य होईलच असे नाही. सरकार संपूर्ण समाजाशी, सामाजिक हिताशी संबंधित आहे सरकारवर सामाजिक कल्याणाची जबाबदारी आहे. त्यामुळे जास्तीत जास्त सामाजिक लाभ होईल अशी भुमिका स्विकारली गेली.

## महत्तम सामाजिक लाभाची मस्ग्रेव्हची सुधारीत मांडणी

महत्तम सामाजिक लाभाची तत्व मस्ग्रेव्ह यांनी मांडली . त्यांनी एकूण लाभ व एकूण त्यागापेक्षा शुध्द सामाजिक लाभाचा विचार केला. त्यांच्या मते, शुध्द सामाजिक लाभ शुन्य असतो तेव्हा एकूण सामाजिक लाभ महत्तम असतो. सामाजिक लाभ व त्यागाच्या मापनात तसेच सिध्दांत लागू करण्यात अनेक अडचणी असल्यातरी सामाजिक लाभाबाबत अंदाज लावता येतो. व त्याच्या आधारावर निर्णय घेतले जातात. लोकवित्त सामाजिक, आर्थिक कल्याणाची किल्ली न्यायोचीत विकासाचा मार्ग आणि सरकारची कार्य व कर्तव्य पार पाडण्याचे एक महत्वाचे साधन मानले जाते. विकसनशिल देशात तर देशाच्या विकासात्मक गरजा भागविण्यात सार्वजनिक वित्ताने अतिशय महत्वाचे योगदान दिलेले आहे.

आज आर्थिक सुधारणाच्या व मुक्त अर्थव्यवस्थेच्या पार्श्वभुमिवर पुन्हा एकदा सरकारने आर्थिक क्षेत्रात कमी सहभागी व्हावे. खाजगी व्यक्ती व संस्थाना पुर्ण मुभा असावी असा विचार पुढे येत आहे. अर्थात सरकारचे कार्यक्षेत्र व खर्च कमी करण्याकडे कल आहे. तरीसुध्दा भारतासारख्या देशात बेरोगारासारखे प्रश्न सोडविण्यासाठी सार्वजनिक वित्ताचाच आधार घ्यावा लागतो ही वस्तुस्थिती लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

राजस्व हा सरकारच्या उत्पन्नाचा नियमितपणे प्राप्त होणारा अंश प्रवाह होय यात कर, शुल्क दंड, किंमत, देणग्या इत्यादी अनेक बाबींचा समावेश होतो. या व्यतीरीक्त सरकारला ऋण, भांडवली उत्पन्न तसेच अतिरिक्त मुद्रा निर्मिती करूनही उत्पन्न प्राप्त होते. मात्र त्यापासून नियमितपणे उत्पन्न प्राप्त होत नसल्यामुळे त्याचा राजस्वात समावेश केल्या जात नाही.

वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी सार्वजनिक उत्पन्नाचे वर्गीकरण वेगवेगळ्या प्रकारे केले आहे. बॅस्टेबल यांनी

Scanned by CamScanner

राजस्वाचे वर्गीकरण जनतेला दिलेल्या वस्तुसेवांच्या बदल्यास प्राप्त होणारे उत्पन्न तसेच आपल्या सत्तेमुळे जनतेच्या उत्पन्नातून प्राप्त होणारा हिस्सा असे दोन भाग केले.

सेलिग्मनने स्वेच्छा राजस्व किंवा उत्पन्न व्यवसाय सेवा इत्यादीच्या मोबदला म्हणून मिळणारी करारी उत्पन्न व करासारखे अनिवार्य राजस्व असे तिन वर्ग केले. डाल्टनने सार्वजनिक उत्पन्नाचे १. कर २. किंमत असे दोन मुख्य वर्ग केले आहे.

प्राचीन काळापासून कर हे राज्याचे किंवा सरकारचे उत्पन्न मिळविण्याचे सर्वात महत्वाचे साधन आहे. समाजाच्या सामुहिक गरजा कर उत्पन्नाशिवाय सरकार पुर्ण करू शकत नाही. हे कळत असूनही कर हे फारसे लोकप्रिय कधीच नसतात. राज्यसत्तेची काही कार्य ही अनिवार्य असतात. व ती पार पाडण्याकरीता कर लावणे आवश्यक असते.

**केंद्र सरकारची आय साधने**

केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण होवू नये म्हणून वित्तीय साधनांच्या बाबतीत भारताच्या राज्यघटनेत स्पष्ट निर्देश केला आहे. कर हे उत्पन्न मिळविण्याचे महत्वाचे साधन आहे. केंद्र सरकार जे कर आकारू शकते अश्या कराबद्दल घटनेच्या सातव्या अनुसूचिमधील पहील्या यादीत उल्लेख आहे. या करापैकी महत्वाचे कर पुढीलप्रमाणे आहेत.

१. शेतीमधील उत्पन्न वगळून इतर उत्पन्नावर आकारण्यात येणारा आयकर किंवा प्राप्ती कर.

२. महामंडळावरील कर किंवा निगम कर.

३. आयात व निर्यात कर (जकात)

४. उत्पादन कर

५. मालमत्ता कर

६. शेतजमीन वगळून इतर संपत्तीच्या भांडवली मुल्यावर आकारण्यात येणारा कर.

७. स्टॅम्प ड्युटीज

८. शेअर बाजारात होणाऱ्या व्यवहारावर लावण्यात येणारे कर इत्यादी.

केंद्र सरकारला आपला खर्च भागविता यावा म्हणून त्याला वित्तीय साधणे उपलब्ध करून देण्याची घटनेत तरतूद आहे. उत्पन्न मिळविण्याकरीता केंद्र सरकार जे कर आकारते त्या कराचे चार प्रकारे वर्गीकरण करता येते.

१. केंद्र सरकारकडून आकारण्यात येणारे, केंद्र सरकारकडून गोळा करण्यात येणारे व ज्याचे पुर्ण उत्पन्न केंद्र सरकारलाच मिळते अशा प्रकारचे कर.

२. केंद्र सरकार कडून आकारण्यात येणाऱ्या, केंद्र सरकार कडून गोळा करण्यात येणारे व ज्यातून राज्य सरकारांना एक विशिष्ट हिस्सा मिळण्याची सोय आहे. अश्या प्रकारचे कर.

Scanned by CamScanner

३. केंद्र सरकारकडून आकारण्यात येणारे केंद्र सरकाकडून गोळा करण्यात येणारे परंतु ज्या करापासून मिळणारे संपुर्ण उत्पन्न राज्यसरकारांनाच देण्यात येते असे कर.

४. केंद्र सरकार आकारीत असलेले परंतू राज्यसरकार गोळा करीत असलेले व ज्यांचे संपुर्ण उत्पन्न राज्य सरकारांनाच मिळते असे कर.

**राज्यसरकारची आय साधने**

घटनेनुसार राज्य सरकार हे ज्या करांची आकारणी करू शकतात अशा करापैकी महत्वाचे काही कर पुढील प्रमाणे आहेत.

१. शेतसारा

२. शेतीमधून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कर

३. मादक पदार्थाच्या उत्पन्नावरील कर

४. वर्तमान पत्रे वगळून इतर वस्तुच्या खरेदी विक्री वरील कर

५. शेतजमीनी वरील मालमत्ता व वारसा कर

६. विशिष्ठ प्रदेशात आणल्या जाणाऱ्या वस्तुवर आकारण्यात येणारा कर

७. विजेच्या उपभोगावरील व विक्रीवरील कर

८. रस्ते व अंतर्गत जलवाहतूकी द्वारे ने–आण होणाऱ्या वस्तु व उतारू यांच्या वरील कर

९. मनोरंजन कर

१०. चैनीच्या वस्तुवरील कर व यात्रा कर

११. विभिन्न व्यवसाय व्यापार व नोकऱ्यावरील कर

१२. खाण मालकीवरील कर

१३. अबकारी कर

या साधना व्यतीरिक्त केंद्रीय आय साधनांतून मिळणारा हिस्सा विविध प्रकारची अनुदाने विशिष्ट कार्यासाठी मिळणारें आर्थिक सहाय्य व कर्जही राज्याची प्रमुख आय साधने आहेत.

अनुदाने सरकारी उत्पन्नाची साधन होय संघराज्यात एका स्तरावरील सरकार दुसऱ्या स्तरावरील सरकारला अनुदान देत असतो. भारतात केंद्र सरकार हे राज्य सरकारांना तसेच राज्य सरकारही स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदाने देत असतो. ही अनुदाने सामान्य व विशेष अश्या दोन प्रकारची असतात. विशेष अनुदान हे ठराविक कार्यासाठी देण्यात येते ज्या शासकीय संस्थेला अनुदान मिळतात तिला अनुदान देणाऱ्या सरकारची कोणतीही परतफेड करावी लागत नाही. काही वेळा एका देशाची सरकार हे दुसऱ्या देशाच्या सरकारला अनूदान देते. अशा अनुदानाला सामान्यत: विदेशी मदत असे म्हणतात.

Scanned by CamScanner

कराचे स्वरूप, उद्देश, रचना, करपध्दती इत्यादीवरून कराचे वर्गीकरण करण्यात येते.

१. प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष कर (Direct & Indirect Taxes)

२. पुरोगामी, प्रमाणबद्ध, प्रतिगामी व न्हासमान पुरोगामी कर

**प्रत्यक्ष कर**

प्रा. बुलक च्या मते, उत्पादनावर, उत्पन्नावर लावलेला कर प्रत्यक्ष कर होय. प्रा. मिलच्या मतानुसार जेव्हा सरकारचा उद्देश ज्या व्यक्तीवर कर आकारला त्याच व्यक्तीने तो भरावा असा असतो तेव्हा तो प्रत्यक्ष कर होय.

डाल्टन म्हणतात, प्रत्यक्ष कर म्हणजे असा कर की जो ज्या व्यक्तीवर कायद्यानुसार आकारण्यात येतो व त्या व्यक्तीकडूनच खरोखर भरल्या जातो. कराचा आघात व कराचा आपात जेव्हा एकाच व्यक्तीवर किंवा संस्थेवर होतो तेव्हा तो प्रत्यक्ष कर असतो. म्हणजेच ज्या कराच्या बाबतीत संक्रमण मुळीच होत नाही. तो प्रत्यक्ष कर.

**प्रत्यक्ष करात खालील करांचा समावेश होतो.**

१. **वैयक्तीक उत्पन्न कर :** वैयक्तीक उत्पन्न कर प्रत्यक्ष कर होय तो व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नावर आकारला जातो. एका विशिष्ट पातळीपेक्षा जास्त त्या व्यक्तीचे उत्पन्न असेल तरचं हा कर द्यावा लागतो. समाजातील आर्थिक विषमता कमी करणे हे प्रत्यक्ष कराचे एक महत्वाचे उद्दीष्ट असते.

२. **कंपनी कर :** रजिस्टर कंपन्या व महामंडळाच्या वार्षिक उत्पन्नावरील करास कंपनी कर म्हणतात. हा कर एकाच दराने आकारण्यात येतो. औद्योगीकरणास चालना देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने कंपनी करात अनेक सवलती नव्या उद्योगांना आजपर्यंत दिल्या आहेत.

३. **संपत्ती कर :** भारत सरकारने सन १९५७ पासून संपत्ती कर लादण्यास सुरवात केली. एखाद्या व्यक्तीची फक्त संपत्ती विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त असेल तरचं संपत्तीकर द्यावा लागतो. शेतीची जमीन, प्राव्हीडंट फंडाची रक्कम, विम्याची रक्कम यातून वगळली जाते.

समाजातील आर्थिक विषमता कमी करणे हा संपत्ती कराचा एक मुळ उद्देश असतो.

४. **देणगी कर :** भारतात सन १९५८ पासून देणगी कराची सुरवात झाली. एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त रकमेची किंवा किंमतीची देणगी असेल तरच देणगी कर आकारला जातो. कर मर्यादा उत्पन्न कराप्रमाणे दरवर्षी कमी-जास्त केले जाते.

Scanned by CamScanner

केंद्र सरकारचे प्रत्यक्ष करापासून उत्पन्न (कोटी रूपये)

| अ.क्र. | प्रत्यक्ष कर | १९८८-८९ | १९८९-९० |
|---|---|---|---|
| १. | उत्पन्न कर | ४२८३.४० | ५०७९.१० |
| २. | कंपनी कर | ४४०७.२१ | ४७२८.९२ |
| ३. | संपत्ती कर | १२२.४८ | १७८.५१ |
| ४. | देणगी कर | ६.७४ | ८.०६ |

*Source - public finance 1991 Ministry of Finance Go. 1. p.5*

प्रत्यक्ष कराबाबत करदात्याला तो किती भरावयाचा, केव्हा व कुठे द्यावयाचा, कराचे दर याबाबत निश्चित अशी माहिती असते. तसेच प्रत्यक्ष करापासून सरकारला किती उत्पन्न मिळेल याचा अंदाज घेता येतो. व त्यानुसार खर्चाची व्यवस्था करता येते. प्रत्यक्ष कराचा भार गरीबांच्या तुलनेते श्रीमंतावर अधिक पडते. कारण प्रत्यक्ष कर हे पुरोगामी स्वरूपाचे असतात. व त्यामुळे ते समता तत्वाची प्रतिस्थापना करतात.

प्रत्यक्ष कर उत्पादक व लवचिक आहेत. त्यांचा उत्पादनावर अनिष्ट परिणाम होत नाही. तसेच प्रत्यक्ष कराच्या दरात बदल करून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करता येते. एवढेच नव्हे तर लोकांच्या उत्पन्नात जसजशी वाढ होते. तसतशी या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात आपोआप वाढ होते.

प्रत्यक्ष करात न्यायाचे तत्व सहज लागु करता येते. कारण व्यक्तिची करदेय क्षमता लक्षात घेऊन तो लावता येतो. कराचा दर सुद्धा व्यक्तीच्या कर देण्याच्या सामर्थ्याची सुसंगत पद्धतीने निश्चित करता येते. प्रत्यक्ष कर करदाता प्रत्यक्ष सरकारलाच देत असल्यामुळे प्रत्यक्ष करात वसुलीचा खर्च त्यापासून प्राप्त उत्पन्नाच्या मानाने कमी असतो प्रत्यक्ष करात उत्पादकतेचा गुण बहुधा दिसून येतो. त्यापासून सरकारला बरेच उत्पन्न मिळते. देशाच्या आर्थिक विकासाबरोबरच लोकांचे उत्पन्न वाढून त्यांची करदेय क्षमता वाढते. त्यामुळे सरकारचेही उत्पन्न आपोआप वाढते. संपत्ती कर, उत्पन्न कर, नफा, इत्यादी. प्रत्यक्ष कराच्या दरात बदल करून आवश्यकतेनुसार करापासून कमी व जास्त उत्पन्न मिळविता येते. या अर्थाने प्रत्यक्ष कर लवचिक असतात. कराचे दर एकदा ठरविले व करदात्यांना ते माहित झाले की, करदात्यांना किती दर द्यायचे ते निश्चितपणे समजते. त्यामुळे कराच्या रकमेची तरतुद करणे करदात्याला शक्य होते. सरकारलाही मिळू शकणाऱ्या उत्पान्नाची निश्चित कल्पना येते. आपल्या खर्चाचे नियोजन करणे त्यामुळे सरकारला सोईचे होते. प्रत्यक्ष करात करभार कोणावर पडणार हे निश्चित असते. त्याचे अनुमान सहज करतो येते. त्यामुळे योग्य अपेक्षित लोकांवर व वर्गावरच तो पडेल अशा प्रमारे कर लावणे शक्य होते. उत्पन्नाची विषमता घटवण्यासारखी उद्दीष्ट्ये साध्य करणे त्यामुळे सोपे जाते.

आपल्या क्षमतेनुसार व्यक्ती प्रत्यक्षपणे कर देऊन सरकारच्या कार्याला प्रत्यक्षपणे हातभार लावतो. त्यासाठी आर्थिक योगदार करते. त्यामुळे करदात्यामध्ये पर्यायाने समाजात आपले कर्तव्य तसेच अधिकाराबद्दलही जागरूकता निर्माण होते.

## संदर्भसूची


१) भारतीय अर्थशास्त्र – देव, झामरे

२) समष्टी अर्थशास्त्र – डॉ. सौ. मुक्ता जाहांगीरदार

३) मुद्राशास्त्र आणि मौद्रिक व्यवहार – मुंजे, देशपांडे

४) स्थुल अर्थशास्त्र – डॉ. जी.एन. झामरे


Scanned by CamScanner



## ''राज्यातील विज समस्या''

प्रा. राजाभाऊ दुरगकर
नवप्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर

महाराष्ट्रा मध्ये विजेचा पूरवठा हा महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळ यांचे कडून केला जात होता. आता सोयीच्या दृष्टिने मंडळाचे चार भागात विभाजन करण्यात आले आहे. याचे विश्लेषण पूढील प्रमाणे दिले आहेत.

१) एम.एस.ई.बी. होल्डींग कंपनी लिमीटेड २) महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमीटेड ३) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी ट्रान्समीशन कंपनी लिमीटेड ४) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी ड्रिस्ट्रिब्युशन कंपनी लिमीटेड

वरील कंपन्याकडे विद्युतचे उत्पादन, परेषण व वितरण ही कामे सोपविण्यात आली आहे. देशाच्या आर्थिक विकासात आधारभूत सोयीचा वापर व त्याचे विकास कार्यातील योगदान व महत्व विशेष असते. दर्जेचा वापर व उपयोग आज सर्वच क्षेत्रात अनिवार्य ठरत आहे. किंबहूना असेही म्हणता येथील की देशाच्या आर्थिक विकासाची पातळी ही केवळ ऊर्जेच्या व अन्य पायाभुत सोयी सवलतीच्या वापरावरच अवलंबून असते हे आता बहूतांशी दृष्ट्या स्पष्ट होत आहे. विद्यूत पूरवठा हा ग्रामीण विकासाचा पायाभूत घटक आहे. डॉ. अनिल काकोडकर याच्यां मते ''भविष्यातील प्रगतीत सिहांचा वाटा असेल तो ऊर्जा निर्मीतीचा, कोणत्याही निकषाचे दरडोई परिणाम आणि ऊर्जानिर्मीती यांचा आलेख नेहमीच समप्रमाण दाखवतो. जीवनशैलीची गुणवत्ता देखील वाढत्या उपलब्ध ऊर्जेनुसार वाढत जाते विकासाची अपेक्षीत पातळी गाठण्यासाठी आपणास सध्या उपलब्ध असणाऱ्या ऊर्जा निर्मीती पेक्षा कमीत कमी दहा पट उर्जा निर्मीती आवश्यक आहे. सध्याची वीज निर्मिती सुमारे एक लाख तीस हजार मेगावॅट्स एवढी आहे. ऊर्जानिर्मीत करायची तर ऊर्जास्त्रोताची गरज आहे. दगळी कोळसा आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर आहे, पण खणिज तेलाचा तुटवडा आहे. पन्नास वर्षांनी कोळसाही मिळणार नाही जो कोळसा आहे तो प्रदुषण करणारा आहे. व शिवाय कमी गुणवत्तेचा आहे. जलविद्युत तर आणखी कमी आहे. शिवाय लहरी पावसामुळे पर्यावरणीय समस्या आणखी जास्त तिव्रतेने जाणवत आहे. अपारंपारीक ऊर्जेचा स्त्रोतात आपले कार्य सुरू आहे. पण या स्त्रोताचा वेग कमी आणि किंमत जास्त शिवाय ऊर्जेची संपूर्ण गरज काही त्यामुळे भागु शकणार नाही. म्हणून ही अतिरिक्त गरज भागविण्यासाठी आण्विक ऊर्जेकडे वळणे गरजेचे ठरत आहे.

इंधनापासून मिळणाऱ्या उष्णतेची आकडेवारी पाहिल्यास एक टन दगडी कोळशापासून जेवढी उष्णता

Scanned by CamScanner

म्हणजे त्याच्या दहा हजार पट उष्णता एक टन युरेनियम पासून प्राप्त होते. युरेनियम आणि थोरियम या आण्विक खनिजांचे साठे अद्याप वापरात यावयाचे आहे. त्यामुळे या साधना पासून प्राप्त होणाऱ्या अपेक्षा वापरात यावयाचे आहे. त्यामुळे या साधना पासून प्राप्त होणाऱ्या अपेक्षा अधिक असणार आहे. आजचे सर्व स्त्रोत वापरूनही अपारंपारिक व जलविद्युत मिळून ७६ गीगावॅटस् एवढीच ऊर्जा निर्माण होते. सध्या गरज आहे ती १३०० गीगावॅटस् एवढी. शिवाय कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण कमी करणे आता अपरीहार्य आहे.

सध्या आपल्या देशात उत्पादीत होणारी केवळ ३७०० मेगावॅट ऊर्जा आण्विक असून २०२० पर्यन्त २० हजार मॅगवॅट ऊर्जा आण्विक क्षेत्रातून निर्मित करण्याचे उदिष्ट शासनाचे आहे. महाराष्ट्रा सारख्या एका मोठ्या उद्योगी राज्याच्या विजेच्या गरजा दरवर्षी वाढत आहेत. राज्यात विजेची मागणी प्रतिवर्ष नऊ टक्क्यापेक्षा जास्त या दराने वाढत आहे. २००७-०८ या वर्षात मागणी आणि पूरवठा यात ५००० मॅगावॅट आणि पूरवठ्यात सूमारे ५००० मॅगावॅट पेक्षा जास्त तुट आहे. ११व्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस मुंबई महानगर सोडून राज्यातील मागणी पूरवठ्यातील तुट ११ हजार मॅगावॅट एवढी होण्याची शक्यता नकारता येत नाही. त्यामुळे केवळ मर्यादित नैसर्गिक साधनावर अवलंबून न राहता त्यासाठी अन्य मार्ग तयार करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र हे प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाते; व महाराष्ट्राची परंपरा आर्थिक दृष्ट्या समृद्ध व स्वयंमपूर्ण म्हणून ओळखली जाते. अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राचा अनेक बाबतीत कधी चौथा तर कधी सातवा क्रमांक लागतो. औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्य म्हणून महाराष्ट्राची गणना केली जाते. कारण महाराष्ट्राच्या वाट्याला मुंबई आलेली आहे. याशिवाय पश्चिम महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा व विदर्भ अशी त्याची अंतर्गत रचना दिसून येते. मुंबई ही महाराष्ट्राचीच नाही तर देशाची आर्थिक राजधानी म्हणून तिचा नाव लौकीक आहे. याठिकाणी अनेक वित्तीय व्यवहार करण्याऱ्या संस्थाचे मुख्य कार्यालय आहे. अशा या दहा कोटीपेक्षा जास्त असलेल्या लोकसंख्येच्या राज्यात आजही मुलभूत प्रश्न आहे. बेकारी शहरीकरण, गॅंगवार, बकालवसयांची समस्या, बाल कामगार. या समस्या मूलभूत होत. महाराष्ट्रातील वर निर्देशीत केलेल्या विभागाच्याही विविध समस्या आहे. त्यातील काही समस्या ह्या अत्यंत ज्वलंत समस्या आहे. विदर्भात प्रामुख्याने सिंचनाची समस्या लागवड खालील क्षेत्र, बाल कामगार, बृहत प्रमाणावरील उद्योग, विदेशी गुंतवणूकीचा अभाव व पर्यटनाच्या क्षेत्रातील विकासाचा अभाव ह्या विदर्भाच्या वाट्याला आलेल्या मूलभूत समस्या होय. पायाभूत सोयी व सवलतीचा अभाव आर्थिक विकासात अडसर निर्माण करते. किबंहुना असेही म्हणता येथील की, विकासाचा आत्मा म्हणजेच पायाभूत सोयी व सवलती होय. विकसनशील देशात यो सोयी सवलती उपलब्ध असल्या तरी त्यांचा विकास न झाल्यामुळे विकास कार्यात त्याचा योग्य वापर करता येत नाही उदा. दक्षिण आफ्रिकेत विपूल प्रमाणात नैसर्गीक संसाधनाची उपलब्धता आहेत परंतु त्यांचा विकास न झाल्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील गरिबी हा जगाचा प्रश्न बनला आहे. अर्थातच विकास कार्याकरीता अनेक नैसर्गीक बाबी व त्यांची उपलब्धता असल्या शिवाय कोणत्याही देशाचा आर्थिक विकास होणे शक्य नाही या सर्व विवेचनात अलीकडील काळात आर्थिक विकास व उत्पादकीय शक्तींतील वाढ करण्यासाठी विजेचा वापर सर्वत्र केला जातो. पायाभूत सुविधेतील सर्वात उपयुक्त व सर्व ठिकाणाहून मागणी होत असलेला घटक म्हणजे विज होय. मनुष्याच्या जीवनातील

Scanned by CamScanner

विज अनिवार्य घटक आहे. वर्तमान व्यवस्थेतील कोणतेही कार्य उदा. पिठमळण्यापासून तर भूतलावातील नैसर्गिक संसाधनाचे संशोधन करण्यासाठी किंबहूना डोक्यावरील केस वाळविण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करीत असतांना विजेचा वापर केला जातो. रूग्णांना सेवा पूरविण्यासाठी, मनोरंजनासाठी, क्रिडा व क्रिडा संबंधी सर्व कार्याकरीता, वहातूकीकरीता, छपाईकरीता, बांधकाम कार्याकरीता अशा प्रकारे जीवनातल्या प्रत्येक पैलूच्या उपयोगाकरीता व विकासाकरीता विद्यूतचा वापर केला जातो. एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपयोगी असलेली विज मात्र आज देशातील अनेक राज्याचा प्रश्न बनली आहे. सर्वच ठिकाणी विजेचा तुटवडा जाणवतो आहे महाराष्ट्रातही विजेचा तुटवडा आहे. अनेक वर्षापासून विजेच्या तुटीची समस्या ही दिवसे दिवस वाढत आहे. या मुळे सामान्य उपभोक्ता, शेतकरी, उद्योजक व सेवा क्षेत्रात कार्यरत असणारे सर्व नोकरशहा देखील या समस्येने ग्रासलेले आहे. या संदर्भात विदर्भातील विजेची स्थिती याचा थोडक्यात आढावा पूढील प्रमाणे घेता येतील.

**विदर्भातील विज निर्मीती केंद्र व स्थापणे सोबत क्षमता**

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | विज केंद्र | स्थापना वर्ष | क्षमता मेगावॅट |
|---|---|---|---|
| १) | खापरखेडा | १९५० | १० मेगावॅट |
| २) | पारस | १९६० | ३० मेगावॅट |
| ३) | पारस | १९६७ | ६५.५ मेगावॅट |
| ४) | कोराडी | १९७४ | १२० मेगावॅट |
| ५) | कोराडी | १९७८ | २०० मेगावॅट |
| ६) | चंद्रपूर | १९९१ | ५०० मेगावॅट |
| ७) | खापरखेडा | २००१ | २२० मेगावॅट |

महाराष्ट्र एकूण तीन प्रकारची विज निर्मीत होते. औष्णिक, विद्यूत, जलविद्युत व वायू विद्यूत होय.

**तक्ता क्र. २**

| अ.क्र. | विज केंद्र | विज निर्मीती | क्षमता मेगावॅट |
|---|---|---|---|
| १) | नाशिक | ५४० मेगावॅट | ८८० मेगावॅट |
| २) | कोराडी | ६८८ मेगावॅट | १०४० मेगावॅट |
| ३) | खापरखेडा | ८३४ मेगावॅट | ८४० मेगावॅट |
| ४) | पारस | ४९ मेगावॅट | ३०५ मेगावॅट |
| ५) | परळी | २१२ मेगावॅट | १०२० मेगावॅट |
| ६) | चंद्रपूर | १०३६ मेगावॅट | २३४० मेगावॅट |
| ७) | भूसावळ | ४५६ मेगावॅट | ४७५ मेगावॅट |
| ८) | उरण (गॅस) | ३८१ मेगावॅट | ८५२ मेगावॅट |

Scanned by CamScanner

तक्ता क्रमांक – ३

| विद्युत प्रकार | वर्ष | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १९७९–८० | १९८४–८५ | १९८९–९० | १९९४–९५ | २००४–०५ |
| औष्णिक | १७०८ | ३५९८ | ४८२५ | ५५०५ | ६४२५ |
| जलविद्युत | ९९० | १०४४ | १२५९ | १३०८ | २४४० |
| वायू विद्युत | – | २४० | ६७२ | ९१२ | ८५२ |
| एकूण | २७०० | ४००२ | ६५५६ | ७७२५ | ९७१७ |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, विदर्भात सर्व प्रकल्प हे औष्णिक विद्युत निर्मितीचे असून त्यातून ४३१८ मेगावॅट विद्यूत उत्पादन करण्याची क्षमता विदर्भात आहे. तर एकूण महाराष्ट्रात सर्व प्रकारच्या विद्यूत निर्मितीची क्षमता ९५९७ मेगावॅट इतकी आहे. तूलनेत विदर्भात निर्माण होणाऱ्या विद्युत क्षमतेचे प्रमाण हे ४४% इतके आहे यावरून हे स्पष्ट होते की विदर्भात निर्माण होणारी वीज एकूण निर्मितीच्या ३३% पेक्षा जास्त आहे. मागणी पुरविण्याचा विचार केल्यास विदर्भात विजेची मागणी ३००० मेगावॅट पेक्षा जास्त नाही व पुरवठा मात्र ४३०० मेगावॅट पेक्षाही अधिक होत असतांना दिसून येत आहे. विदर्भात विजेचा विपूल पूरवठा असूनही भारनियमनाच्या ओझ्याखाली इथला शेतकरी, उद्योजक, लहान व हस्तकला व्यवसाय याचा पूर्णत: बिमोड झालेला आहे. विज नसल्यामुळे शेतीला पाण्याचा पूरवठा करता येत नाही. म्हणून ओलीताची शेती आता विदर्भात करणे दिवसें दिवस कठीण होत आहे. विदर्भातून निर्माण होणारी अतिरिक्त विज ही पश्चिम महाराष्ट्र मुंबईकडे वळविली जाते व त्यामुळे विजेच्या बाबतीत विदर्भावर अन्याय होतो.

१९९१ पर्यंत विद्यूतचा प्रश्न महाराष्ट्राकरीता गंभीर नव्हता. याचे कारण म्हणजे पूरवठा हा मागणीपेक्षा जास्त होता. जागतिकीकरणानंतर अनेक बहूराष्ट्रीय कंपन्या महाराष्ट्रात आल्या त्यांचेव्दारे होत असलेला विजेचा वापर असीमीत प्रमाणात वाढला याशिवाय घरघुती कामकाजाकरीता विजेचा वापर दिवसें दिवस वाढत आहे. ज्यामध्ये विजपंप, वाटरहीटर, एअरकंडिशनर, लिफ्ट, वॉशिंग मशीन या सर्व कारणा साठी विजेचा वापर बृहत प्रमाणावर केला जातो. या शिवाय ओला आणि निकृष्ट दर्जाच्या कोळशामुळे निर्मितीवर झालेला परिणाम बंद पडलेले आणि दूरूस्तीसाठी बंद ठेवण्यात आलेले संच पाऊस कमी होत असल्याने कोयनेतील घटलेली विज निर्मिती आणि दाभोळ प्रकल्पात थांबलेली विज निर्मिती यामंळे राज्यात अभूतपूर्व विज संकट निर्माण झालेले आहे. महाराष्ट्रात विजेचा पूरवठा अधिक करण्याच्या दृष्टिने राज्यातील पहिला अल्ट्रा मेगा प्रकल्प रत्नागिरी जिल्ह्यात मुणगे या ठिकाणी सूरू करण्यात येत आहे. या प्रकल्पाची क्षमता ४००० मेगावॅट पेक्षा अधिक राहणार आहे. याशिवाय एनटीपीसी च्या वतीने नागपूर जिल्ह्यातील मौदा येथे सुरू करण्यात आलेल्या १००० मेगावॅटच्या औष्णिक प्रकल्पाच्या कार्याला सुरूपात झाली आहे. दाभोळ येथून सध्या ६०० मेगावॅट विजनिर्मिती होत आहे. डिसेंबर अखेर पर्यंत ६०० मेगावॅट व मार्च

Scanned by CamScanner

अखेरपर्यंत १२०० मेगावॅट विजनिर्मीतीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अश्या प्रकारे हे प्रकल्प अस्तित्वात आल्यास व दाभोळ प्रकल्पाची कार्यक्षमता वाढविल्यास महाराष्ट्रातील विजेचा प्रश्न पूर्णपणे सुटू शकेल. राज्यातील औष्णिक विज प्रकल्पांना सध्या कोळशाचाप्रचंड तुटवडा जाणवत असून त्याचाही परिणाम विजनिर्मितीवर होत असल्यामुळे विजेच्या पूरवठ्यात खंड पडतो. औष्णिक उर्जा केंद्राजवळ कोळशाच्या टंचाईमुळे विजेच्या सतत करण्यात येणाऱ्या पूरवठ्यात खंड पडतो परिणामत: जवळपास ५३०० मेगावॅटवरून विजेचे उत्पादन ३६०० मेगावॅट पर्यंत कमी होते. देशातील अन्य ३० औष्णिक केंद्रांना देखील ही समस्या जाणवत आहे.

सध्या महाराष्ट्र शासनाने सातत्याने विजेचा पूरवठा करता यावा या उद्देशाने खालील योजना अंमलात आणल्या आहेत.

**(१) सिंगल फेजींग योजना –** महाराष्ट्रात ही योजना सध्या ४३५२ ग्रामीण विभागात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सिंगल फेजने विद्यूत पूरवठा केला जातो. परिणामत: अनेक लोकांना जास्त काळ विद्यूत पूरवठा होईल व विज गळतीचे प्रमाण कमी होईल. ही योजना ग्रामीण भागाकरीता सुरू करण्यात आली आहे.

**(२) फिडर योजना –** या योजनेव्दारे ७१७६ ग्रामीण भागातील केंद्रांना स्वतंत्र्य विज वाहिनी व्दारे विजेचा पूरवठा करण्यात येणार आहे. ही योजना मार्च २००९ पर्यंत पूर्ण होणार आहे या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात विद्यूत पूरवठा सिंगल फेजने करण्यात येऊन शेतीला विज पूरवठा व गावातील विज पूरवठा वेगवेगळा केला जाईल.

**(३) विजवितरण हानी –** विजेचे वितरण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होते. निर्मिती एका ठिकाणी होत असली तरी संपूर्ण परिक्षेत्रात त्याचे वितरण होते अशा प्रकारे विज विविध ठिकाणी वाहून नेण्याकरीता विजेचा अपव्यय होतो. हा अपव्यय एकूण उत्पादनाच्या जवळपास २५% पर्यंत होतो. ही होणारी विजेची हाणी ५% पर्यंत कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

**(४) ट्रॉन्सफॉर्मर –** राज्यातील अनेक ठिकाणचे ट्रॉन्सफॉर्मर जून्यास्थितीत कार्यरत आहे. मागील अनेक वर्षापासून त्यात कोणतीही दूरूस्ती व नविनीकरण करण्यात आलेले नाही परिणामता: राज्यातील ट्रॉन्सफॉर्मर बरेचदा बंद पडतात. हे ट्रॉन्सफॉर्मर बंद पडल्याने १६.३२% विजेचे नुकसान होते हे प्रमाण १४% आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. अशा प्रकारे योजना अंमलात आणल्यास त्याचा फायदा सर्वांना होईल.

**अणूउर्जा –** पर्यायी उर्जेची उपलब्धता असल्याशिवाय देशाला प्रगतीपथापर नेणे आणि विकासाचे उद्दिष्ट गाठणे अवघड आहे. नैसर्गिक साधन सामुग्री, पाणी, नैसर्गिक वायु, कोळसा यांचे साठे कायम स्वरूपी नाहीत. भविष्यात याचे स्त्रोत कमी होणार अशा वेळी एक महत्वाचे पूरक साधन म्हणून अणूउर्जेकडे पाहावे लागणार आहे. म्हणून भारताने NSG बरोबर करार केला आहे. यालाच Nuclear Supply Group या मध्ये भारताचा अंतर्भाव झालेला आहे. अणूउर्जेसाठी लागणारे युरेनियम आता या समुहातील कोणत्याही सदस्य राष्ट्राकडून भारताला प्राप्त करता येईल.

आण्विक उर्जा हा जगाचा अत्यंत महत्वाचा असा उर्जा स्त्रोत आहे. एकूण उर्जेपैकी ६३% एवढा वाटा आण्विक उर्जेचा आहे. जगाला होणाऱ्या विजपूरवठ्यात आण्विक उर्जेचे योगदान १५% आहे. त्यापैकी फ्रान्स, जपान व अमेरिका ५६.५% एवढी आण्विक उर्जाजन्य वीज वापरतात ''आयएई'' च्या पाहणीनुसार जगात एकूण ४३९

Scanned by CamScanner

न्युक्लीअर पॉवर रिॲक्टर्स असून ते ३१ देशांमध्ये कार्यरत आहे. सर्वाधिक आण्विक उर्जा निर्माण होते ती अमेरिकेत. एकूण उर्जेपैकी एकपंचमांश उर्जा याच माध्यमातून येते. फ्रान्स राष्ट्र सूमारे ८०% विज आण्विक उर्जेतून मिळवितो. आण्विक उर्जा उद्योगाविषयी बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, भारताच्या अर्थकारणात यातून नवे वळण मिळणार आहे. शेती, औषध, हवामान अशा सर्व क्षेत्रांना नविन उर्जा मिळणार आहे. देशात सध्या अणूउर्जेची स्थापीत क्षमता ४००० मेगावॅट आहे. परंतू प्रत्यक्ष उत्पादन अवघे ४५% एवढे आहे. अनुइंधन पूरवठादार देशाच्या गटाने कराराला मान्यता दिल्यामुळे येत्या काही वर्षात प्रत्येकी एक हजार मेगावॅट क्षमतेची किमान सहा विजनिर्मित केंद्र सुरू होतील. भारताच्या दृष्टीने व विजेच्या पर्याप्त उपलब्धतेच्या दृष्टीने हा अणुकरार भारतास उपयुक्त ठरणार आहे.

Scanned by CamScanner



# विदर्भातील विज निर्मितीची समस्या कारणे व उपाय

प्रा. अशोक भांडेकर,
श्री. शिवाजी महाविद्यालय,
राजुरा, जि. चंद्रपूर

**प्रास्ताविक :**

विज ही मानवी जिवनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व निसर्गात सर्वत्र आढळणारा उर्जेचा एक प्रकार आहे त्याप्रमाणे पायाभूत सोयी म्हणून आवश्यक घटक, अवकाश, वातावरण, जिवसृष्टी, द्रव्य आणि अणूंना एकत्रीत ठेवणारे रासायनिक बंध तसेच स्वत: अणू यासर्व ठिकाणी विज आढळते. विज चमकने किंवा पृथ्वीवर पडणे म्हणजे निसर्गातील विद्युत विसर्जनाचा प्रचंड लोळ होय.

लोकरी कापड घासल्यास अंबर विद्युत भारीत होते. तर ईल (मासा) इतर प्राण्यांना विजेचा झटका देवू शकतात. त्याच प्रमाणे प्राण्यामध्ये मज्जापेशी जवळ दुसऱ्या मज्जापेशीकडे (कोशीका) कडे पाठवित असणारा अतिशय दुर्बल विद्युतसंकेत हा निसर्गात आढळणारा अति सुक्ष्म जी दिसत नाही, त्याप्रमाणे वास नसलेल्या गंध व आवाज नसलेला मात्र विजेचे कार्य मानवी जीवनाच्या सुखसमृध्दीसाठी प्रकाश उष्णता निर्माण करण्यासाठी फार उपयोग होतो. यावरूनच विजेचे अस्तीत्व अधिक आहे याची जाणीव व्यक्तीला होत असते. विजेचा व्यावहारीक वापर करण्याची पूष्कळ तंत्रे २० व्या शतकाच्या पूर्वीपासून पूढे आलेली आहेत. विज हे आधुनिक समाजाचे सुखमय जिवनाचे महत्वाचे अंग बनलेले आहे. सर्व जगात विजेचा वापर वाढल्याने विज निर्मिती मोठमोठ्या जनित्राच्या मदतीने केली जाते. त्यासाठी दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गीक वायू, अणुइंधन यांची मदत घेतली जाते.

**विज संशोधनाविषयीचा इतिहास :**

विजेबद्दलचा पहिला उल्लेख इ.स.पु. ६ व्या शतकात आढळतो. ग्रीक विचावंत व संशोधक मायलीटस थेलीझ यांनी (६४०) ते (५४६) धुपाच्या जातीच्या खळ्यावर लोकरीच्या कापडाने घासल्यास धुलीकरण, कागदाचे कवठे, हलके पदार्थ यांच्याकडे आकर्षित होतात. मात्र यांची संगती लावणे कठीण झाल्याचे दिसले, मात्र

**जागतिक स्तरावर विज निर्मिती आणि मागणी :**

मानवी जिवनात झालेला बदल आणि वेगवेगळ्या वस्तूचे विविध प्रमाणावर उत्पादन आणि त्याचे वितरण यासाठी जगभर विजेची मागणी वाढत आहे. १९ व्या शतकात अमेरिकेसारख्या बलाढ्य देशात विजेच्या खपाची तुलना

Scanned by CamScanner

केल्यास १९८० मध्ये विजेच्या मागणीत ३८० पट वाढ झाली. मात्र १९४० मध्ये हा खप केवळ १२ टक्के हाता. जगात सर्व देशात दगडी कोळशाबरोबरच खनिज तेल, नैसर्गीक वायु आणि अणूइंधन वापरून विज निर्मिती केली जाते. त्याचबरोबर जलविद्युत वापरणे अत्यावश्यक बनलेले दिसते. परंतू जलविद्युत सोडल्यास वरील सर्व विद्युत निर्मितीसाठी लागणारे इंधन मर्यादित काळासाठीच उपलब्ध आहेत व ते लवकर संपणारे आहेत. त्यासाठी अपारंपारीक उर्जास्त्रोत्रांचा संशोधन आणि विकास ही काळाची गरज राहणार आहे. जलविद्युत, औष्णीकविद्युत, अणुउर्जानिर्मिती बरोबरच पवनउर्जा भरती ओहोटीचीउर्जा, लाटांचीउर्जा, द्रव्यगतीय जनीत्रे, इंधन विद्युत घट या पर्यायी उगमांचाही विज निर्मितीसाठी विचार होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर भारताने २२ ऑक्टोबर २००८ रोजी चांद्रयान मोहिम १ याचा हेलीयम ३ वायु शोधण्यासाठी यान याचे एक उदाहरण आहे. कारण हा वायु पृथ्वीवर फार कमी आढळतो, आणि त्याची चंद्रावर प्रमाण अधिक आहे. भविष्यात हा वायु पृथ्वीवर आणल्यास ८ हजार वर्ष पुरेल एवढ्या या वायुचा शोध व त्याचा वापर करण्याचा जागतिक संशोधकांचा मानस आहे. अधिक कार्यक्षम कमी प्रदूषणकारी विज निर्मिती वाढविणे गरजेचे झाले आहे. पर्यावरणाला अधिक घातक असलेला कॉर्बनडॉय ऑक्साईड वायु प्रदुषण याला नियंत्रित ठेवणे हे गरजेचे बनलेले आहे. अन्यथा पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचा मानव जातीला होणारा धोका आणि या धोक्याचे आरोग्यावर होणारे परिणाम किती भयावह असतील हे सद्यातरी सांगणे कठिण झालेले दिसते, मात्र वेगवेगळ्या आजार, शरीरातील मासपेशी, रक्तपेशी यांच्यात अनेक परिणाम झाल्याचे आज आपल्याला दिसते आहे. त्यामूळे आरोग्यवर होणारा खर्च भविष्यात अधिक असेल.

**महाराष्ट्रात विज मंडळांचे झालेले विभाजन :**

३ जुन २००५ मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन करण्यात आले हे विभाजन करण्याचा मुख्य उद्देश केवळ विज उत्पादन आणि वितरण यांच्यातील असमतोल दुर करणे नसून उत्पादन निर्मिती आणि परेषन या तिन विभागात समन्वय साध्य करून प्रत्येक विभागाची कार्यक्षमता व त्यांच्यात समन्वय निर्माण करणे आवश्यक बनले. विद्युत पुरवठ्याविषयीचा नविन विचार पुढे करून विद्युत वितरण व्यवस्था सुरळीत करणे, आणि कृषी, उद्योग, व्यापार आणि मोठे उद्योग धंदे यांना चालना देणे, व उत्पादनाची पातळी वाढविणे हा उद्देश होता.

मात्र यातील वितरण विभाग आणि निर्मिती विभागाला विजेची मोठ्याप्रमाणावर येत असलेली मागणी पुर्ण करण्याकरिता चक्रव्यूहात फसल्याचा भास होत आहे याचे कारण वाढती लोकसंख्या, वाढते शहरीकरण, ग्रामीण भागातील विद्युत पंपाकरीता असलेली मांगणी पुर्ण करण्याकरीता सद्या परिस्थितीत वीज उपलब्ध करून देणे व नियमित विद्युत पुरवठा करणे कठीण झालेले आहे. याला सरकारचे नियोजन आणि सरकारधमील प्रभावशाली नेतृत्वच जबाबदार आहे. त्याप्रमाणे प्रभावी उपाययोजनांचा अभाव हे मुख्य कारण आहे. त्यामुळेच आजच्या विज वितरण कंपनीसमोर विज वितरणातील एक समस्या बनलेली आहे. विज आयोगाने यासाठी भारनियम करण्यास विज वितरण कंपनीला भाग पाडले. विज आयोगाने यासाठी भारनियमण करण्यास विज वितरण कंपनीला भाग पाडले. वीज आयोगाचे केवळ ३९२ मॅगावॅटची लोडशेडींग करण्याचे निर्देश असून विदर्भात ५८३.१९ मॅगावॅटची लोडशेडींग केली जात आहे, तर राज्यात दर दिवसाला २९१३ मॅगावॅटची विज लोडशेडींग केली जाते. मात्र ज्या जिल्ह्यात ही विज निर्मिती केली जाते आणि तेथील साधनसंपत्ती वापरलेली जाते त्याही जिल्ह्यांनासुद्धा या विज भारनियमाचा

Scanned by CamScanner

जोरदार फटका बसलेला आहे. यातून मात्र बारामती, पुणे आणि नविन मुंबई यांना वगळण्यात आलेले आहे. या एक राजकीय डावपेचाचा भाग असून ही बाब सर्व लोकांवर अन्याकारक आहे.

राज्यातील विज निर्मिती आणि विदर्भातील स्थिती :

महाराष्ट्रात इतर राज्याच्या तुलनेत मोठे उद्योग व लघुउद्योगाचे प्रमाण अधिक आहे. त्याप्रमाणे या राज्याची भौगोलीक स्थिती उद्योगासाठी पोषक आहे. महाराष्ट्रात अनेक व्यावसायिक कंपन्या आलेल्या असून त्यांच्याकडून विजेची मांगणी मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच सिमेंट, कागद, कापड, लोखंड, साखर कारखाने, भात गिरण्या, त्याप्रमाणे ऑटोमोबाईल्स सारखे मोठे उद्योग आणि लघुउद्योग वेगवेगळ्या जिल्ह्यात आहेत. मात्र अजुनही काही जिल्हे उद्योग विरहीत व मागासलेले आहेत. प्रादेशिक विकासाचा समतोल साधतांना प्रत्येक जिल्ह्याला विकासाची समान संधी देणे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. बेकारी दुर करण्यासाठी प्रत्यक्ष रोजगार व अप्रत्यक्ष रोजगार लोकांना मिळणे गरजेचे आहे. यासाठी वेगवेगळ्या उद्योगांची उभारणी आणि विकास यांच्या मदतीने राज्याच्या विकासाबरोबरच मागासलेल्या भागांचा विकास होणे गरजेचे आहे. सद्या परिस्थिती १९७० च्या तुलनेत राज्याची लोकसंख्या १७ पटीने वाढलेली आहे. तुलनात्मक दृष्ट्या विदर्भातील विजेची मांगणी ही मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. राज्यात १२३७८ मॅगावॅट विज निर्मिती केली जात आहे, परंतू आज राज्यात १४००० मॅगावॅट विजेची मांगणी आहे. मात्र प्रत्यक्षात ९६३४ ऐवढीच प्रत्यक्ष विज निर्मिती केली जात असून सद्या परिस्थितीत ९४६५ मॅगावॅट विज निर्मिती उपलब्ध होत आहे. १६९ मॅगावॅट विज उत्पादन क्षमतेचा वापर करूनही पारेशन व गळती, विज चोरी या माध्यमातून नष्ट होत आहे, याचा परिणाम सर्व जनतेला भोगावा लागत आहे. कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर या केंद्राची केवळ ४२६० मॅगावॅट विज क्षमता असून ३६११ मॅगावॅट विज उपलब्ध होत आहे. या उत्पादनाची स्थिती कधीही स्थिर राहिलेली नाही.

**प्रत्यक्ष उत्पादन क्षमता व भार नियमातील तुट : २५ जुलै २००८ ते २ सप्टेंबर २००८**

| विज निर्मिती केंद्राची सुरूवात | ठिकाण | उत्पादन क्षमता | प्रत्यक्ष उत्पादन |
|---|---|---|---|
| २७ ऑक्टोबर १९८२ | चंद्रपूर | २३४० | १३०० मॅगावॅट |
| ३ जुन १९७४ | कोराडी | ११२० | ७८५ मॅगावॅट |
| | खापरखेडा | ८०० | ५४० मॅगावॅट |
| | दाभोळ | ९५० | ६०० मॅगावॅट |
| | जलविद्युत | ४०० | २०० मॅगावॅट |

अलीकडे कृषी आणि उद्योग क्षेत्राची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असून अवर्षन प्रवण क्षेत्राची मागणी जास्त आहे. विदर्भात ४२ टक्के लोक लघुउद्योगावर अवलंबून असून उपजिविकेसाठी पर्यायी साधन नसल्याने विज संकटाबरोबर त्यांनाही भार नियमणाचे संकट सोसावे लागत आहे. गरीब शेतकरी, लघुउद्योजक यांना दारिद्र्यातच

Scanned by CamScanner

जिवन जगल्याचे भासत असून उत्पादनातील व उत्पादनातील सातत्य बिगडल्याने त्यांच्या जिवनमानावर व राहणीमानावर विपरीत परिणाम झालेला आहे. याचा परिणाम मागणी व पुरवठ्यात संतुलन राखण्यात अडचण येत असल्याने प्रभावी मागणी ऐवजी उद्योग बंद पडल्यातच जमा होत आहे. त्याचप्रमाणे जागतिक मंदीच्या फटक्यात अनेक लोक भरडलेले जात आहे. विज कपात १० ते १५ तास लोडशेडींग याचा परिणाम म्हणून शेती उद्योगाबरोबरच लघु आणि मोठ्या उद्योगांनाही फटका बसलेला आहे. ही स्थिती सुधारली नाही तर वाढती बेकारी, उपासमार, दारिद्रय, मुद्रास्थिती या सारखे अनेक प्रश्न निर्माण होतील, पर्यायाने राष्ट्रीय एकात्मता, राहणीमान व वस्तूच्या उपभोगावर विपरित परिणाम व्हायला वेळ लागणार नाही.

**विज निर्मितीची मुख्य समस्या :**

विदर्भातील सर्व औशनिक विज केंद्रे, दगडी कोळशावर विज निर्मिती करीत असून या विज निर्मिती केंद्राना ८५ लाख टन ऐवढ्या कोळशाची नियमित गरज आहे. मात्र या कोळशापासून ४००० उष्मांक (ऋलउ) ऐवढ्या उष्मांकाची गरज असून प्रत्यक्षात २००० ते १८०० ऐवढे उष्मांक मिळणारा कोल वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेड यांच्याकडून पुरवठा होतांना दिसते. त्यातच चिखल, रेतीमिश्रीत कोल पुरवठ्याने वारंवार विज उत्पादनाच्या जनित्रामध्ये बिगाड होत आहे. उन्हाळ्यात विजेची मागणी मोठ्या प्रमाणात येत असल्याने विद्युत निर्मिती संच दुरुस्ती करता येत नाही, ते बंद ठेवावे लागते. व पावसाळ्यात विजेची मागणी कमी झाल्यावर ते दुरुस्त करावे लागते. याचा परिणाम भारनियम केल्याशिवाय विज निर्मिती कंपनीला पर्याय उरत नाही ही वस्तुस्थिती आहे. कारण अतिशय ऊष्णता मानात जनित्रांची दुरुस्ती करणे फार धोक्याचे असते हे उल्लेखनिय कारण आहे.

**कोल वॉशरीकडून महाजनकोची कोंडी आणि भ्रष्टाचाराचा विळखा :**

राज्यातील औष्णिक विज केंद्राना पुरविण्यात येणारा कोळसा स्वच्छ (कोल वॉश) करण्याचे काम अधिक दराने मिळावे म्हणून विदर्भातील काही कोल वॉशरी संगनमत करून राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न होत असतांना दिसतो. प्रत्यक्षात विज उत्पादनासाठी २५ टक्के कोळसा कोल वॉश करून विज निर्मिती केंद्राना वापरण्याची पद्धत महानिर्मिती केंद्राने सुरू केली. हे काम कंत्राटीपद्धतीने खाजगी कोल वॉशरींना देण्यात येते. वेस्टर्न कोल फिल्डस् लिमिटेड महानिर्मितीसाठी हा कोल वॉश सतत करीत असून हा राखून ठेवलेला कोळसा विज निर्मिती केंद्र विकत घेत असते. स्वच्छ केल्यानंतर ८९ टक्के कोळशाचा पुरवठा विज केंद्राना करायचा असतो असे कामाचे स्वरुप आहे.

मात्र २ वर्षापूर्वी काही कोल वॉशरींनी कोल वॉश करण्याचे काम ४० रूपये प्रती टनांनी मिळविले. १टन कोळसा वॉश केल्यावर ११ टक्के अयोग्य कोळसा उरतो व ८९ टक्के कोळसा विज निर्मिती केंद्राना पुरवायचा असतो. परंतू या कोल वॉशरी ८० टक्के कोळसा पुरवितात, तर २० टके कोळशाची किंमत गृहित धरून कमी दरात कंत्राट घेतात, परंतू यात कोल वॉशरीच्या सहयोगीक खाजगी कंपन्या संगमताने हे दर ११९ रूपये प्रमाणे मिळविण्याचे काम हाती घेतल्याचे दिसून येते. वाढलेल्या दराने काम मिळावे म्हणून राजकीय दबाव महानिर्मिती केंद्रावर आणत आहे. याचा परिणाम विज निर्मितीवर होत असून वाढलेल्या दराने विज विकत घेण्याशिवाय पर्याय लोकांवर राहत नाही. मात्र यासाठी निर्मिती विभागाने नकार दिलेला दिसून येतो व हे प्रकरण भारत सरकारच्या कोळसा

Scanned by CamScanner

मंत्रालयाकडे पाठविलेला आहे. या वॉशरी कंपन्यानी वेस्टर्न कोल लिमिटेडला सरळ कोळशाचा पुरवठा करावा असे सुचविले असून याचा परिणाम विज उत्पादनावर झालेला आहे. करोडोचा भ्रष्टाचार, राजकीय दबाव हे विज निर्मिती केंद्रपूढे मोठे अडसर असून सामन्य जनता या विळख्यात सापडल्याची चिन्हे भविष्यात पहावयास मिळणार आहे.

त्याचबरोबर संद्या परिस्थितीत ओल्या कोळशाच्या समस्येने निर्मिती विभाग फार वैतागले आहे. ओल्या कोळशाची ज्वलंशिलता कमी असते, विज निर्मितीसाठी ४००० * ऐवढी उष्णतेची गरज असताना प्रत्यक्षात मिळणारी उष्णता ही कमी असल्याने वारंवार संच बिगडने हे प्रकार वारंवार होत असतात. दरवर्षी निर्मिती विभागाला ३५ दशलक्ष टन कोळसा लागत असतो, तर चंद्रपूर विज निर्मिती केंद्राला दरवर्षी १३ लाख टन कोळसा लागतो. हा कोळसा वेगवेगळ्या खाणीतून निर्मिती विभागाला प्राप्त होत असतो व त्याची ग्रेड कोल इंडिया ठरवित असून त्याचे दरही वेगवेगळे असतात, त्यामुळे स्वस्त कोळसा विज निर्मिती विभाग खरेदी करीत असते. म्हणून विज उत्पादन खंडीत होणे, सयंत्र बिगडणे हे देखील महत्वाचे उल्लेखणीय कारणअ आहे.

**विज समस्येच्या काही उपाययोजना :**

१) विज पारेषन गळती यावर नियंत्रण मिळविणे गरजेचे आहे. मोठ्या उद्योगातील तसेच सेवा क्षेत्रातील विज चोरी यावर कडक बंधणे घालणे गरजेचे आहे.

२) अपारंपारिक उर्जा स्त्रोत शोधून विज निर्मितीला चालना देणे महत्वाचे आहे. उदा. सौरउर्जा, पवनउर्जा, घनकचऱ्यापासून विज निर्मिती अशा प्रकारच्या प्रकल्पाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

३) नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून उत्पादन वाढविण्यासाठी अनेक कंपन्या येतात, त्यावर विज निर्मितीसाठी कायदेशीर बंधने हातली पाहिजे. भौगोलिक परिस्थिती उपलब्ध असल्यास त्यांनी स्वत: विज निर्मितीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. उद्योगाबरोबरच कंपन्याच्या विकास क्षेत्रांचा विकास साधला जावून विजेची गरज पुर्ण होईल.

४) विदर्भातील अर्थ व्यवस्था सुदृढ करण्यासाठी अनेक टेकळ्या, पर्वत रांगा (डोंगर रांगा) यावर पवन चक्या बसविल्यास बराच विज प्रश्न सुटतो. त्यामुळे अखंड विज पुरवित्याची स्थिती सामान्य बनू शकते.

५) अनावश्यक विद्युत रोशनी, धार्मिक कार्यक्रम, नगर पालिका विभागातील पथदिवे, उत्सव यावर मोठ्या प्रमाणात विद्युत वैय होतो, यासाठी प्रक्षतबंधात्मक नियमणाची गरज आहे.

६) एकूण उत्पादित जमीनीपैकी उद्योगानी बळकावलेली व अनुउत्पादन झालेली जमीन इतर विभागाच्या तुलनेत कितीतरी जास्त आहे. त्यामुळे उत्पादनाचे क्षेत्र कमी झाल्याने बेरोजगराचा प्रश्न वाढणार आहे. त्यामुळे विज उत्पादक जिल्ह्यात भार नियम कायम स्वरूपी राहून नये.

७) नव्याने तयार होत असलेले विज प्रकल्प औद्योगिक विरहीत जिल्ह्यात गेल्यास त्या जिल्ह्याचे औद्योगिक महत्व वाढेल व थोडीफार बेकारी कमी होऊन विकासाबरोबर प्रदुषणाचे विकेंद्रीकरण होईल हे उल्लेखणीय आहे.

८) नवीन उद्योगाच्या उभारणीसाठी शक्य तो अन्नधान्याचे उत्पादन होत असलेल्या जमीनी भुसंपादित करू नये. याचा परिणाम वाढत्या लोक संख्येला अन्नधान्याच्या उत्पादनाच्या दृष्टीने भविष्य काळात अन्न टंचाईला निमंत्रण दिल्यासारखे होई याची दक्षता घेतली पाहिजे.

Scanned by CamScanner

९) वाढत्या लोकसंख्येला तुलनेत अखंडीत विज पुरवठ्यासाठी सरकारने दीर्घकालीन उपाय योजना करणे गरजेचे असून भविष्य काळात भार नियमासारख्या समस्येवर नियमित तोडगा काढला पाहिजे व नियोजन केले पाहिजे.

१०) धार्मिक स्थळे, हॉटेल्स, वस्तीचे घरे यावर सौर उर्जेवर चालणारे विद्युत सयंत्र बसवून घरगुती वापराची विज सहज निर्माण केल्या जाऊ शकते. त्यामुळे विजेची बचत होवून पर्यायाने उद्योगासाठी विजेचा दाब मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होवू शकतो.

**सारांश :**

१) दैनिक लोकमत

२) दैनिक लोकसत्ता

३) मराठी शब्दकोष यातील सारांश

Scanned by CamScanner



## विदर्भातील विज निर्मितीची समस्या, कारणे व उपाय

**प्रा. प्रदीप मुकुंद लेले**
भारतरत्न इंदिरा गांधी क. महा., कन्हान, नागपूर.

मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी प्रख्यात उद्योजक रतन टाटा यांना पायघड्या घालून आमंत्रण पाठविले. म्हणाले की विदर्भातील १००० एकर जमीन देतो. तरी चतुर रतन टाटा मात्र आपला नॅनो प्रकल्प घेऊन सानंद, गुजरात मध्ये दाखल झाले. का ? कारण विदर्भातील वीजसमस्या आता देशभर प्रसिध्द पावलेली आहे. टाटांना सिंगूर मधून विदर्भात येवून 'आगीतून फुफाट्यात' अशी परिस्थिती अनुभवावी लागली असती.

भूमी, श्रम, भांडवल, संघटन या सोबत उद्योगांना प्रगतीसाठी काही मूलभूत सोयी सुविधांची गरज असते. वीज , इंधन व पाणी, वाहतूक, गोदामे व बाजारपेठा यांचा या मुलभूत सोयीसवलतीमध्ये समावेश होतो. त्यापैकी वीज हा घटक प्रत्यक्ष उत्पादनाशी संबंधीत आहे. उर्जेशिवाय संयंत्रे क्रियाशील कशी होणार ?

गेल्या काही वर्षापासून महाराष्ट्रात वीजसमस्या अधिकाधिक तीव्र होत आहे. त्याची झळ आपण सर्वच सोसत आहोत. गोव्यासारखे छोटेसे राज्य अखंडित वीज पुरवठा करू शकते. आणि भारतातील औद्योगिक विकासात अग्रेसर असलेले राज्य मात्र उद्योगांना आठवड्यात ४० तास वीजकपात करते. अशी स्थिती का निर्माण झाली. वीजेची गरज जेवढी उद्योगांना आहे तेवढीच कृषीक्षेत्र व सेवा क्षेत्रालाही असते. सामान्य नागरिकांचे जीवनदेखील वीजेशिवाय असहनीय होते. खंडीत वीज पुरवठ्यामुळे उत्पादनात घट होतेच पण त्याचबरोबर बँक, रेल्वे, विमा इ. सेवांच्या कार्यक्षमतेवरही विपरीत परिणाम होतो. बाजारपेठांवर देखील त्याचा प्रतिकूल परिणाम दिसून येतो. नाशवंत वस्तूंच्या साठवणुकीवर, कृषीमालासाठी सिंचनावर एवढेच कशाला मनोरंजनासारख्या लोकप्रिय उद्योगावर देखील या खंडीत वीजपुरवठ्याचा विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. एकुणच मानवी जीवन फार मोठ्या प्रमाणात प्रभावी झालेले आहे. 'भारनियमन ' हा शब्द एखाद्या राक्षकासारखा भासु लागला आहे.

विजेच्या मागणी व पुरवठ्याच्या सद्या स्थितीचा अभ्यास केल्यास वरील विवेचनाची सार्थता लक्षात येईल

Scanned by CamScanner

तक्ता क्रं. १

विजेची मागणी व पुरवठ्याची स्थिती (मेगावॅटमध्ये)

| वर्ष | मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २००१-०२ | १०,११९ | ९१०६ | १०१६ |
| ०२-०३ | ११,४२५ | ९००४ | २४२१ |
| ०३-०४ | ११,३५७ | ९३१५ | २०४२ |
| ०४-०५ | १२,७४९ | ९७०४ | ३०४५ |
| ०५-०६ | १४,०६१ | ९८५६ | ४२०५ |
| ०६-०७ | १४,८५० | ९८४० | ५०१० |
| ०७-०८ | १६,२०० | १२३८० | ३८२० (अंदाजे) |

संदर्भ – डिसेंबर २००७ लोकराज्य – ऊर्जामंत्री श्री दिलीप वळसे पाटील यांच्या मुलाखतीतून.

वरील तक्त्यानुसार वीजेची तूट २००१-०२ पासून २००६-०७ पर्यंत सातत्याने वाढत गेलेली दिसते. परंतु २००७-०८ या वर्षात उत्पादनाचे म्हणजे पुरवठ्याचे प्रमाण वाढून तूट कमी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आलेला होता. परंतु प्रत्यक्षात आपल्याला आलेला अनुभव मात्र वेगळाच आहे . त्यामुळे प्रत्यक्षात उत्पादन पाहिजे त्या प्रमाणात वाढलेले नाही हे स्पष्ट होते.

या संकटामागील कारणांची मीमांसा करणे अनिवार्य आहे.

**कारणे** : 'भारनियमन' वीजेची तूट या परिस्थितीला कारणीभूत असलेले घटक कोणते ? याचाही विचार करणे गरजेचे आहे. पाच सात वर्षापूर्वी नसलेली ही वीजटंचाई आत्ताच एवढे उग्ररुप धारण करून कोठून आली ? हे सर्व एकदम अचानक घडून आलेले नाही. वीज समस्येची जी कारणे आहेत त्यांचा विचार केला तर असे जाणवते की ही आपणच निर्माण केलेली परिस्थिती आहे.

**(१) मागणीत वाढ** – वीजेच्या मागणीत दिवसेंदिवस आणि वेगाने वाढच होतांना दिसते. यासाठी आपली जीवनपध्दती बऱ्याच अंशी जबाबदार आहे. सुखवस्तु जीवनाची ओढ लागल्याने प्रत्येक कामासाठी यंत्राचा वापर वाढू लागला. प्रति व्यक्ति, प्रति कुटूंब वीजेचा वापर तीव्र गतीने वाढला. जागतिकीकरणामुळे उपभोग्य वस्तूंची बाजारपेठ ओसंडून वाहू लागली यात वीजेवर चालणाऱ्या वस्तूंचेच प्रमाण सर्वाधिक आहे. नागरिकांच्या राहणीमानात सुधार हे या वाढत्या मागणीमागील प्रमुख कारण आहे.

जागतिकीकरणामुळे अनेक नवीन उद्योगांची स्थापना देखील झाली, हे ही वाढत्या मागणीचे कारण आहे. या काळातच बाजारपेठांचे स्वरूप देखील बदलले . मोठमोठे मॉल्स चालविण्यासाठी वीजेची गरजही एकदम मोठ्या

Scanned by CamScanner

प्रमाणात वाढली. वाढलेली मागणी पूर्ण करण्यासाठी त्या प्रमाणात वीजेचे उत्पादन मात्र वाढलेले नाही. त्यामुळे अस्तित्वात आली भारनियमनाची गंभीर समस्या.

**(२) वीजेची चोरी –** भारनियमनासाठी जबाबदार असलेली एक गंभीर बाब म्हणजे राज्यात होणारी वीजेची चोरी. झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब नागरिकांपासून तर मोठ्या कारखानदारांपर्यंत यासाठी जबाबादार आहेत. वीजेची चोरी रोखण्यासाठी वीज महामंडळाने अनेक प्रयत्न केले परंतु भ्रष्ट व्यवस्थापनामुळे अपूरे सिध्द झाले.

**(३) वीजेची हानी (तूट) –** वीज निर्मिती पासून तर ती ग्राहकांपर्यंत पोहचविणाच्या काळात जी वीजेची गळती होते त्याला तूट असे म्हणतात. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे तीन उपभागात विभाजन झाले. निर्मिती, पारेषण वितरण अशा तीन कंपन्या अस्तित्वात आल्या. प्रत्येक जण या वीज गळती साठी एकमेकांना दोष देतात. परंतू ही गळती रोखण्यासाठी मात्र पुरेसे प्रयत्न होतांना दिसत नाही.

**(४) अपूर्ण क्षमतेने उत्पादन –** महाराष्ट्रातील विद्युत निर्मिती प्रकल्प पूर्ण क्षमतेचा वापर करतांना दिसत नाहीत पुढील तक्त्यावरून हे स्पष्ट होईल.

**तक्ता क्रं. २**

**राज्यातील विद्युतनिर्मिती**

| केंद्र | क्षमता | प्रत्यक्ष निर्मिती |
|---|---|---|
| नाशिक | ८८० मेगावॅट | ५४६ मेगावॅट |
| कोराडी | १०४० | ६८८ |
| खापरखेडा | ८४० | ८३४ |
| पारस | ३०५ | ४९ |
| परळी | १०२० | २१२ |
| चंद्रपूर | २३४० | १०३६ |
| भूसावळ | ४७५ | ४५६ |
| उरण (गॅस) | ८५२ | ३८१ |

संदर्भ – दैनिक लोकसत्ता ७ ऑगस्ट २००८

या केंद्रात होणारी वीजनिर्मिती आपल्या उत्पादन क्षमतेच्या ५०% आहे हे लक्षात येईल. भारनियमन करण्यामागील हे देखील कारण आहे. ओला आणि निकृष्ट दर्जाचा कोळसा, बंद पडलेले आणि दुरूस्तीसाठी बंद पडलेले संच, पाऊस कमी आल्याने निर्माण झालेले संकट ही अनेक कारणे आहेत ज्यामुळे पूर्ण क्षमतेने वीजेचे उत्पादन केले जाऊ शकत नाही.

**(५) अपारंपारिक साधनांकडे दुर्लक्ष –** कोळसा आणि पाणी या दोन घटकांवर सध्या वीजनिर्मिती अवलंबून आहे. यांच्या कमतरतेचा व दर्जाचा परिणाम वीज उत्पादनावर सहाजिकपणे होतो. त्याचवेळी वीजनिर्मितीच्या काही वेगळ्या

Scanned by CamScanner

अपारंपारिक साधनांचा विचार होणे गरजेचे आहे. परंतु अद्याप तरी त्याकडे दुर्लक्षच झालेले आहे, असे म्हणावे लागेल. सुर्यप्रकाश, हवा, समुद्राच्या लाटा, घनकचरा, औद्योगिक कचरा अशा अनेक साधनांपासून वीजनिर्मितीची शक्यता आहे. परंतु यांचा पुरेशा प्रमाणात सखोल अभ्यास झालेला नाही.

**उपाययोजना :**

समस्या फार गंभीर आहे. त्यावरील उपाययोजना देखील तेवढीच ठोस–भरीव स्वरूपाची असणे आवश्यक आहे.

(१) काही उपाय अगदी साधे, सरळ सोपे आहेत, जेणे करून आपण 'भारनियमनाच्या' संकटाला काही प्रमाणात का होईना सुसह्य करू शकतो. ते उपाय म्हणजे वीज वापर करतांना आपण करू शकतो तेवढी बचत. केलीच पाहिजे. वीजेचा अनावश्यक वापर टाळणे, सहज शक्य असणारे उपाय करणे नागरिकांचे कर्तव्य आहे. त्याच बरोबर गरीब श्रीमंत सर्वांनीच वीज चोरी न करण्याची प्रतिज्ञा घेतली पाहिजे. वीज चोरी रोखण्यासाठी वितरण कंपनीने अनेक प्रकारचे उपाय केलेत. शहराचे अ,ब,क,ड,ई,फ असे सहा गट तयार केलेले आहेत. कमी वीज हानी व चोरी होणाऱ्या भागात भारनियमन पण कमी करण्यात येते. उदा. नागपूरात काँग्रेसनगर भागात पावणेपाच तास भारनियमन होते तर गांधीबाग, इतवारी भागात आठ तास. त्यामुळे नागरिकांनी आपल्या भागात होणारी वीज हानी व चोरी रोखण्यासाठी महावितरणला सहकार्य केले तर काही अंशी भारनियमन कमी होऊ शकते.

**(२) उत्पादनात वाढ –** मागणी व पुरवठ्याचे संतुलन झाल्यास ही समस्या समुळ नष्ट होऊ शकते. त्यासाठी उत्पादनात वाढ होणे गरजेचे आहे. उत्पादन वाढ दोन प्रकारांनी होऊ शकते (अ) नवीन प्रकल्पांची उभारणी करून (ब) जुन्या प्रकल्पांना पूर्ण क्षमतेने वापरून.

ऑक्टोंबर महिन्यात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार विदर्भात २६ नवीन प्रकल्पांचे प्रस्ताव मान्य करण्यात आलेले आहेत. यावर पुढील ३ ते ४ वर्षात काम सुरू होण्याची अपेक्षा आहे. परंतु हे योग्य आहे का ? आधीच विदर्भात अनेक मोठे वीजनिर्मिती केंद्र अस्तित्वात असतांना आणखी २६ प्रकल्प याच भागात येण्याने समस्या सुटण्याऐवजी अनेक नवीन समस्यांना जन्म देण्यासारखे होईल. विदर्भातील भारनियमनाला उत्पादनातील घट कारणीभूत नसुन त्याचे योग्य वितरण न होणे महत्वाचे कारण आहे. हे सर्वांनाच माहित आहे की विदर्भातील वीजेवर पश्चिम महाराष्ट्रातील उद्योग पोसले जात आहेत. या २६ नवीन प्रकल्पांनी त्यात भरच पडेल. विदर्भातील सुपीक जमीन, पर्यावरण, पाणी यांची हानी करून वीजनिर्मिती केली जाईल आणि औद्योगिक विकास मात्र उर्वरित महाराष्ट्राचा होईल. यावर गांभीर्याने विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

यापेक्षा जी वीजनिर्मिती केंद्र अस्तित्वात आहेत आणि काही कारणास्तव पूर्ण क्षमतेने कार्य करत नाहीत त्यांच्याकडे लक्ष पुरविणे कमी खर्चाचे आणि फायदेशीर आहे. कोराडी, खापरखेडा व चंद्रपूर अनेक संच वारंवार नादुरूस्त होतात, निकृष्ट दर्जाचा कोळसा वापरल्याने कार्यक्षमता घटते. याबाबतीत योग्य ती उपायोजना करणे सहज शक्य आहे. त्यामुळे कमी वेळात (कारण नवीन प्रकल्प उभारण्यास कमीत कमी पाच वर्षाचा काळ लागतो) आणि

Scanned by CamScanner

कमी गुंतवणुकीत वीज निर्मितीत वाढ होऊन भारनियमनाच्या संकटातून मुक्तता होऊ शकते. पण त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न आणि राजकीय इच्छाशक्तीची तीव्र आवश्यकता आहे.

उत्पादन वाढीसाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यानुसार महाराष्ट्र वीजेच्या बाबतीत अतिरिक्त उत्पादन करणारे राज्य २०१२ पर्यंत बनणार असे उर्जामंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी घोषित केले आहे.

**तक्ता क्र.३**

**आगामी काळातील विजेची अपेक्षित स्थिती (मेगावॅटमध्ये)**

| वर्ष | मागणी | पुरवठा | तूट |
|---|---|---|---|
| २००६-०७ | १४,८५० | ९८४० | ५०१० |
| ०७-०८ | १६,२०० | १२३८० | ३८२० |
| ०८-०९ | १७,६०० | १२९०० | ४७०० |
| ०९-१० | १९,३०० | १५२०० | ४१०० |
| १०-११ | २१,१०० | १७९०० | ३२०० |
| ११-१२ | २३,१०० | २३७५० | +६५० |

संदर्भ – लोकराज्य डिसेंबर २००७ उर्जामंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांच्या मुलाखतीतून.

उत्पादन वाढीसाठी खापरखेडा केंद्रातून ५०० मेगावॅट, भुसावळ केंद्रातून १००० मेगावॅट वीजनिर्मिती २०१० पर्यंत अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे कोराडी केंद्रातून १६०० मेगावॅट व चंद्रपूर केंद्रातून ८०० मेगावॅट वाढीव वीजनिर्मिती २०११ पर्यंत होण्याची शक्यता आहे. उर्जमंत्र्यांच्या निवेदनानुसार २०१२ पर्यंत भारनियमनातून पूर्णत: मुक्तता होईल. एवढेच नव्हे तर महाराष्ट्र इतर राज्यांना वीजेची विक्रीसुध्दा करू शकेल.

या निवेदनाची सत्यता तपासण्यासाठी २०१२ पर्यंत प्रतिक्षा करण्याशिवाय आपल्याकडे काही पर्याय नाही.

